• पुणे, सोमवार, २९ जुलै २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 231 • वर्ष ३ रे, अंक २३१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

राष्ट्रसंचार
@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS





# मनूचा पदक श्रीगणेशा

## मनू भाकरने १० मीटर एयर पिस्टलमध्ये ब्रॉन्झ जिंकले, शूटिंगमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस:** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय नेमबाज मनू भाकरने इतिहास रचला आहे. तिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक जिंकले. ऑलिम्पिकच्या इतिहासात नेमबाजीत पदक जिंकणारी मनू ही पहिली भारतीय महिला ठरली. तिने अंतिम फेरीत २२१.७ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

२०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये मनूचे पिस्तूल खराब झाले होते. तिला २० मिनिटे लक्ष्य करता आले नाही. पिस्तूल दुरुस्त केल्यानंतरही मनूला केवळ १४ शॉट्स मारता आले आणि ती अंतिम शर्यतीतून बाहेर पडली. त्यावेळी ती प्रचंड निराश झाली होती; पण यावेळी तिने कमबॅक केले आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पदक जिंकले.

कोरियाच्या ओ ये जिनने या प्रकारात सुवर्णपदक पटकावले. तिने २४३.२ गुण मिळवून ऑलिम्पिक विक्रम केला. कोरियाच्या किम येजीने रौप्यपदक जिंकले. तिने २४१.३ गुण मिळवले.

**१२ वर्षांनंतर नेमबाजीत पदक**

मनू भाकरने तब्बल १२ वर्षांनंतर भारताला ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत पदक मिळवून दिले आहे. भारताला या खेळात २०१२ मध्ये शेवटचे ऑलिम्पिक पदक मिळाले होते. नेमबाजीत भारताचे हे आतापर्यंतचे पाचवे पदक आहे. राज्यवर्धन सिंग राठोड यांनी २००४ मध्ये रौप्य, २००८ मध्ये अभिनव बिंद्रांनी सुवर्ण आणि विजय कुमार यांनी मध्ये रौप्य आणि गगन नारंग यांनी कांस्यपदक जिंकले होते. » सविस्तर वृत्त १२ वर



### चक दे इंडिया...

'ब' गटातील साखळी लढतीत भारतीय हॉकी संघाने न्यूझीलंडला ३-२ असे हरवत बाजी मारली. या सामन्याचे एकच मिनिट बाकी असताना विजयी गोल झाला. P12

### भारतीय नारी सब पर भारी! P12



### 'गोल्ड मेडल'पासुन रमिता एक पाऊल दूर! P12

# पूर स्थितीची जबाबदारी; सहाय्यक आयुक्त निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात सोडलेल्या पाण्यामुळे सिंहगड रस्ता परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी घुसले. त्यामुळे हाहाकार उडाला. या स्थितीला महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. महापालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्त संदीप खलाटे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी केली जाणार आहे.

» संकटानंतर...

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री अजित पवार यांनी तिथे जाऊन पाहणी केली होती. काही ठिकाणी त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, २५ जुलैला सिंहगड रोड येथे अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची पाहणी करण्यासाठी भेट दिली असता खलाटे यांनी केलेल्या कामामध्ये कर्तव्यपरायणता दिसून आलेली नाही. तसेच, त्यांनी कामाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडलेली नाही. कर्तव्य पार पाडताना खलाटे यांनी गुणवत्ता, औचित्य व उत्तरदायित्व ठेवले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांना मनपा सेवेतून निलंबित करण्यात येत आहे. खलाटे यांच्याविरुद्ध खातेनिहाय चौकशीची कार्यवाही करण्याची » पान ७ वर

## संरक्षक भिंत कोसळल्याने चारशे रहिवासी स्थलांतरित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कोरेगाव पार्क परिसरातील पॉप्यूलर हाईटस-2 या इमारतीची संरक्षक भिंत मुसळधार पावसामुळे शनिवारी रात्री एकच्या सुमारास कोसळली. या इमारतीच्या मागचा भागदेखील कोसळायला सुरुवात झाल्याने रहिवाशांना घर रिकामे करण्यासाठी महापालिकेने नोटीस बजावली आहे. त्यामुळे दोन्ही इमारतीतील ६० फ्लॅटमधील साधारण तीनशे ते चारशे लोकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

दरम्यान, भिंत पुन्हा बांधून द्या, नाहीतर नुकसान भरपाई द्या, अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे. पुण्यात झालेल्या पूरस्थितीला नदी सुशोभीकरण प्रकल्प जबाबदार असल्याचा आरोपही संतप्त स्थानिकांनी केला आहे. » पान ७ वर

## खडकवासला प्रकल्पात पाणीसाठा २४ टीएमसीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या तीन दिवसांत धरणाच्या परिसरात मुसळधार पाऊस झाल्यामुळे खडकवासला धरण शंभर टक्के भरले होते. त्यामुळे धरणातून विसर्ग करावा लागला आहे. परिणामी, शहराच्या काही भागांत पूरसदृश स्थिती निर्माण झाली. दरम्यान, खडकवासला धरण परिसरात पावसाचा जोर काही प्रमाणात ओसरला आहे. त्यामुळे धरणातून विसर्ग बंद करण्यात आला आहे.खडकवासला धरण प्रकल्पात पाणीसाठा २४ टीएमसीवर गेला आहे. तसेच खडकवासला, टेमघर, वरसगाव आणि पानशेत ही धरणे सरासरी ८२ टक्के भरली आहेत. धरण परिसरांत आणखीही पाऊस सुरू आहे. त्यामुळे पाणीसाठा » पान ७ वर

# पवारांच्या वक्तव्यामुळे कार्यकर्त्यांत उत्साह

## आघाडी सत्तेत येणार असल्याचे भाकीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व शिवसेना (ठाकरे गट) या तिन्ही पक्षाची महाविकास आघाडी सत्तेत येणार असल्याचे भाकीत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

» राजकीय

पुणे जिल्ह्यातील २१ मतदारसंघात नवीन, होतकरू कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या सोबत गेलेल्या आमदारांचा पराभव करण्यासाठी पवार यांनी कंबर कसली आहे. लोकसभा निवडणुकीत पवार यांचे राज्यात तब्बल आठ खासदार निवडून आले. त्यामुळे त्यांना विधानसभा निवडणुकीत जास्त जागा मिळणार असल्याची चर्चा राजकीय निरीक्षक करत आहेत. महाविकास आघाडीने लोकसभेला ३१ जागा जिंकून भाजपला जोरदार झटका दिला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांचाही आत्मविश्वास कमालीचा वाढला आहे. पुणे जिल्ह्यात शरद पवार यांच्या सोबत एकमेव शिरूरचे आमदार अशोक पवार राहिले आहेत. बाकी सर्व आमदार अजित पवार यांच्यासोबत गेले.

विधानसभा » पान ७ वर

## इस्त्रायलमध्ये रॉकेट हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेरुसलेम :** इस्रायलच्या ताब्यातील गोलान हाइट्समधील फुटबॉल मैदानावर हिजबुल्लाहने केलेल्या रॉकेट हल्ल्यात किमान १० जण ठार झाले आणि मुलांसह अनेक जण जखमी झाले.

ऑक्टोबरपासून इस्रायल-हमास संघर्षाला तोंड फुटल्यानंतर, इस्रायली लक्ष्यावर झालेला हा सर्वात मोठा हल्ला मानला जातो. लेबनॉनमधील एका गावावर इस्रायलने जो हल्ला केला होता, त्याचा बदला म्हणून गोलान हाइट्समधील लष्करी तळावर हल्ला केल्याचे हिजबुल्लाहने म्हटले आहे. इस्रायली सैन्याने एका निवेदनात म्हटले आहे की हा रॉकेट हल्ला हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेने केला आहे. मजदल शम्समधील सॉकर मैदानावर रॉकेट लॉंच करण्यामागे हिजबुल्लाह दहशतवादी संघटना आहे.

## उत्साहाला भरते..

अमृत सहाणे




» सतर्क रहा! काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे खडकवासला धरण भरत असताना पुणेकरांच्या उत्साहालाही भरते आले आहे. प्रशासनाचे अडथळे ओलांडून लोक धरणाजवळ जात आहेत.

## राष्ट्रपतींचा पुणे दौरा पुढे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे** मुसळधार पाऊस आणि धरणांतून पाणी सोडल्यामुळे सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे दि. २९ जुलै रोजी होणारा दीक्षांत समारंभ पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. यामुळे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा पुणे दौराही पुढे ढकलण्यात आला आहे. राष्ट्रपती मुर्मू २९ जुलै रोजी लवळे येथील सिंबायोसिस विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी येणार होत्या.मात्र, पावसामुळे हा दौरा रद्द झाल्याचे राष्ट्रपतींच्या कार्यालयातून सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाला कळविले आहे. दरम्यान, यामुळे सध्याच्या आपत्कालीन स्थितीत व्यस्त असलेल्या शासकीय » पान ७ वर

### लाखो रुपयांच्या जीवनावश्यक वस्तूंचे सूत्रबद्ध वाटप

# पूरग्रस्तांची बिकट स्थिती; मदतीस महायुती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या माध्यमातून महायुतीच्या वतीने पूरग्रस्तांसाठी आलेली मदत पुण्यामध्ये पोहोचली आणि त्याचे सूत्रबद्ध वाटप करण्यात आले.



पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या एकता नगर, विठ्ठल नगर, सिंहगड रोड आदी परिसरामध्ये पूरग्रस्तांना ही मदत वितरित करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीपक मानकर, शिवसेनेचे प्रमोद भानगिरे, भाजपचे शहर अध्यक्ष धीरज घाटे, श्रीकांत जगताप आणि रिपब्लिकन पार्टीचे कार्यकारिणी सदस्य ॲड. मंदार जोशी यांनी या मदत वाटपामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

पुराच्या फटक्याने या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान सहन करावे लागले होते. त्यांच्या मालमत्तेचीदेखील मोठी हानी झाली होती. याच्या संवेदनेने महायुती सरकारने » पान ७ वर

### सहा तास मोहीम

• केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनातून ही मोहीम सलग साडेपाच ते सहा तास राबविण्यात आली. प्रत्येक पूरग्रस्तांला ही मदत पोहोचेल, याची काळजी घेतली गेली. या मोहिमेनंतर नुकसान झालेल्या पूरग्रस्तांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

#रा

## चार रोहिंग्यांना पुण्यात अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** बेकायदेशीरपणे देशात वास्तव्यास असल्याच्या आरोपाखाली पोलीस आणि महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पुण्यात दोन महिलांसह चार रोहिंग्या व्यक्तींना अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने रविवारी दिली.

हे चौघे गेल्या आठ दहा वर्षांपासून कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय भारतात राहत आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले. चिंचवड पोलीस आणि एटीएसने शनिवारी चौघांना ताब्यात घेतले. या प्रकाराने पुण्यात चिंता व्यक्त होत आहे.

# बनावट नोटीस पाठवून ६० लाखांची लूट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद:** बनावट 'लीगल नोटीस' पाठवून सायबर भामट्यांनी एका वृद्ध महिलेच्या आयुष्यभराच्या मिळकतीवर डल्ला मारला. कोणतीही लिंक नसताना, भामट्यांनी बँक खात्यातून ६० लाख रुपये काढून घेतले. या महिलेला फोन आला आणि तिच्या नावावर लीगल नोटीस असल्याचे सांगण्यात आले. अधिक माहितीसाठी २ दाबावे लागेल, असे भामट्यांनी सांगितले. यानंतर आयव्हीआर कॉल सुरू झाला आणि तिने कायदेशीर नोटीस डाऊनलोड करण्याच्या सूचनांचे पालन केले. सायबर सेलच्या अधिकाऱ्याने सांगितले की, संबंधित महिलेने मोबाइलमधील अंक दाबले तेव्हा व्यवहार आपोआप सुरू झाले आणि फोन नंबरशी जोडलेले त्यांचे बँक खाते रिकामे झाले. या महिलेच्या खात्यात सुमारे ६० लाख रुपये होते.

» क्राईम फाईल

महिलेने सांगितले की, तिने कोणत्याही वेब लिंकवर क्लिक केले नाही. सायबर फसवणुकीचा हा नवा मार्ग शोधून काढला असल्याचे तपास यंत्रणेचा दावा आहे.

सरकारी एजन्सीच्या नावाखाली सायबर भामटे लोकांना कॉल करतात. त्याशिवाय अनेकदा टेलिकॉम कंपनी किंवा कुरिअर कंपनी » पान ७ वर

## औषधी वनस्पतींचा समावेश परंपरागत शेतीमध्ये करण्याचे आवाहन

# दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत असलेल्या राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय पुरस्कृत पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सह- सुविधा केंद्र येथे दिनांक २७ व २८ जुलै, २०२४ रोजी “औषधी वनस्पतींची प्रक्रिया आणि मूल्यवर्धन” या विषयावर दोन दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणाचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू, प्रा. (डॉ.) पराग काळकर यांच्या हस्ते झाले. डॉ. पराग काळकर यांनी आधुनिक शेती, मूल्यवर्धन, शेतीसाठी निर्माण करण्यात आलेली विकसित कौशल्ये व त्या आधारित संशोधन, बाजारपेठ साखळी इ. विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या हवामानात औषधी वनस्पतींचा समावेश परंपरागत शेतीमध्ये करून औषधी वनस्पती क्षेत्रातील संधींचा फायदा घेण्याचे आवाहन उपस्थित प्रशिक्षणार्थींना केले.

प्रा. (डॉ.) ए. बी. नदाफ, विभागप्रमुख वनस्पतीशास्त्र विभाग, यांनी उपस्थितांचे स्वागत करून वनस्पतीशास्त्र विभाग व औषधी वनस्पती केंद्राविषयीची माहिती उपस्थितांना दिली. केंद्राचे प्रमुख संशोधक व विभागीय संचालक प्रा. (डॉ.) दिगंबर मोकाट यांनी प्रशिक्षणाचे प्रास्ताविक करून “औषधी वनस्पती संपदा व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना” याविषयी पहिल्या सत्रात माहिती दिली. प्रा. (डॉ.) ए. बी. अडे, पूर्व विभागप्रमुख व समन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रशिक्षणात २५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

दोन दिवसीय प्रशिक्षणात विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. बाळासाहेब कुरकुटे, डॉ. अपूर्वा संगोराम, डॉ. योगेश प्रभुणे, डॉ. श्रीपाद महामुनी, डॉ. स्वप्नील शिंदे, मंदार कार्लेकर, शिरीष जगताप, निशिकांत जाधव यांनी औषधी वनस्पती लागवड, काढणी पश्चात तंत्रज्ञान, प्राथमिक प्रसंस्करण या विषयी सखोल मार्गदर्शन केले. श्रुती गावडे, काजल पोकळे, संध्या देवरे, डॉ. टी. डी. खरात, गुलाब भाला व गणेश शेकडे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमात मदत व समन्वयकाचे काम केले. प्रशिक्षणावेळी उपस्थितांना प्रयोगशाळा, संग्रहालय, औषधी वनस्पती उद्यान दाखविण्यात आले.

● प्रक्रियायुक्त पदार्थांमध्ये चूर्ण, औषधी निर्माण, सुगंधी तेले, सौंदर्य प्रसादने (फेस क्रीम, साबण) कल्प, चॉकलेट, बिस्किट, हर्बल ज्यूस, हर्बल चहा, औषधी अन्नपदार्थ, जनावरांचे औषधी खाद्य इ.साठी प्रक्रियेविषयी प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण घेतले.

## पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनीत भावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनीत भावे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी श्रीकिशन काळे, चंद्रकांत फुंदे, सरचिटणीसपदी मीनाक्षी गुरव, खजिनदारपदी शिवाजी शिंदे, चिटणीस पदी सचिन गोरे, हिरा सरवदे यांची निवड झाली आहे. कार्यकारणी सदस्यपदी अश्विनी केदारी, श्रीकृष्ण कोल्हे, ज्ञानेश्वर भोंडे, प्रसाद पवार, मिकी घई, सुदेश मिटकर, अनिल खुडे, श्रीकृष्ण पादीर, संजय सपकाळे, यशवंत सिंघ यांची निवड झाली आहे. अत्यंत अटीतटीची ही निवडणुक झाली. निकालाची उत्सुकता शेवटपर्यंत होती. दैनिक राष्ट्र संचारचे मुख्य संपादक अनिरुद्ध बडवे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## » Selected



## कुचिपुडी नृत्य आणि संतूर वादनात रंगली सांस्कृतिक संध्या

**पुणे :** इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (आयसीसीआर) पुणे उपक्षेत्रीय कार्यालय आणि ललित कला केंद्र (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. माधुरी मजुमदार यांचे कुचिपुडी नृत्य आणि डॉ.धनंजय दैठणकर यांचे संतूर वादन यांचा समावेश असलेली सांस्कृतिक संध्या आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. ही सांस्कृतिक संध्या संत नामदेव सभागृह (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) येथे तसेच इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्सच्या 'होरायझन' या मालिकेअंतर्गत आयोजित करण्यात आली. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स, पुणे उपक्षेत्रीय कार्यालयाचे उपसंचालक राज कुमार यांनी कलाकारांचे स्वागत केले. गणेश कौतुम या नृत्य प्रकाराने मजुमदार यांनी कथक नृत्याचा प्रारंभ केला. त्यांच्या शिष्यांनी पलुकुते हे स्तवन, शिव स्तुती सादर केले, या सादरीकरणाला चांगला प्रतिसाद मिळाला. मजुमदार यांना हीरक शहा, गौरव दास यांनी साथ संगत केली.

## स्वच्छताकडे दुर्लक्ष केल्याने आयुक्तांनी केले निलंबीत

**पुणे :** सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त संदीप खलाटे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. त्यास महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी दुजोरा दिला. खडकवासला धरणातून गुरुवारी पहाटे मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने सिंहगड रस्ता परिसरासह मुठा नदीकाठच्या परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती.त्यामुळे नदीकाठ परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला होता. सोसायट्या, घरे, दुकाने, बाजारपेठा, वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी शिरले. पाहणीत एकता नगरी, निंबोजनगर, विठ्ठलनगर या पुरबाधित परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा, चिखल, गाळ साठला असूनही तेथे स्वच्छता केलेली नसल्याचे निदर्शनास आले होते. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत शनिवारी सिंहगड रस्ता क्षेत्रीय अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली.नरवीर तानाजी मालुसरे रस्ता (सिंहगड रस्ता) परिसरातील पुरबाधित परिसराला पालकमंत्री अजित पवार यांनी भेट दिल्यानंतर आणि नागरिकांच्या तक्रारीनंतरही स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे महापालिकेच्या अधिकाऱ्यास चांगलेच महागात पडले.

## टेक्निकल ब्लॉग इंडिया 2024 स्पर्धेत प्रा. योगेश हांडगे सर्वोत्कृष्ट



**पुणे :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT) येथील संगणक विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. योगेश अशोकराव हांडगे यांच्या ‘सायबर सिटी’ ब्लॉगने युथ इंजिनिअर्स फॉर टेकनॉलॉजी अँड एंवीरोन्मेन्ट (YETE) या तंत्रज्ञान आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या देशपातळीवरील सेवाभावी संस्थेच्या जगभरातील मराठी ब्लॉग लेखकांसाठी असलेल्या ‘टेक्निकल ब्लॉग इंडिया 2024’ या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ब्लॉग विजेत्यांच्या यादीत स्थान मिळवले आहे. या स्पर्धेत भारतातील मराठी ब्लॉगर्सनी भाग घेतला होता. नुकतेच स्पर्धेचे निकाल जाहीर झाले असून, स्पर्धेला मराठी ब्लॉगर्सकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. सायबर सुरक्षेचा प्लॅन आखण्यासाठी जनजागृतीची राष्ट्रीय मोहीम सुरू करण्याची गरज असल्याचे जाणवते आणि याचाच एक भाग म्हणून या ब्लॉगची निर्मिती करण्यात आलेली आहे, असे प्रा. योगेश हांडगे यांनी सांगितले.

## माझ्या फेसबुकच्या नव्या फेक अकौंटला फॉलो करू नका : मुळीक



**पुणे :** भारतीय जनता पार्टीचे पुणे शहराचे माजी अध्यक्ष व आमदार जगदीश मुळीक हे सोशल मिडियाच्या माध्यमातून नागरीकांशी संपर्क साधत असतात. त्यांना मिळणारा प्रतिसाद बघून कोण्या अज्ञात व्यक्तीने फेसबुकवर त्यांच्या नावाचे फेक अकाउंट तयार केले आहे. या फेक अकाउंटला कोणीही फॉलो करू नये. या फेक अकाउंट वरून काही मेसेज आल्यास त्यात उत्तर किंवा प्रतिसाद देऊ नये असे आवाहन जगदीश मुळीक यांनी केले आहे.माझ्या फेसबुक अकाउंट फॉलोअर्सची संख्या ३४ हजार व फेसबुक पेज फॉलोअर्सची संख्या 333K(हजार)आहे. त्यामुळे चुकून आपण फॉलो केल्यावर फॉलोअर्सची संख्या कमी म्हणजे दीडदोन हजार किंवा त्यापेक्षा थोडी जास्त दिसली तरी ते फेक अकाउंटचे पेज उघडले गेले आहे असे समजावे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## आरटीई अंतर्गत वाढीव प्रवेश नियमित होणार


### शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना

**पुणे :** आरटीईच्या प्रवेशप्रक्रियेत केलेल्या बदलास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. त्यामुळे यंदा आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेला जवळपास विलंब झाला. राज्य सरकारने आरटीई प्रवेशप्रक्रियेत केलेला बदल उच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवून पूर्वीप्रमाणेच आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेत पहिली, पूर्वप्राथमिकच्या वर्गातील प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त होणार असल्यास शाळांनी त्याबाबतची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. संबंधित वाढीव प्रवेश नियमित करण्याच्या सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आरटीई अंतर्गत वाढीव प्रवेश नियमित होणार आहे

त्यामुळे संबंधित शाळांतील पहिली, पूर्वप्राथमिकच्या वर्गातील प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश होणार असल्यास शाळांनी त्याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालकांना द्यावी. त्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी ते प्रवेश नियमित करून द्यावेत, अशा स्पष्ट सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### २५ टक्के प्रवेश बंधनकारक

आरटीईच्या २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश न्यायालयाने अबाधित ठेवले आहेत. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाकडून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कोणत्याही परिस्थितीत वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक आहे. २५ टक्के राखीव जागांवर आधीच प्रवेश दिलेल्या शाळांनीही पहिली, पूर्वप्राथमिकच्या वर्गात वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचा आहे.




## कार्यगौरव ...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण पुणे विभागातर्फे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक दिगांबर दळवी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने कर्मचारी मार्गदर्शन तसेच कार्य गौरव सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते.

## महाराष्ट्र राज्याचे संचालक दिगंबर दळवी यांचे प्रतिपादन

# चांगले काम करताना दूरदृष्टी विकसित करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयटीआयमध्ये पूर्वी अनेक त्रुटी होत्या परंतु आता मेरिट डावलून प्रवेश मिळत नाही, गुणवत्तेवरच प्रवेश मिळतो. काळानुरूप कार्य पद्धतीमध्ये बदल आणि सुधारणा करणे गरजेचे आहे. त्याच धर्तीवर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या दृष्टीने बदलासाठी आपण सक्षम व्हायला पाहिजे तरच देश खऱ्या अर्थाने समृद्धीकडे जाईल. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणात पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावसायिक अभ्यासक्रम समांतर पद्धतीने चालायला पाहिजेत, असे मत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक दिगांबर दळवी यांनी व्यक्त केले.

> आयटीआय आणि कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी जी मुले येतात ती अत्यंत सामान्य परिस्थितीतील असतात. पालक विश्वासाने या मुलांना आपल्याकडे पाठवतात त्या मुलांना चांगले शिक्षण घेऊन पालकांचा विश्वास सार्थ केला पाहिजे. देशात सक्तीचे शिक्षण मिळते परंतु शिक्षणासोबत सक्तीची नोकरी देखील मिळाली पाहिजे तरच देशातील व्यवस्था टिकेल. नाहीतर भविष्यात अनेक सामाजिक प्रश्न उभे राहतील. काम करताना आपली दूरदृष्टी विकसित करा म्हणजे चांगले काम होईल.
> — दिगंबर दळवी

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण पुणे विभागातर्फे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक दिगांबर दळवी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने कर्मचारी मार्गदर्शन तसेच कार्य गौरव व कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

## चेतनानंद महाराज यांचे मार्गदर्शन

# अहंकार आणि लोभापासून लांब रहा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शरीराला काही विकार असतात तसेच मनाला देखील असतात. पूर्वी दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारे लोक होते. परंतु आता स्वतःच्या दुःखावर देखील लोक काम करत नाहीत त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढू लागले आहे. आज अशी परिस्थिती आहे की दुसऱ्यांचे सुख पाहून अनेकांना हिमालयाएवढे दुःख होते. हे योग्य मार्गावर आणण्याचे काम संतांनी केले. आपल्यामध्ये खूप अहंकार आहे, तो संपवण्यासाठी संतांजवळ जायला पाहिजे. मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी लोभ आणि अहंकार दूर ठेवायला पाहिजे. असे मत श्री क्षेत्र भंडारा डोंगर जगद्गुरुकृपांकित डॉ.पंकज उर्फ चेतनानंद महाराज यांनी व्यक्त केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे चातुर्मासानिमित्त आयोजित प्रवचन व कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ज्ञानोबा-तुकोबांचे मानसशास्त्र या विषयावर ते बोलत होते. स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण आदी उपस्थित होते.

संताचे तत्वज्ञान आणि चरित्र हे शेवटी आपल्या मनापाशी येऊन थांबते. आपले मन किती समर्पित, शांत आणि स्थितप्रज्ञ आहे यावर लौकिक आणि पारलौकिक दोन्ही जगाचे यश-अपयश अवलंबून आहे , असे डॉ.पंकज उर्फ चेतनानंद महाराज म्हणाले.

## कोरेगाव पार्कमधील स्थानिकांचा आक्रोश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोरेगाव पार्क :** परिसरात असलेल्या पॉप्यूलर हाईटस-2 या इमारतीची कंपाउंड वॉल कोसळलीय. परवा झालेल्या मुसळधार पावसामुळे ही संरक्षण भिंत शनिवारच्या रात्री एक वाजताच्या सुमारास कोसळलीय. मात्र त्यानंतर आता या इमारतीच्या मागचा भाग देखील कोसळायला सुरुवात झाली आहे. या इमारतीच्या मागच्या भागाला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे दोन्ही इमारतीतील ६० फ्लॅटमधील साधारत ३०० ते ४०० लोकांना स्थलांतरित करण्यात आल आहे.

आमच्या इमारतीमागे असलेली भिंत पुन्हा बांधून द्या, नाहीतर नुकसान भरपाई द्या, अशी मागणी रहिवासीयांकडून करण्यात येत आहे. पुण्यात झालेल्या पुरस्थितीला नदी सुशोभीकरण प्रकल्प जबाबदार असल्याचा आरोपही संतप्त स्थानिकांनी केला आहे. राहत असलेली जागा धोका टळेपर्यंत तात्काळ मोकळी करणे आवश्यक आहे.

आपल्या ताब्यातील जागा मोकळी करावी व जीवित आणि वित्त हानी टाळण्याचे दृष्टीने आमच्याशी सहकार्य करावे, अशा आशयाची महापालिकेने नोटीस पाठवली आहे.

## विधानसभा निवडणुकीच्या मैदानात मनसेकडून बाबर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**हडपसर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरु करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला होता. तसेच, राज ठाकरेंनी महायुतीच्या उमेदवारांसाठी राज्यात सभाही घेतल्या होत्या. आता निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतला आहे.

मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर बाबर मनसेकडून हडपसरच्या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. साईनाथ बाबर यांनी व्हाट्सअप स्टेटस ठेवत चर्चेला दुजोरा दिला. ठाकरे गटाकडून वसंत मोरे हडपसर विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असतील अशी चर्चा आहे. त्यामुळे आता बाबर आणि मोरे यांच्यात सामना रंगणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे.

## पुण्यातील रूबी हॉल क्लिनिकमध्ये नवीन तंत्र

# काही सेकंदातच आता 'सीटी स्कॅन'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील रूबी हॉल क्लिनिकमध्ये दक्षिण आशियातील सर्वात आधुनिक सीटी स्कॅन बसविण्यात आला आहे. स्कॅन करताना रक्तवाहिन्यांमधील अडथळे दिसण्यासाठी रुग्णाला ८० ते ९० मिली 'कॉंट्रास' दिला जात होता. तो आता ४० ते ५० मिली लागतो. त्यामुळे मूत्रपिंडावर कॉंट्रास होणारा दुष्परिणाम कमी करता येतो. तसेच, त्यातून होणारे रेडिएशन कमी आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केल्यामुळे त्याची गुणवत्ता निश्चित वाढली असल्याचे डॉ. महादेवकर यांनी स्पष्ट केले.

> नवीन 'एमआरआय' हा त्रिमितीय आहे. गुंतागुंतीच्या रुग्णांचा स्कॅन करण्यासाठी हा 'एमआरआय' अत्यंत उपयुक्त आहे. त्यातून मिळणारे चित्र सुस्पष्ट असते. मेंदूचा 'एमआरआय'साठी अवघे पाच मिनिटे लागतात. यापूर्वी किमान २५ ते ३० मिनिटे लागत होती. हा वाचलेल्या वेळात रुग्णावर उपचार सुरु होऊ शकतात. काही रुग्णांमध्ये भूल देऊन स्कॅन करावा लागत होता. ती गरज या नवीन तंत्रामुळे राहिली नाही. — डॉ. प्रणव महादेवकर
> रेडिओलॉजी विभागप्रमुख, रूबी हॉल क्लिनिकग

रुग्णाचा स्कॅन करायचा म्हणजे किमान २० ते २५ मिनिटे लागतात. पण, अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असलेल्या नवीन 'सीटी स्कॅन' हा अवघ्या काही सेकंदामध्ये होणार आहे. त्यामुळे लवकर निदान आणि वेगाने उपचार करणे शक्य आहे. तसेच, 'एमआरआय'चा वेळही पाच मिनिटांपर्यंत कमी झाला आहे. यासाठी रुग्णांना कोणतेही जास्तीचे पैसे मोजावे लागणार नाहीत. अशी दोन्ही आधुनिक उपकरणे बसविणारे रूबी हॉल क्लिनिक हे देशातील पहिले रुग्णालय ठरले आहे. याबाबत रूबी हॉल क्लिनिकचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ ग्रँट यांनी माहिती दिली.

अपघात झालेल्या रुग्णाच्या पूर्ण शरीराचा सीटी स्कॅन करावा लागतो. अवघ्या १५ ते १६ सेकंदांमध्ये हा सीटी स्कॅन होत असल्याने रुग्णाला नेमके काय झाले आहे, त्यावर उपचार कोणते करावे लागतील, याची माहिती नेमकेपणाने कळते, असे देखील डा्य ग्रँट यांनी सांगितले.

#रा

# ‘सर्वोच्च’ नकार

वैद्यकीय प्रवेशांसाठी राष्ट्रीय पातळीवर घेतली जाणारी यंदाची नीट –युजी ही परीक्षा कमालीची वादग्रस्त ठरली असली तरी ती रद्द करण्या स वोंच्च न्यायालयाने नकार दिला आहे. परीक्षेचे पेपर नियोजनबद्ध पद्धतीने लीक झाले होते हे सांगणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने म्हटले आहे. त्यामुळे परीक्षेच्या पावित्र्यावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही म्हणून न्यायालयाने पुन्हा परीक्षा घेण्याचा आदेश देण्यास नकार दिला. परंतु या प्रकरणाची चौकशी सुरू राहील. जर एखाद्या विद्यार्थ्याला चुकीच्या पद्धतीने फायदा होत आहे असे दिसल्यास त्या विद्यार्थ्याला नंतर शिक्षा दिली जाईल. फेरपरीक्षा घेतली तर २० लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेवरही परिणाम होईल. एकूणच वैद्यकीय शिक्षणावरही त्याचा परिणाम होईल तसेच भविष्यात डॉक्टरांचा तुटवडा निर्माण होईल. समाजातील निम्नस्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्यांचेही या प्रक्रियेत नुकसान होईल. या कारणांमुळे संपूर्ण नीट परीक्षा रद्द करणे योग्य होणार नाही असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर परीक्षेच्या निकालातही फरक पडणार आहे. कारण एका प्रश्नाबद्दल गोंधळ आहे.एका प्रश्नात २ आणि ४ हे दोन्ही पर्याय योग्य आहेत असे मार्क करणाऱ्या विद्यार्थ्यांना एनटीएने गुण दिले आहेत. त्यासाठी न्यायालयाने आयआयटी दिल्लीला याबद्दल स्पष्टीकरण मागितले होते. सुमारे ४.२ लाख विद्यार्थ्यांनी चुकीचे उत्तर दिले होते. पण त्यांना एनटीएने गुण दिले होते. आता त्यांना हे गुण गमवावे लागणार आहेत. आयआयटीने एक समिती स्थापन करून गोंधळ टाळण्यासाठी पर्याय ४ हे या प्रश्नाचे योग्य उत्तर आहे असा निर्वाळा दिला. त्यामुळे आता परीक्षेचा निकाल बदलणार आहे. आमचा आदेश नीट परीक्षेचे पावित्र्य समोर ठेवून देण्यात आला आहे असे न्यायालयाने म्हटले आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याची काही तक्रार असेल तर कायदेशीर मार्गाने जाण्यासाठी तो स्वतंत्र आहे. असे विद्यार्थी त्यांच्या मागण्या घेऊन उच्च न्यायालयात जाऊ शकतात, त्यांना तो हक्क आहे असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. केंद्र सरकारने स्थापन केलेल्या सात सदस्यीय समितीकडे ते आपला अहवाल पाठवतील असेही न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार एनटीएद्वारे घेतल्या जाणाऱ्या नीट–यूजी आणि इतर परीक्षा प्रक्रिया मजबूत करण्याचे आणि भविष्यात अशा चुका टाळण्याचे काम होऊ शकेल. नीट–यूजी परीक्षेत १५६३ विद्यार्थ्यांना देण्यात आलेले ग्रेस मार्क रद्द करून त्यांची पुनर्परीक्षा घेणार असल्याचे एनटीएने १३ जूनला सुप्रीम कोर्टात सांगितले होते.सुप्रीम कोर्टात १३ जूनला नीट–यूजी परीक्षेसंदर्भातील तीन याचिकांवर सुनावणी झाली. वेळेचे नुकसान झाल्याचे कारण देत १५६३ विद्यार्थ्यांना मनमानी पद्धतीने ग्रेस मार्क देण्यात आले होते असा आरोप करत परीक्षा रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. नीट परीक्षेचा निकाल ४ जूनला जाहीर करण्यात आला. विविध कारणांमुळे देशभरातील विद्यार्थ्यांनी या निकालावर आक्षेप घेत, परीक्षेचे आयोजन योग्य प्रकारे करण्यात आले नसल्याने परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करण्यात आली होती. महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनीही नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी अशी मागणी केली होती. नीट परीक्षेचा पेपर फुटला, त्यात काही गैरप्रकार झाले हे उघड आहे. या परीक्षेचे गांभीर्य आणि पावित्र्य घालवल्याचा ठपका ही परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेवर ठेवण्यात आला. मात्र, नीट–यूजी परीक्षेचा निकाल जाहीर करू नये तसेच ही परीक्षा रद्द करून नव्याने परीक्षा घेण्यात यावी ही मागणी व्यवहार्य आणि शहाणपणाची नव्हती. देशभरातील वैद्यकीय प्रवेशाच्या १ लाख ८ हजार जागांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती.सुमारे २४ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. परीक्षेचा निकाल जाहीर न करता परीक्षाच रद्द करून नव्याने परीक्षा घेण्यात यावी ही मागणी वर्षभरापासून या परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी तसेच त्यात प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे सहभागी असलेले त्यांचे पालक यांच्यावर अन्यायकारकच होती. नव्याने परीक्षा घ्यायची म्हटले की त्याच्या तयारीसाठी किमान एक महिन्याचा वेळ जाणार आणि परीक्षेचा निकाल जाहीर करण्यासाठी पुन्हा महिनाभराचा कालावधी लागणार. त्यामुळे वैद्यकीय प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक कोलमडले असते. उशिरा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असते. तो अन्य विद्यार्थ्यांच्या मागे पडतो. त्यामुळे परीक्षेचा निकाल रोखून परीक्षा रद्द करावी तसेच नव्याने परीक्षा घ्यावी, ही मागणी रोगापेक्षा उपचार भयंकर अशा स्वरूपाची ठरली असती. दुसरे म्हणजे नव्याने परीक्षा घेतली असती तर पुन्हा पेपर फुटणार नाही,गैरप्रकार होणार नाहीत याची खात्री कोण देणार होते? पेपरफुटीला आळा घालण्यासाठी केंद्राने नुकताच कायदा केला आहे. मात्र, कायदा पाळण्याची इच्छाशक्ती आणि मानसिकता असेल तरच कायदा उपयोगी ठरतो. आपल्याकडे कायद्यातून पळवाटाच अधिक शोधल्या जातात. तसेच गुन्हेगार कोण हे बघूनच यंत्रणा कार्यरत होतात. मग कायदा राबविला जाणार कसा? पैशाने कुठलीही परीक्षा विकत घेता येते हे कटु वास्तव आहे. परीक्षांमधील घोळ हा देशाच्या तरुणाईच्या भवितव्याशी खेळला जाणारा धोकादायक खेळ आहे. त्यामुळे देशाचे, तरुणाईचे नुकसान होणार आहे. तरुणाई पेटून उठली तर होणारा गदारोळ थांबवता येणार नाही.

**जागतिक तापमानवाढीमुळे होणाऱ्या हवामान बदलांमुळे ऋतूचक्र बदलत चालले आहे. विशेषतः मान्सूनवर याचा मोठा परिणाम होत असून कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये बंगळुरु, चेन्नई, मुंबई यांसारख्या महानगरांमध्ये यामुळे कशा प्रकारचा हाहाःकार उडाला हे देशाने पाहिले. आता या यादीमध्ये पुण्याचाही समावेश झाला आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या अतिपावसामुळे पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आणि अनेक रहिवासी भागांत पहिल्या मजल्यापर्यंत पाणी शिरले. याखेरीज विदर्भातील भंडाऱ्यातही पावसाचा असाच फटका बसला. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली–कोल्हापूर जिल्ह्यांवर महापुराची टांगती तलवार यंदाही कायम आहे. दरवर्षी पावसाळ्यात हे प्रकार का घडताहेत? त्यावर उपाय काय असू शकतात?**

# सर आली धावून, नियोजन गेले वाहून!

**राजीव मुळ्ये, पर्यावरण अभ्यासक**

साधारण दोन दशकांपूर्वी जेव्हा जगभरातील पर्यावरणतज्ज्ञ ग्लोबल वॉर्मिंग या विषयाबाबत पोटतिडकीने जगाला सावध करत होते तेव्हा त्याकडे फारसे कुणी गांभीर्याने पाहिले नाही. उलट विकासाचे शत्रू म्हणून त्यांना हिणवण्यात आले. पण जसजशी वर्षे सरली तसतसे या इशाऱ्यातील मर्म जगाला कळू लागले. जागतिक तापमानवाढ हाताबाहेर गेल्यामुळे हवामानात झपाट्याने बदल होत असून सृष्टीवरील ऋतूचक्र बदलत चालल्याचे, नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत चालल्याचे आता अखिल मानवजातीला उमगले आहे. याचे कारण हवामान बदलांचे दृश्य परिणाम आता उंबरठ्यापर्यंत येऊन ठेपले आहेत. युरोप, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, जपान, चीन, बांगला देश, श्रीलंका, मालदीव यांबरोबरीने भारतही आता जागतिक तापमानवाढीच्या झळांनी ग्रस्त होत चालला आहे. अवकाळी पाऊस, ढगफुटी, चक्रीवादळे, भूकंप यांसारख्या पूर्वी दुर्मिळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घटना आता नित्याच्या झाल्या आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि मानवासह संपूर्ण जीवसृष्टी जगवण्यासाठी आवश्यक असलेल्या मान्सूनचा लहरीपणा जलवायू परिवर्तनामुळे कमालीचा वाढला आहे. पूर्वी १०० दिवसांत पडणारा पाऊस आता ५० दिवसांत पडत आहे. कमी काळात जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढल्यामुळे नद्यांना अचानक येणारे पूर, जलमय होणारे परिसर, पाणी साचून कोलमडून पडणारी शहरे, नागरिकांचे स्थलांतर, पुराच्या पाण्याच्या वेढ्यामुळे होणारी प्रचंड मोठी वित्तहानी, जीवितहानी या सर्व प्रकारांनी पावसाळा हा आल्हाददायक ठरणारा ऋतू गाजत चालला आहे.

यंदाच्या वर्षी अल निनोचा प्रभाव कमी राहणार असल्याने मान्सूनचा पाऊस दमदार राहणार असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला होता. तथापि, जून महिना आणि जुलै महिन्याचे दोन आठवडे या काळात महाराष्ट्रातील कित्येक भागात मान्सूनने दडी मारल्याचे दिसून आले होते. परिणामी, धरणांमधील पाणीपातळी तळाकडे निघाली होती. पुण्या–मुंबईसारख्या महानगरांमध्ये पाणीकपातीचे संकट ओढावण्याची वेळ येणार अशा अटकळी अगदी दोन आठवड्यांपूर्वीपर्यंत बांधल्या जात होत्या आणि त्यादृष्टीने नियोजनाची जबाबदारी असणारे प्रशासन कामालाही लागले होते. परंतु २२ जुलैपासून जोर धरलेल्या पावसाने असा काही तडाखा दिला की या दोन महानगरांमधील तलाव, धरणे काठोकाठ भरण्यासमीप येऊन पोहोचली; तर काही धरणे ओव्हरफ्लो झाली. सर्वसामान्यांच्या दृष्टीने पुढील आठ–दहा महिन्यांची पाण्याची चिंता यामुळे मिटल्यामुळे हा पाऊस आनंददायी ठरला असेल यात शंका नाही. परंतु एकाएकी प्रचंड प्रमाणात पडलेल्या या पावसामुळे नागरी जीवन कोलमडून पडले. विशेषतः पुण्याच्या घाटमाथ्यावर दोन दिवस पावसाने तुफान बॅटिंग केली. परिणामी पुण्याला पाणीपुरवठा करणारे खडकवासला धरण तुडुंब भरले आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू झाला. दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसात हे धरण भरते आणि पाण्याचा विसर्गही होतो. साधारणतः १० ते ३० हजार क्युसेक्सपर्यंत टप्प्याटप्प्याने हा विसर्ग वाढत जातो, हा दरवेळचा अनुभव. परंतु यावेळी पाऊसच इतका प्रचंड झाला की एका रात्रीत खडकवासला धरणातून ३० ते ४० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग एकाएकी सुरू झाला. यामुळे पुण्यातील मुठा नदीचे पाणी पात्राबाहेर आले आणि सिंहगड रोड परिसरातील काही भागातील नागरी वस्त्यांमध्ये शिरले. धरणातून येणारा पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्यामुळे काही क्षणात पाणीपातळी झपाट्याने वाढत गेल्यामुळे या भागातील नागरिकांची प्रचंड कोंडी झाली. एकाएकी घरांमध्ये पाणी आल्यामुळे आधी जीव वाचवायचा की जीवापाड मेहनत करुन जमवलेल्या संसारसाहित्याचा बचाव करायचा याबाबतची घालमेल जीवघेणी असते. जमेल तशा परिस्थितीत स्वतःबरोबरच कुटुंबियांना घेऊन पाणी आलेल्या भागातील नागरिकांनी बाहेर पडण्यास सुरुवात केली. आपत्ती व्यवस्थापनाची टीमही यासाठी तैनात करण्यात आली. परंतु या सर्वांमध्ये अनेक घरांचे मोठे नुकसान झाले आहे. चारचाकी वाहनांसह अनेक मौल्यवान वस्तूंची हानी झाली आहे. साहजिकच या नागरिकांकडून शासन–प्रशासनाच्या कार्यपद्धीवर असंतोष आणि त्रागा व्यक्त केला जात आहे. माध्यमांच्या पडद्यावरुन उभ्या देशाने पुण्यातील हे जलतांडव पाहिले असेल. या घटनेनंतर आता दोषारोपांचे सत्र सुरू झाले आहे. मुंबईमध्ये २६ जुलै २००५ रोजी २४ तासांत ४५० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतर झालेल्या जलप्रलयानंतरही अशाच प्रकारचे दोषारोप सुरू झाले होते. यंदाही मुंबईमध्ये पाऊस आणि त्यानंतरचे आरोप–प्रत्यारोपांचे राजकारण रंगताना दिसले. इकडे पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांमधून वाहणाऱ्या नद्यांना महापूर आल्यामुळे तेथेही अशाच प्रकारे जनजीवन विस्कळीत झाले आहे. राधानगरी धरण पूर्ण भरल्यामुळे पंचगंगा नदी धोक्याच्या पातळीकडे सरकत आहे. सुदैवाने कोयना धरणातून मोठा विसर्ग या काळात झालेला नाहीये; अन्यथा पुन्हा एकदा या दोन्ही जिल्ह्यांत महापुरामुळे हाहाःकार उडाला असता.

दरवर्षी पावसाळ्यात घडणाऱ्या या घटनांनंतर त्यांची मिमांसा करताना धरणातील पाणीपातळी व्यवस्थापनाचा मुद्दा चर्चेत येतो. यंदा पुण्यातही खडकवासलातून होणाऱ्या विसर्गावरुन वाद सुरू आहेत. वस्तुतः कोणत्याही धरणाची उभारणी ही शास्त्रोक्त पद्धतीने केली जाते. त्याच्या पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या पावसामुळे धरणामध्ये किती पाणी पातळी वाढू शकते, ते किती पातळीपर्यंत साठवून ठेवायचे, धरणातून विसर्ग करण्यासाठीची यंत्रणा या सर्व गोष्टी सूत्रबद्ध पद्धतीने आणि शास्त्राच्या आधारावर सुरू असतात. पण मुख्य प्रश्न निर्माण होतो तो धरणातून विसर्ग करण्यात आलेले पाणी पुढे प्रवाहित होत असताना येणाऱ्या अडथळ्यांमुळे. आज पुणे असो किंवा कोल्हापूर, सांगलीचा भाग असो किंवा मुंबईतील मिठी नदी असो, या नद्यांच्या प्रवाहामध्ये किती मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत, याची मोजदाद करता येणार नाही. पुण्यामध्ये तर काही भागांत नदी आहे की नाही हेदेखील समजू शकणार नाही अशा प्रकारे रहिवासी इमारती, संकुले उभी राहिली आहेत. नदीच्या काठावर किती अंतरापर्यंत बांधकाम असू नये याबाबत कायदे आणि नियम आहेत. पण ते सरकारी दफ्तरातील फायलींमध्ये बंद आहेत. प्रत्यक्ष जमिनीस्तरावर नदीच्या प्रवाहांमध्ये अतिक्रमणे करुन इमारती उभ्या केल्या आहेत आणि तिथे नागरीक राहात आहेत. शक्य होईल तिथे ओढे बुजवून किंवा त्यांच्या प्रवाहात भराव टाकून बांधकामे उभी केली जात आहेत. जे नद्यांचे तेच टेकड्यांचे. पुणे परिसरातील टेकड्या कापून उभ्या राहिलेल्या इमारती या धोक्याच्या ज्वालामुखीवर आहेत. असे असूनही अव्याहतपणाने आणि राजरोसपणाने नवी बांधकामे उभी राहाता आहेत. अशा स्थितीमध्ये धरणातून मोठा विसर्ग झाल्यास पाणी प्रवाहित कसे होणार? पुढे जाण्याचा मार्ग बंद झाला की जिथे जागा मिळेल तिथे पसरत जाणे हा वाहत्या पाण्याचा गुणधर्म आहे. त्यामुळे घडलेल्या प्रकाराबाबत निसर्गाला दोष देणे किंवा धरण व्यवस्थापनावर आरोप करणे हा सोयीचा मार्ग झाला. प्रत्यक्षात मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर किंवा अन्य महानगरांमध्ये, शहरांमध्ये अशा प्रकारच्या जलआपत्तींमध्ये होणाऱ्या वित्तहानीस निसर्गाचे दोहन करुन उभी राहिलेली बेकायदा किंवा अनधिकृत बांधकामे कारणीभूत आहेत. अतिक्रमण विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पूरनियंत्रणासाठीची यंत्रणा, कायदे, नियम सर्व असूनही प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे संकटे गंभीर होत चालली आहेत. याबाबत चर्चा–विचारविनिमय, समित्यांची नेमणूक हा सर्व आता औपचारिकतेचा भाग बनला असून तो केवळ दिखाऊपणा ठरत आहे. समित्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांची अमलबजावणीच होणार नसेल तर संकटांची पुनरावृत्ती घडणे अटळ आहे.

एकंदरीत, या सर्व प्रकारांकडे पाहताना दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. एक म्हणजे नदीपात्रांसंदर्भातील नियमांची काटेकोर अमलबजावणी करुन अनधिकृत, अतिक्रमित बांधकामे– मग ती कोणाचीही असोत– तातडीने हटवली गेली पाहिजेत आणि नद्यांचे मार्ग मोकळे झाले पाहिजेत. तसे झाल्यास अतिपावसामुळे होणारे नुकसान टाळणे शक्य होईल. दुसरी महत्त्वाची आणि व्यापक गोष्ट म्हणजे, आजच्या वातावरणीय बदलांना निसर्गाचा ऱ्हास हे मुख्य कारण आहे. अशा स्थितीत निसर्गावर कुऱ्हाड चालवून आपण शहरांचा विकास करण्याचा, विकासाच्या नावावर मोठमोठे प्रकल्प आणून वनसंपदेचा नाश करण्याचा, वृक्षराजी तोडून रस्तेनिर्मिती करण्याचा मार्ग कधीपर्यंत अनुसरणार आहोत? यातून आपली वाटचाल विकासाकडे होत नसून विनाशाकडे होत आहे. येणाऱ्या काळात ग्लोबल वॉर्मिंगच्या झळा अधिक तीव्र होत जाणार आहेत. आज दिसणारा ट्रेलरच जर इतका भयावह असेल तर उद्याच्या भविष्यातील संकट किती मोठे असू शकते याची कल्पना करुन मानवाने भानावर येणे गरजेचे आहे. अन्यथा...


## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

सोमवार, दिनांक २९ जुलै २०२४ आषाढ कृ. ९, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू नक्षत्र : भरणी, योग : गंड, करण : तैतिल वणिज जयरामबाबा(भामटी) महाराज पुण्यतिथी सूर्योदय : स.०६.१७ सूर्यास्त : सायं.०७.१३ वा. राहू काळ : सकाळी : ७:३० ते ९:००

### दिनविशेष

*१३५० : संत नामदेव महाराज अनंतात विलीन झाले. *१९०१ : पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा स्मृतिदिन. त्यांच्या प्रयत्नांमुळे १८५६ मध्ये विधवा विवाहास परवानगी देणारा कायदा झाला.*१९०४ : टाटा उद्योगसमूहाचे माजी प्रमुख, पहिले भारतीय परवानाधारक वैमानिक जहांगिर रतनजी दादाभाई टाटा ऊर्फ जे.आर.डी. टाटा यांचा जन्म. *१९०७ : स्काऊट चळवळीची सुरुवात. *१९५३ : भजनगायक अनुप जलोटा यांचा जन्म. ‘ऐसी लागी लगन’, मीरा हो गयी मगन अशी त्यांनी गायलेली अनेक भजने लोकप्रिय आहेत. *१९५८ : नासा या अमेरिकी अवकाश संशोधन संस्थेची स्थापना. *१९९६ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी अरुण असफअली यांचे निधन. *व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांचा भोज या गावी जन्म.



### राशीभविष्य

* **मेष** : कष्टाच्या मानाने मोबदला कमी मिळेल. ***वृषभ** : संततीचा सहवास लाभेल. *मिथुन : कामात शिथीलता येईल. ***कर्क** : गाठीभेटी, प्रवास, पत्रव्यवहार इ. साठी खूप धावपळ होईल.***सिंह** : कुटुंबात मनमानी कराल.***कन्या** : उत्साहाने कामे कराल. ***तुळ** : खर्च वाढेल. कामे रखडतील. ***वृश्चिक** : आर्थिक लाभा होतील. *धनु : मानसन्मान लाभेल.***मकर** : वरिष्ठांची मर्जी सांभाळा. ***कुंभ** : सर्दी–पडसे, थकवा जाणवेल. ***मीन** : महत्त्वाचे निर्णय घेताना संबंधितांशी चर्चा करा.

### मेसेज आया

**अकबर बादशहा** : अरे बिरबल मला सांग आपल्या स्टाफ पैकी सर्वात चांगलं काम करणारा कसा ओळखायचा?

**बिरबल** : महाराज मी सर्वांना बोलावून घेतो व मग ठरवू. बिरबल सर्वांना बोलावतो व एकाचा हात पकडून म्हणतो, महाराज हाच तो... महाराज... कशावरुन? बिरबल... महाराज मी याचा मोबाईल चेक केला. याच्या मोबाईलची बॅटरी ९८% आहे.

### व्यक्तीविशेष

**आर. डी. टाटा**

पद्मविभूषित जे. आर. डी. टाटा यांचा जन्म २९ जुलै १९०४ रोजी पॅरिस येथे झाला. जहांगीर रतनजी दादाभाई टाटा हे भारतात विमान चालकाचा परवाना मिळविणारे पहिले मानकरी. दि. ३ मे १९३० रोजी जे.आर.डी. नी कराची ते मुंबई हे पहिले विमान उड्डाण केले. नंतर ऑक्टोबर १९३२ मध्ये टाटा एअरलाईन्स या कंपनीची हिंदुस्थानात स्थापना कील. १९४६ मध्ये स्थापन केलेल्या एअर इंडिया लिमिटेड व १९४८ मध्ये स्थापन केलेल्या एअर इंडिया इंटरनॅशनल लिमिटेड या कंपन्यांचे ते अध्यक्ष होते. जे.आरा.डी. १९३८ पासून टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष होते. याशिवाय ते भारतीय अणुऊर्जा आयोग व इंडियन एअरलाईन्स व अन्य संस्थांचे सदस्य होते. जे.आर.डी. भारतीय विज्ञान संस्थेच्या विधिसभेचे अध्यक्ष, टाटा एनर्जी रिसर्चचेही अध्यक्ष होते. जे.आर.डींचे की नोट हे आत्मवृत्त प्रसिद्ध आहे.

### जिज्ञासा

**शोध पॉलिस्टरच्या कृत्रिम धाग्यांचा**

आज नायलॉन, टेरेलिन, पॉलिएस्टर हे कपड्यांचे प्रकार आपल्याला अगदी परिचित आहेत. झटपट धुता येणारे, चटकन वाळणारे आणि फारशी इस्त्रीची गरज नसणारे हे कपडे चांगलेच लोकप्रिय बनले आहेत. पॉलिस्टरच्या साड्या, पॅन्ट्स शर्टस् सर्वांना माहितच आहेत. पॉलिस्टर हे एक बहुमुलक आहे. त्याला इंग्रजीत पॉलिमर असे म्हणतात. पॉलिस्टर पॉलिमरचे श्रेय वॅलॅक हूमॅकॅरोथर्स या रसायनशास्त्राचे अमेरिकन शास्त्रज्ञांकडे जाते. त्यांनी पॉलिस्टर धाग्यांचा शोध



एका वेगळ्याच प्रयोगातून लावला. १९३० मध्ये करोथर्स यांनी ग्लायकाल आणि ॲरोमॅटीक हे आम्ल एका भांड्यात एकत्र केले. त्यास ढवळण्यासाठ एक काचेचा दांडा वापरायला घेतला. ढवळता ढवळता त्यांनी तो सहज बाहेर काढला. तर एक मोठी गंमत त्यांच्या नजरेला दिसली. हा दांडा बाहे काढल्यानंतर भांड्यातील मिश्रण आणि दांडा यामध्ये खूप धागे तयार झालेले दिसले. विशेष म्हणजे हा दांडा जसा दूर नेला तसे हे धागेही अधिक लांबीचे होऊ लागले. या धाग्यांना चमक होती. झळाळी होती आणि तन्यताही होती. पुढे या संशोधनात त्यांनी अधिक लक्ष घालून पॉलिस्टर धाग्याची निर्मिती केली. त्यांच्या या सहज निरीक्षणातून एका मोठ्या वस्त्रप्रकाराची निर्मिती झाली आणि मानव जातीला टिकावू असे कापड मिळाले. पॉलिस्टर धाग्यांपासून पुढे अनेक वस्तू बनवल्या जावू लागल्या.

### व्यक्तिमत्व

**तणाव**

ते म्हणाले, ‘नापास तर नापास’ आपण काय एकटेच नापास झालो आहोत का? आपल्या सोबत हजारो मुले नापास झाली आहेत. एवढं काय मनाला लावून घ्यायचंय? एक दोन विषय राहिले आहेत, ते पुढ्या परीक्षेत काढून टाकू. त्यांच्या दृष्टीकोन असा असल्यामुळे ते तणावाच्याही आहारी गेले नाहीत आणि त्यांना आत्महत्या करण्याचीही गरज पडली नाही. याचा अर्थ नीट लक्षात घेतला पाहिजे. बारावी नापास होणे ते तणावाचे किंवा आत्महत्येचे कारण नाही. त्या घटनेकडे बघण्याचा दृष्टीकोन हे आत्महत्येचे कारण आहे. हा मुद्दा केवळ नापास होण्याच्या घटनेला लागू आहे असे नाही. आपल्या तणाव निर्माण करणाऱ्या सगळ्याच घटनांना लागू आहे. तेव्हा तणावाच्या संदर्भात आपल्या मनात एक समज निर्माण झाली पाहिजे. अनेक घटना, अनेक समस्या, अनेक पेच आणि विविध प्रसग आपल्या मनात तणावाची पेरणी करतात. तो तणाव वाढला की आपल्याला मनोमन असं वाटून जाते की, या घटना घडल्याच नसत्या तर आपल्याला तणावाचा सामनाच करावा लागला नसतात. आपले हे म्हणणे वरकरणी बरोबर वाटते पैशाची अडचण आली नसती तर तणाव कशाला निमाण झाला असता? वाद–विवाद स्पर्धेत दुसराच क्रमांक आला पण त्याऐवजी पहिला क्रमांक आला असता तर तणाव कशाचा वाढला असता? निवडणुकीत पराभूत झालो नसतो तर कशाला वाढला असता तणाव? सकाळी उठल्या उठल्या बायकोशी भांडउ झाले नसते तर तणाव टळला असता? मित्राकडून आज नक्की पैसे मिळणार होते पण ते मिळाले नाहीत. तसे झाले नसते आणि पैसे मिळाले असते तर तणाव टळला असता. या सगळ्या घटनांनी तणाव निर्माण केला. त्या घडल्या नसत्या तर तणाव टळला असता. पण आपल्या आयुष्यातल्या या घटना टळणार नाहीत. या सगळ्या घटना आपल्या दैनंदिन व्यावहारिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. (क्रमशः)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक १७८**

| | | | |
|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 |
| | | | 3 |
| | | 1 | 4 |
| 1 | 4 | 3 | |

**क्रमांक १७७ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 1 | 4 | 3 |
| 4 | 3 | 2 | 1 |
| 3 | 4 | 1 | 2 |
| 1 | 2 | 3 | 4 |

### महिलायन

## स्वच्छता किचन गॅजेट्सची

अत्याधुनिक स्वयंपाकघर वेगवेगळ्या किचन गॅजेट्सशिवाय चालूच शकत नाही, अशी सध्याची परिस्थिती आहे. कारण बदलत्या जीवनशैलीमुळे आपले स्वयंपाकघरदेखील बदलले आहे. गृहिणींच्या कामामध्ये अतिशय महत्त्वाची मदत करणारे वेगवेगळ्या किचन गॅजेट्स ही आजची गरज बनले आहे. कारण आजच्या धावपळीच्या जगात या किचन गॅजेट्सशिवाय कुठलेही काम चटकन होऊ शकत नाही. म्हणूनच अशा या मदतनीसांची योग्य वेळी योग्य काळजी घेतली तर ते दीर्घकाळ आपल्याला साथ देतात



स्वयंपाकघरात मिक्सर ही नित्यनियमाने लागणारी वस्तू. मिक्सरचे ज्यूसचे भांडे साबणाच्या पाण्याने स्वच्छ करावे. जास्त चिकटपणा असल्यास गरम पाण्यामध्ये डिटर्जंट पावडर टाकून ते पाणी एकदा मिक्सरवर फिरवून घ्यावे. यामुळे ब्लेड जवळच्या कोपऱ्यातलाही चिकटपणा निघून जातो.

मिक्सरमध्ये कुठलाही पदार्थ बारीक करताना एकाच वेळी जास्त वेळ ते फिरवू नये. त्यामुळे आतील मशीन गरम होऊन त्यातील पार्टस जळू शकतात. मिक्सरच्या भांड्यामध्ये भाजलेला ब्रेड किंवा रवा टाकून फिरवल्यास चिकट पदार्थ किंवा भांड्याच्या आतील चिकटपणा सहज निघतो. एक–दोन महिन्यांच्या अंतराने मिक्सर काही तास कडक उन्हामध्ये ठेवावे. यामुळे त्याच्या आतील भागात वाढणारी झुरळे किंवा तत्सम किटक नष्ट होतात. (पूर्वार्ध)

### गंमतग्यान

## दवबिंदू कसे तयार होतात ?

थंडीत पहाटेच्या वेळी हिरव्या पानांच्या पृष्ठभागावर पाण्याचे छोटे छोटे थेंब तुम्ही पाहिले असतील. मोत्यासारख्या चमकणाऱ्या या बिंदूंना दवबिंदू असे म्हणतात. हे दवबिंदू बघून बऱ्याच जणांना असे वाटते की, पावसाच्या पाण्यामुळे हे बिंदू रात्री आकाशातून पडले असावेत, पण हा समज चुकीचा आहे. आपल्या सभोवताच्या हवेत पाण्याची वाफ असते. ज्याला आपण आर्द्रता किंवा दमटपणा असे म्हणतो. गरम हवेत गार हवेपेक्षा जास्त आर्द्रता असते. रात्रीच्या वेळी गरम हवा एखाद्या थंड पृष्ठभागाच्या संपर्कात येते आणि हवेतील वाफेचे पाणी होते आणि हे पाणी छोट्या छोट्या थेंबाच्या रूपात गार पृष्ठभागावर जमा होतात. यालाच आपण दवबिंदू असे म्हणतो. एका छोट्याशा प्रयोगाद्वारे आपण दवबिंदूची निर्मिती करू शकतो. (पूर्वार्ध)

‘राष्ट्र संचार’ हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# प्लास्टिकच्या जन्माचे गूढ

जगभरात सध्या प्लास्टिकच्या कचऱ्याने गंभीर समस्या निर्माण केलेली आहे. प्लास्टिकचे पाण्यात किंवा मातीत विघटन होत नाही, त्यामुळे हा कचरा तसाच साठून किंवा पडून राहतो व तो पर्यावरणासाठी, सजीवांसाठी हानिकारक ठरतो. याच कारणामुळे सध्या 'प्लास्टिकमुक्ती'च्या वेगवेगळ्या मोहिमा जगभरात सुरू आहेत. मात्र हेच हानिकारक प्लास्टिक निर्माण कसे झाले, हे अनेकांसाठी कुतूहलाचे आहे.



वैज्ञानिक लियो बेकलँड यांनी लावला प्लास्टिकचा शोध

बेल्जियममध्ये जन्म झालेल्या अमेरिकेतील वैज्ञानिक लियो बेकलँड यांनी प्लास्टिकचा शोध लावला. त्यांचे वडील अशिक्षित होते व त्यांना मुलाला घरगुती व्यवसायात आणायचे होते; पण आईच्या मदतीने लियो यांनी नाईट स्कूलमध्ये शिक्षण घेतले. लियो यांनी अमेरिकेतील आपल्या शिक्षकाच्या मुलीशी वयाच्या २० व्या वर्षी लग्न केले. यांनी आपल्या घरीच एक लॅब तयार केली, जेथे त्यांनी १९०७ साली फॉरमलडेहाईड आणि फेनॉलसारख्या रसायनांच्या मदतीने प्लास्टिकची निर्मिती केली. 'टाइम' मॅगझीनला दिलेल्या मुलाखतीत लियो बेकलँड यांनी म्हटले होते की, हे ना जळणार ना विरघळणार! बेकलँड यांच्या म्हणण्यानुसार, हा आविष्कार भविष्यासाठी महत्त्वाचा ठरेल कारण तोपर्यंत प्लास्टिक लोकप्रिय होत चालले होते. पण आज हेच प्लास्टिक निसर्गासाठी हानिकारक आहे. शताब्दीनंतर प्लास्टिकचे उत्पादन २० पट वाढले आहे. हे प्लास्टिक आज पृथ्वी आणि मानवासाठी घातक ठरत आहे. प्लास्टिक समुद्रात पोहोचल्यामुळे त्याचा जैविक घटकांवर विपरीत परिणाम होत आहे.



# चर्चा च्युईंगम वॉलची

अंधश्रद्धाळू माणसं जगाच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. अगदी अमेरिकेसारख्या प्रगत देशातही मुर्ख समजुती असलेली अशी माणसं आहेतच. त्याचे एक प्रतीक म्हणजे तिथे असलेली 'च्युईंगम वॉल'! या भिंतीवर लोकं चघळलेले च्युईंगम चिकटवतात. असं म्हणतात, या ठिकाणी च्युईंगम चिकटवल्यास तुमच्या सर्व मागण्या पूर्ण होतात! या भिंतीची काय अवस्था झालीये, हे सोबतच्या छायाचित्रावरून दिसते.

च्युईंगमने चिकटवली ५० फूट लांब आणि ८ फूट उंच भिंत

च्युईंगमने भरलेली ही भिंत सिएटल या ठिकाणी आहे. ही भिंत ५० फूट लांब आणि ८ फूट उंच आहे. एका मीडिया रिपोर्टनुसार या भिंतीवर जवळपास अडीच टनापेक्षा अधिक च्युईंगम लोकांनी चिकटवले आहेत. अन्? आता या भिंतीला लोकं 'गम वॉल' म्हणूनच ओळखतात. या भिंतीवर च्युईंगम चिकटवण्याची सुरुवात १९९३ साली झाली होती. सुरुवातीला ही एक सामान्य भिंत होती. या भिंतीच्या आवारात एक मुव्ही थिएटर होतं. या थिएटरमधील दोन कर्मचाऱ्यांनी एके दिवशी भिंतीवर च्युईंगम चिकटवला. त्यानंतर जणू त्यांना या भिंतीवर च्युईंगम चिकटवण्याची सवयच लागली. मग या कर्मचाऱ्यांसोबत येणारे इतर सहकर्मचारी देखील या भिंतीवर च्युईंगम चिकटवू लागले.अन्? पुढे हळूहळू इतर लोकंसुद्धा चघळलेले च्युईंगम या ठिकाणी चिकटवू लागले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पाहता पाहता एक टनापेक्षा अधिक च्युईंगम या भिंतीवर चिकटवले गेले होते. हे च्युईंगम काढून भिंत स्वच्छ करण्यास सफाई कर्मचाऱ्यांना तब्बल ५ महिने लागले.



# दिवस होतोय मोठ्ठा!

गेल्या काही वर्षांमध्ये हवामान बदलाची समस्या गंभीर बनलेली आहे. वैश्विक ग्लेशियर्स, बर्फाचे स्तर वेगाने वितळत असल्याने समुद्राच्या पाण्याची पातळीही वाढत आहे. मात्र, त्यामुळे दिवसाचा कालावधी मोठा होण्याच्या क्रियेतही वेग आलेला आहे. एका नव्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, ध्रुवीय बर्फ वितळल्याने पृथ्वी अधिक धिम्या गतीने फिरू लागली आहे. त्यामुळे दिवसाच्या लांबीमध्ये 'अभूतपूर्व' अशी वाढ होत आहे.

**हवामान बदलामुळे दिवसाची वाढली लांबी**

'नासा'च्या जेट प्रॉपल्शन लॅबोरेटरीच्या सुरेंद्र अधिकारी यांनी सांगितले की, ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकामधील वाहणाऱ्या पाण्यामुळे भूमध्य रेषेच्या आसपास अधिक वस्तुमान आहे. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेज' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. ईटीएच ज्युरिखच्या बेनेडिक्ट सोजा यांनी सांगितले, सर्वसाधारणपणे पृथ्वीला पूर्ण गोलाकार रूपाने पाहिले जाते. मात्र, ती लंबगोलाकार आहे. भूमध्य रेषेच्या आसपास तिचा आकार फुगीर आहे. टेक्टॉनिक प्लेटस्च्या हालचाली, भूकंप आणि ज्वालामुखी यांच्यामुळे त्यामध्ये बदल होत असतो. सन १९०० पासून गोळा केलेल्या डेटाच्या सहाय्याने आता नवे संशोधन करण्यात आले आहे. त्यावरून असे दिसून आले की, विसाव्या शतकाच्या काळात हवामान बदलामुळे दिवसाची लांबी प्रतिशतक ०.३ आणि १.० मिलिसेकंदाने वाढली आहे. सन २००० नंतर हा दर वाढून १.३३ मिलिसेकंद प्रतिशताब्दी झाला आहे. हा महत्त्वपूर्ण बदल पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वस्तुमानाच्या गतीशी निगडित आहे. विशेषतः ध्रुवीय बर्फ आणि ग्लेशियर्स वितळल्याने हे घडले आहे, ज्यामध्ये गेल्या काही दशकांच्या काळात वेग आला आहे. वितळणाऱ्या बर्फापासून महासागरांपर्यंत वस्तुमानाच्या पुनर्वितरणाने पृथ्वीच्या आकारात बदल होतो. त्यामुळे ती थोडी चपटी होते. म्हणजेच मध्यभागी अधिक फुगीर होऊन ध्रुवीय भागात दबली जाते. वस्तुमानातील हा बदल ग्रहाच्या फिरण्याच्या क्रियेवरही बदल करतो. त्यामुळे दिवसाची लांबी अधिक होते.

# कहाणी दुधाच्या बारची!

आफ्रिकेत कुरुहिम्बी आणि रवांडातील शेकडो बारमध्ये केवळ एकच पेय मिळतं ते म्हणजे दूध! नाश्त्यासाठी किंवा दुपारच्या जेवणासाठी एकत्र येण्याकरता, भिन्न पार्श्वभूमी असलेल्या लोकांमध्ये मिसळण्याकरता या दुग्धालयांचा उपयोग होतो. भल्यामोठ्या धातूच्या पिंपातून ग्लासमध्ये ओतलेलं थंडगार फेसाळ 'इकिवुगुटो' (आंबवलेलं दूध) आणि त्यावर घातलेला मध वा साखर, किंवा मग कपातून समोर आलेलं गरम 'इन्श्युश्यू' (उकळवलेलं कच्चं दूध)– हे इथलं पेय.



इथले बार म्हणजे नाक्यावरच्या अड्ड्यासारखे वाटू शकतात; पण रवांडातील संस्कृतीमध्ये अंगभूत महत्त्व असलेल्या गाय व दूध या घटकांबाबतचं फारसं ज्ञात नसलेलं सत्य सांगणाऱ्या या खुणा आहेत. रवांडातील ७० टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रामध्ये सक्रिय आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात गाय हे आर्थिक संपत्तीसोबतच सामाजिक स्थानाचंही चिन्ह ठरतं. रवांडामध्ये पूर्वीपासूनच गायीचं दूध प्यायलं जात असलं, तरी इतिहासकाळी दूध ही अत्यंत मूल्यवान गोष्ट असल्यामुळे ते निषिद्ध मानलं जात होतं आणि त्याची विक्री करणं 'शरमे'ची बाबही होती. राजा मिबावब्वे गिसानुरा यांच्या आदेशानुसार सतराव्या शतकारंभी गायी व दूध राखून असणारी उच्चभ्रू कुटुंबं त्यांच्याकडील दूध गरीब शेजाऱ्यांसोबत वाटून घेऊ लागली. रवांडामध्ये विसाव्या शतकारंभी दूध विक्री सुरू झाली. त्यावेळी इथे जर्मन साम्राज्य होते.

रवांडावासीयांना जर्मन पूर्व आफ्रिकेचा भाग म्हणून रस्ते, शाळा व चर्च बांधण्याकरिता दीर्घ अंतर चालत जाणं भाग पडत असे. जर्मनांसोबत प्रवास केलेले युगांडा व टांझानिया इथले व्यापारी मजुरांना दूध विकू लागले. कामाच्या ठिकाणांजवळ राहणाऱ्या स्थनिकांकडून हे व्यापारी दूध विकत घेत असत आणि आपल्या घरांपासून दूर असणाऱ्या मजुरांना पोषण मिळवण्यासाठी दुधाचा उपयोग होत असे. दूध विकत घेणं किंवा विकणं निषिद्ध नसल्याचं रवांडावासीयांच्या लक्षात आलं. त्यानंतर त्यांनी एकमेकांना दूध विकायला सुरुवात केली. पहिल्यांदा खुल्या मैदानातील बाजारपेठांमध्ये ही विक्री होत असे आणि सुमारे १९०७च्या आसपास हेच काम पत्करलेल्या बंदिस्त दुकानांमध्ये दूध विक्री सुरू झाली. आधुनिक काळातील मिल्क–बारचे हे पूर्वसुरी होते.

# मधउत्पादनातील अव्वल देश


जगातील अनेक देश मोठ्या प्रमाणात मधाचे उत्पादन करतात. पण जगात सर्वाधिक मध उत्पादन करणारा देश तुम्हाला माहितेय का? तर छोटासा असणारा न्यूझीलंड हा देश मध उत्पादन आणि निर्यातीत आघाडीवर आहे. हा देश सुमारे २७५ कोटी रुपयांचा मध निर्यात करतो. भारतातही मधाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. जाणून घेऊयात मध उत्पादनात आघाडीवर असणाऱ्या देशांची माहिती.



भारतात मधाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो; पण मध निर्यातीच्या बाबतीत भारत जगात ९ व्या क्रमांकावर आहे. देशातील उत्तर प्रदेश, गुजरात, पंजाब, बिहार आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांमध्ये मधाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. जगात सर्वाधिक मध निर्यात न्यूझीलंड करतो. या छोट्या देशाने २०२२ मध्ये ३३३.३४ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २७५ कोटी रुपयांचा मध निर्यात केला. जगातील नैसर्गिक मध निर्यातीत न्यूझीलंडचा वाटा सुमारे १२ टक्के आहे. मनुका मध निर्यात करणारा न्यूझीलंड हा जगातील एकमेव देश आहे. मधमाशा हा मध विशेष प्रकारच्या फुलापासून बनवतात. यामध्ये अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म आढळतात. या कारणास्तव, जगभरातील अनेक देशांमध्ये याला मोठी मागणी आहे. ते खूप महाग विकले जाते. भारतात त्याच्या ३५० ग्रॅम पॅकची किंमत सुमारे ४००० रुपये आहे. न्यूझीलंडच्या एकूण मध निर्यातीच्या कमाईमध्ये मनुका मधाचा वाटा ८२ टक्के आहे. मध निर्यातीच्या बाबतीत न्यूझीलंडनंतर चीनचा दुसरा क्रमांक लागतो. चीन दरवर्षी सुमारे २२९.६ दशलक्ष डॉलर्सचा मध निर्यात करतो. चीनमध्ये दरवर्षी ५००,००० टन मधाचे उत्पादन होते. जगातील एकूण मध उत्पादनापैकी एक चतुर्थांश मधाचे उत्पादन चीनमध्ये होते. या यादीत अर्जेंटिना तिसऱ्या क्रमांकावर आहे. या देशातून दरवर्षी सुमारे ७५००० टन मधाची निर्यात होते.

# पृथ्वीवरचा 'अज्ञात' कालखंड

आपल्या रत्नगर्भा, सर्व जीवांचा आधार असलेल्या धरणीमातेचा सुरुवातीपासूनचा इतिहास जाणून घेण्यासाठी संशोधक सातत्याने प्रयत्न करीत असतात. पृथ्वीचा हा इतिहास तिच्यामधील वेगवेगळ्या स्तरांमधून जाणून घेतला जातो. पृथ्वीच्या इतिहासातील अनेक कालखंडांच्या खुणा त्यामध्ये सापडत असतात. मात्र, एका विशिष्ट कालखंडाच्या अशा कोणत्याच खुणा अद्याप सापडलेल्या नसल्याने या काळाबाबतचे संशोधकांचे कुतूहल वाढलेले आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर असलेले खडक एका पुस्तकासारखे असतात. पर्वत, दऱ्या, आणि इतर भौगोलिक प्रदेश या पुस्तकाच्या पानांसारखे असतात. एकेका पानात तुम्हाला कळतं की तुमच्यासमोर आज जे चित्र उभं राहिलंय ते कधी आणि कसं बनलं. पृथ्वीच्या पृष्ठभागावरचे खडकांमधले वरवरचे थर म्हणजे गोष्टीच्या पुस्तकाची पहिली पानं. जसजसे थर खोलवर जातात पृथ्वीच्या इतिहासाचा कालखंडही मागे मागे सरकतो. पण, जर या पानांमधली काही पानंच गायब असतील तर? पुस्तकातला हा अध्याय वाचताच आला नाही, तर संपूर्ण कथा कशी कळणार? पृथ्वीच्या भूगर्भशास्त्रीय नोंदीच्या बाबतीत असंच काहीसं झालं आहे. पृथ्वीवरच्या खडकांच्या सर्वात नव्या आणि सर्वात जुन्या खडकांच्या थरांमध्ये खूप मोठं अंतर आहे. अमेरिकेच्या भूगर्भशास्त्र संस्थेनुसार (एजीयू) हे अंतर १ अब्ज वर्षं इतकं मोठं असू शकतं. भूगर्भशास्त्रातल्या सर्वात मोठ्या कोड्यांपैकी हे एक कोडं आहे. युनिव्हर्सिटी ऑफ कोलोराडोच्या भूगर्भशास्त्र विभागात संशोधन करणाऱ्या बारा



पीक यांचं म्हणणं आहे की, '१ अब्ज वर्षं म्हणजे पृथ्वीच्या इतिहासाचा जवळपास एक चतुर्थांश भाग. एवढ्या मोठ्या कालखंडात पृथ्वीवर काय झालं, याची नोंदच नाहीये. कोणालाच माहिती नाही, या काळात पृथ्वीवर काय घडत होतं ते.' भूगर्भशास्त्रात कोणत्याही कालखंडाला समजून घ्यायचं असेल, तर खडकांच्या थरांचा अभ्यास केला जातो. प्रत्येक खडकात थर असतात. वरचा थर सर्वांत नवा असतो आणि सर्वांत खालचा खर सगळ्यांत जुना. हे थर आणि या थरांच्या जागा आपल्याला सांगतात की, त्या भागातली माती कधी आणि कशी बनली. खडकांच्या थरांच्या या अभ्यासाला स्ट्रेटिग्राफी म्हणतात. यावरून कळतं की कोणताही थर तयार होत असताना त्या काळातली पृथ्वी कशी असेल. खडकांमधले हे थर स्पष्ट दिसतील अशी जागा एक प्रसिद्ध जागा आहे, अमेरिकेतली ग्रँड कॅनियन. इथल्या खडकांमधली प्रत्येक आडवी रेष स्पष्ट दिसते आणि हे थर कधी, कोणत्या परिस्थिती बनले असतील, याचा अभ्यास करता येतो. ग्रँड कॅनियनच्या अभ्यासावरूनच कळलं की पृथ्वीच्या इतिहासातला भलामोठा कालखंड गायब आहे. भूगर्भशास्त्रज्ञ जॉन वेस्ली पॉवेल यांनी पहिल्यांदा या खडकांचं निरीक्षण करून, हा निष्कर्ष काढला.

# १५ कोटींची पिस्तुले!

जुन्या व प्रसिद्ध व्यक्तींच्या वस्तूंच्या लिलावाला खूप चांगला प्रतिसाद मिळतो, हे आजवर अनेकदा दिसून आले. याचे महत्वाचे कारण म्हणजे हौशी व्यक्ती अशा वस्तूंना हवी तितकी किंमत मोजण्यासाठी तयार असतात. प्रसिद्ध फ्रेंच राज्यकर्ता नेपोलियन बोनापार्ट याच्या २ पिस्तुलांचा अलीकडेच फ्रान्सच्या फॉनटेनब्लियूमधील ओसेनॅट ऑक्शन हाऊसमध्ये लिलाव झाला, त्यावेळीदेखील याचाच प्रत्यय आला. साधारणपणे अडीचशे वर्षांपूर्वीही दोन पिस्तुले थोड्याथोडक्या नव्हे, तर चक्क १५ कोटी रुपयांना विकली गेली.



अडीचशे वर्षांपूर्वीची ही दोन पिस्तुले १.८३ मिलियन अमेरिकन डॉलर अर्थात १५ कोटी रुपये किमतीला विकली गेली. या पिस्तुलांना १.३ मिलियन अमेरिकन डॉलरची किंमत मिळेल, अशी आयोजकांची अपेक्षा होती. पण, त्यापेक्षाही अधिक किंमत त्यांना मिळाली. या लिलावाचे आयोजक जीन पियरे ओसेनट यांनी ही पिस्तुले नेपोलियन यांच्या सत्तेचा नाश, त्यागाचे प्रतिनिधित्व करतात, असे नमूद केले. १८१४ मध्ये नेपोलियन यांच्या सेनेला युद्धात हार पत्करावी लागली होती. त्यानंतर नेपोलियन यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले होते. हा पराभव त्यांच्या जिव्हारी लागला होता, असे इतिहासकार सांगतात. नेपोलियनचा जन्म कोर्सिका येथे झाला. जन्माने फ्रेंच नसला तरी नेपोलियन हा आपल्या महान कर्तृत्वाच्या जोरावर फ्रेंच सम्राट झाला. त्याने कारकिर्दीची सुरुवात फ्रेंच सैन्यामध्ये अधिकारी म्हणून केली. त्याच्या इटली, ऑस्ट्रियामधील मोहिमांमुळे तो लवकरच सैन्यात मोठा अधिकारी बनला. फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंत त्याने सरसेनापतीपद हस्तगत केले. त्याने १८व्या शतकाच्या अंतामध्ये फ्रान्सवर आक्रमण करणाऱ्या अनेक आघाड्यांना परास्त केले. १८०४ मध्ये तो फ्रान्सचा सम्राट बनला. त्याने युरोपमधील बहुतेक सर्व राष्ट्रांविरुद्ध युद्धे पुकारली होती.

# टोमॅटोच्या बिया... किंमत तीन कोटी!

टोमॅटोचे वाढते भाव सर्वसामान्यांसाठी चिंतेत भर घालणारे असतात, असे म्हटले तर ते गैर ठरू नये. काही कालावधीपूर्वी याच टोमॅटोचे भाव अक्षरश: गगनाला भिडले आणि त्यामुळे स्वयंपाकघरातून टॉमेटो जणू हद्दपारच झाला. पण, जगात टोमॅटोची बरीच विविधता आहे आणि इतके कमी की काय, म्हणून एका टोमॅटोच्या जातीतील बियांची किंमत आलिशान कारपेक्षाही अधिक महागडी आहे. वाचून आश्चर्य वाटेल, पण या खास टोमॅटोच्या बियांची किंमत थोडीथोडकी नव्हे, तर चक्क तीन कोटी रुपयांच्या घरात आहे. टोमॅटोच्या एक किलो बियांची किंमत ३ कोटी रुपये हजेरा जेनेटिक्सने विकलेल्या टोमॅटोचा हा किस्सा आहे. टोमॅटोच्या या प्रकाराच्या एक किलो बियांची किंमत ३ कोटी रुपये आहे. मीडिया रिपोर्टस्नुसार, खास बियांसाठी ओळखला जाणारा हाजेरा टोमॅटोच्या सुधारित बियांसाठी ओळखला जातो. आजकाल त्याच्या खास उन्हाळी सूर्य टोमॅटोच्या बिया अनेक लोक खरेदी करत आहेत, त्याच्या किमतीत अनेक किलो सोने खरेदी केली जाऊ शकते. विशेष म्हणजे टोमॅटोच्या एका बीपासून २० किलो टोमॅटोचे पीक घेता येते. पिकापासून तयार होणारे टोमॅटो बिया नसलेले आता प्रश्न पडेल की, जी पिके घेतली जातात त्यांच्या बियांचे जतन का होत नाही? याचे उत्तर असे की, या पिकापासून तयार होणारे टोमॅटो हे बिया नसलेले असतात. त्यामुळे लागवड करताना प्रत्येक वेळी नवीन बियाणे खरेदी करावे लागते. या बियांचे जतन करण्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया राबवावी लागते आणि त्यामुळे त्याची किंमत बरीच महागडी आहे.



# मंगळ नेमका कसा आहे?

पृथ्वीचा शेजारचा ग्रह म्हणजे मंगळ. या लाल ग्रहाबाबत संशोधकांना नेहमीच कुतूहल वाटत आले आहे. हा पृथ्वीप्रमाणेच खडकाळ, कठीण पृष्ठभूमीचा ग्रह आहे. एकेकाळी मंगळावर वाहते पाणीही होते. मात्र, सध्या त्याचे बदललेले रूप दिसते. भविष्यात मंगळावर मानवी वसाहत स्थापन करण्याचे स्वप्न एलन मस्क यांच्यासारखे अनेक लोक पाहत आहेत. त्या पार्श्वभूमीवर या ग्रहाविषयीची ही रंजक माहिती...

**कसा आहे मंगळ?**

सौरमंडळातील सूर्यापासूनचा चौथा ग्रह म्हणजे मंगळ. हा एक धुळीने भरलेला, थंड आणि वाळवंटी असा ग्रह आहे. या ग्रहावरही ऋतुचक्र असते. ग्रहाच्या ध्रुवीय भागांमध्ये बर्फ असण्याची शक्यता संशोधकांना वाटते. मंगळावर निष्क्रिय ज्वालामुखी आणि दऱ्या, विवरे आहेत. या ग्रहावर सध्या मानवाने पाठवलेली अनेक रोव्हर फिरत असून, त्याच्याभोवती अनेक देशांचे ऑर्बिटरही फिरत आहेत. त्यामध्ये भारताच्या 'मंगळयाना'चाही समावेश आहे.



**मंगळावर कधी आला होता पूर?**

सुमारे ३.५ अब्ज वर्षांपूर्वी मंगळावर भीषण महापूर आला होता. मात्र, हे पाणी कुठून आले, किती काळ राहिले व कुठे गेले याची अद्यापही कुणाला माहिती नाही. मंगळावरील दरी ही पृथ्वीवरील सर्वात मोठ्या दऱ्यांपेक्षाही अनेक पटीने मोठी आहे. मंगळाच्या पृष्ठभागावर धुळीची वादळे निर्माण होत असतात. मंगळाच्या वातावरणातील दाब पृथ्वीच्या तुलनेत अतिशय कमी आहे. त्यामुळे तिथे जीवसृष्टीची शक्यता कमी आहे.

**युद्धदेवतेचे नाव :**

मंगळाला 'मार्स' हे इंग्रजी नाव रोमन युद्धदेवतेच्या नावावरून देण्यात आले आहे. मंगळाचा लाल रंग रक्ताच्या रंगाशी मिळताजुळता आहे. इजिप्तचे लोक त्याला 'हर डेसर' म्हणत असत, त्याचाही अर्थ 'लाल' असा होतो. मंगळाच्या मातीमध्ये लोह खनिज अधिक असल्याने त्याला असा लाल रंग मिळाला आहे.

**मंगळाबाबत संशोधन का?**

मंगळाबाबत सातत्याने जगभरातील अनेक स्पेस एजन्सीज संशोधन करीत असतात. तिथे जीवसृष्टी आहे का, एकेकाळी तिचे अस्तित्व होते का, हे यामधून तपासले जात आहे. लाखो वर्षांपूर्वी मंगळावर योग्य तापमान व वाहते पाणी होते. त्यामुळे तिथे सूक्ष्म जीवांच्या रूपाने का होईना जीवसृष्टी अस्तित्वात असावी, असे संशोधकांना वाटते. ३३९० किलोमीटरची त्रिज्या असलेला मंगळ पृथ्वीच्या आकाराच्या निम्मा आहे. सूर्याच्या प्रकाशाला मंगळापर्यंत पोहोचण्यासाठी तेरा मिनिटे लागतात.

**मंगळावरील वर्ष किती महिन्यांचे?**

आपल्या ग्रहमालिकेतील सर्व ग्रहांप्रमाणे मंगळही विशिष्ट कक्षेतून सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतो. सूर्याभोवतीची ही प्रदक्षिणा ६८७ दिवसांमध्ये पूर्ण करतो. याचा अर्थ पृथ्वीवरील २३ महिन्यांइतके त्याच्यावरील वर्ष असते.

# पूर्वी ऑलिम्पिकपटू, आता संन्यासी

आपल्या भारतभूमीत अनेकांनी वैराग्याचा मार्ग पत्करून परमार्थाची वाटचाल केलेली आहेत. पैसा, मानसन्मान, उच्च पद अशा अनेक गोष्टींचा मोह झिडकारून संन्यास घेतलेले अनेक लोक या भारतभूमीत पाहायला मिळतात. त्यामध्येच एका ऑलिम्पिक खेळाडूचाही समावेश आहे. त्यांचे संन्यासाश्रमातील नाव आहे स्वामी नतेशानंद. पूर्वाश्रमी ते अमरनाथ नागराजन या नावाने ओळखले जात होते. बास्केटबॉल खेळात त्यांनी ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

लाला अमरनाथ या महान क्रिकेटपटूच्या नावावरून त्यांच्या आईवडिलांनी 'अमरनाथ' हे नाव त्यांना दिले होते. ते लहानपणी एक उत्कृष्ट बॅट्समन आणि ऑफ स्पिनर होते. तामिळनाडूच्या थेनी जिल्ह्यातील पेरियाकुलम येथे राहणाऱ्या या युवा खेळाडूमध्ये हॉकी आणि ॲथलेटिक्समध्येही नैपुण्य होते. मात्र, वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी बास्केटबॉल खेळणे सुरू केले आणि याच खेळाने त्यांचे जीवन व्यापून टाकले. १९८० च्या मॉस्को ऑलिम्पिकमध्ये खेळणाऱ्या ऐतिहासिक भारतीय टीममध्ये त्यांचा समावेश होता. त्यावेळी भारतीय बास्केटबॉल टीमने समर गेम्समध्ये सहभाग घेतला होता. १९८२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ते बास्केटबॉल टीमचे कर्णधार होते. दहा वर्षांपूर्वी ते भारतीय स्टेट बँकेच्या सहायक महाप्रबंधक पदावरून निवृत्त झाले. २०१९ मध्ये पत्नीच्या मृत्यूनंतर वर्षभरातच त्यांनी संन्यास घेतला. तत्पूर्वी त्यांनी अनेक धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. सध्या ते कोईम्बतूरमध्ये राहतात.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष शहर कार्याध्यक्षपदी

# विशाल काळभोर यांची नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर कार्याध्यक्षपदी विशाल बाळासाहेब काळभोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्याध्यक्ष पदावर एका तरुण नेत्याची प्रथमच निवड झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आता तरूणांकडे नेतृत्व दिल्याचे बोलले जात आहे.

काळभोर यांना आमदार रोहित पवार, ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर व पक्षाचे आजी-माजी नगरसेवक व प्रमुख पदधिकारी(Pimpri) उपस्थित होते.

विशाल काळभोर यांनी यापूर्वी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहर सरचिटणीस, प्रदेश कार्यकारिणीमध्ये प्रदेश संघटक, प्रदेश सरचिटणीस नाशिक, पुणे आणि कल्याण डोंबिवलीचे प्रभारी त्यानंतर युवकचे ऑल महाराष्ट्र कॉर्डिनेशन आणि पिंपरी विधानसभा अध्यक्ष यासारख्या महत्त्वाच्या पदावर त्यांनी कामकाज पाहिले आहे. नियुक्तीनंतर बोलताना विशाल काळभोर म्हणाले की, पक्ष संघटनेतील महत्त्वाच्या अशा कार्याध्यक्षपदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. पक्ष नेतृत्वाने दाखविलेला विश्वास आपण सार्थ ठरवून दाखवू. आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत पक्षाला भरघोस पध्दतीचे यश मिळवून देण्यासाठी आपला अटोकाट प्रयत्न असेल.

> **● राजकारणात आत्तापर्यंत पक्षातील सहकारी मित्रांचे आणि कुटुंबातील सदस्यांचे वेळोवेळी सहकार्य मिळाले आहे. त्यामुळे आपण ही मजल मारू शकलो. भविष्यातही सर्व मित्र आणि सहकार्यांना सोबत घेऊन आपण पक्ष संघटनेत आणि सामाजिक जीवनात कार्य करत राहणार आहे.** — विशाल काळभोर

## वैष्णव काकडे सुवर्णपदकाचा मानकरी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव येथील वैष्णव शैलेश काकडे याने भारताचे प्रतिनिधित्व करताना आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी स्पर्धेत (IAAC) सुवर्णपदक पटकावले. कौशल्य आणि ज्ञानाचे प्रदर्शन करीत त्याने हे यश संपादन केले.

वैष्णव याने भारतीय हवामानावर एक पायोनियर संशोधन केले आहे. त्यासाठी त्यांनी गरीब कुटुंबांचे सर्व्हेशन केले होते. हे संशोधन भारताच्या हवामान बदलांवरील सखोल संशोधनाद्वारे अन्नविषयक समस्या सोडवण्याच्या उद्देशाने केले गेले आहे. या संशोधनाची नोबेल शांतता पुरस्कार विजेते सर नॉर्मन बोरलॉग यांनी प्रशंसा केली.वैष्णव याने प्रतिष्ठित आर्यभट्ट गणित स्पर्धा आणि भारतीय कला स्पर्धेत (IAC) दोन सुवर्ण पदके पटकावत आपल्या क्षमतांचे प्रदर्शन केले आहे. याशिवाय त्याने सामान्य सापेक्षतावादावर अत्याधुनिक संशोधन केले आहे. त्याचे अंतराळ संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान असून, इस्रोच्या आंतरराष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये भाग घेतला आहे.

» Selected




## नवजात जिवंत तरी स्मशान दाखला वायसीएम रुग्णालयाचा प्रताप

**पिंपरी :** प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या पिंपरीच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचा आणखी एक प्रताप समोर आलेला आहे. जिवंत नवजात बाळाचा स्मशान दाखला तयार करण्यात आल्याची धक्कादायक बाब घडली आहे. हा सर्व प्रकार २३ जुलैचा आहे. वायसीएम रुग्णालयात महिलेने नवजात बालकाला जन्म दिला. त्या नवजात बाळाला डॉक्टरांनी मृत घोषित केले. काही मिनिटांत त्याचा स्मशान दाखला तयार करण्यात आला. परंतु, नवजात बाळ हे जिवंत असून आयसीयूमध्ये उपचार घेत असल्याचे कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात आले आहे. संबंधित डॉक्टरांवर आता कारवाईची मागणी होत आहे. जिवंत नवजात बाळाला स्मशान दाखला दिल्याने नागरिकांमधून रोष व्यक्त केला जात आहे .२३ जुलै २०२४ रोजी महिलेने ५ वाजून २० मिनिटांनी बाळाला जन्म दिला. ते बाळ मृत जन्माला आल्याचे त्या कागदपत्रांमध्ये नमूद आहे. मग, संध्याकाळी ७ वाजून ३७ मिनिटाला त्या बाळाचा स्मशान दाखला तयार करण्यात आला. आयुक्त शेखर सिंह यांनी नुकतेच वायसीएम चे कौतुक केले, तर दुसरीकडे अशा प्रकारामुळे नाचक्की होत असल्याचे गंभीर चित्रसमोर आले..

## हिंजवडी, भोसरी, पिंपरी परिसरातील तीन गुन्हेगारी टोळ्यांवर मोका

**भोसरी:** हिंजवडी परिसरातील पगार टोळी, भोसरी परिसरातील दळवी टोळी आणि पिंपरी परिसरातील काळे टोळी या तीन गुन्हेगारी टोळ्यांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये (मोका) कारवाई करण्यात आली आहे. चालू वर्षात शहरातील २५ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण १४८ गुन्हेगारांवर मोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आरोपींनी हिंजवडी, भोसरी, एमआयडीसी भोसरी, महाळुंगे एमआयडीसी, पिंपरी, निगडी, गंगापुर, म्हसरुळ पोलीस स्टेशन हद्दीत खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, जबरी चोरी, दरोडा घालणे, पळवून नेऊन जबरी चोरी, घरफोडी, चोरी, वाहनाची तोडफोड करणे, सदोष मनुष्य वधाचा प्रयत्न करणे, बेकायदकशीर अग्निशस्त्रे व जिवघेणे हत्यारे जवळ बाळगणे, घातक शस्त्रे जवळ बाळगणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे केले आहेत. या तीन तोळ्यांवर मोकांतर्गत कारवाईचे आदेश अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी दिले आहेत.

## टोळीप्रमुखासह एकाला अटक

**पिंपरी :** तळेगाव दाभाडे येथे चार ठिकाणी हवेत गोळीबार करून पसार झालेल्या टोळी प्रमुखासह एकजणाला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकाने नवी मुंबईतून जेरबंद केले. २० जूनला हा प्रकार घडला होता. विवेक उर्फ विकी राजेश खराडे (वय २०, रा. रामलिंगरोड, कामाठीपुरा, शिरुर), पांडुरंग उर्फ पांडा बालाजी कांबळे (वय २४, रा. मु. पो. रामलिंग, तुकाई मळा, शिरूर) अशी आरोपींची नावे आहेत. या गोळीबार प्रकरणात यापूर्वी गुंडा विरोधी पथकाने रोहन उर्फ चिक्या उत्तम शिंदे, नीरज उर्फ दाद्या बाबू पवार व आदित्य नितीन भोईनल्लू यांना जेरबंद केले आहे. मात्र, या गुन्ह्यातील टोळीप्रमुख विकी खराडे हा फरार होता. दरम्यान, तो नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसी येथे असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार, पथकाने सापळा रचून खराडे व कांबळे यांना ताब्यात घेतले. या आरोपींना पुढील तपासासाठी तळेगाव दाभाडे पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. या आरोपींकडून पोलिसांनी दोन पिस्तूल व चार जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

## जुनी सांगवीतूनही दोन पिस्तुले जप्त

**जुनी सांगवी :** तळेगाव दाभाडे गोळीबार प्रकरणात जेरबंद केलेल्या आरोपींकडे तपास केला असता त्यांच्याकडे सांगवी परिसरात आणखी अवैध शस्त्रे असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार, गुंडा विरोधी पथक सांगवी परिसरात रवाना करण्यात आले. त्यानंतर, पथकाने जुन्या सांगवीतील प्रियदर्शनीनगर ते ममतानगर रस्ता येथून रोहित दुर्गेश धर्माधिकारी (वय २२) व अनिकेत सतीश काजवे (वय २८, दोघेही रा. प्रियदर्शनीनगर, जुनी सांगवी) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तूल व आठ जिवंत काडतुसे जप्त केली.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## मतदार नोंदणी मोहिमेला चांगला प्रतिसाद

**आकुर्डी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी मतदार नोंदणी मोहिम राबविण्यात येत असून नागरिकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विधानसभा निवडणूकीत मतदान करण्यासाठी १६ ऑगस्टपर्यंत मतदार नोंदणी करण्याची पात्र नागरिकांना संधी आहे. आकुर्डी येथील प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय आणि निगडी येथील डॉ.डी.वाय.पाटील महाविद्यालयात मतदार नोंदणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी आणि मतदानाच्या महत्वाविषयी माहिती देण्यात आली. चिंचवड येथील कै.नागनाथ मारुती गडसिंग (गुरुजी) कनिष्ठ महाविद्यालयातही विशेष मतदार नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले. भोर, सावित्रीबाई फुले कन्या शाळा सासवड, विश्रांतवाडी येथील पंचशील नगर, टिंगरे नगर येथील सरस्वती विद्यालय, मगरपट्टा, थेरगाव रुग्णालय, वेल्हे येथील जिल्हा परिषद शाळा, मुळशी येथील प्लॅटटिनम पार्क, आंबेगाव, खेड,आळंदी, मुळशी, आंबेगाव, चांडोली खुर्द, अवसारी खुर्द, भोसरी आदी विविध ठिकाणी मतदार नोंदणीचे अर्ज भरून घेण्यात आले.

> मतदारांना विशेष मोहिमेची माहिती देण्यासाठी 'स्वीप' अंतर्गत विविध जनजागृती उपक्रमदेखीलराबविण्यात येत आहेत. विशेषत: नवमतदारांना मतदार नोंदणीसाठी आवाहन करण्यात येत आहे. मतदार नोंदणीसोबत मतदार यादीतील तपशिलात दुरूस्ती करण्यासाठीदेखील शिबिरात अर्ज स्विकारण्यात येत आहेत. मतदार यादीत नाव नसल्यास किंवा तपशीलात बदल करायचा असल्यास नागरिकांनी या विशेष शिबिरात सहभाग घ्यावा किंवा जवळच्या मतदान केंद्रावर मतदान केंद्र अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा — **मीनल कळसकर**
> उप जिल्हा निवडणूक अधिकारी,

७२ कोटींच्या रस्त्याचे नियोजन : आमदार सुनील शेळके

# मावळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ संशोधन व विकास अंतर्गत मावळ तालुक्यातील सुमारे ७२ कोटी ३८ लक्ष निधीतील विकासकामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यातून मावळ मधील १० रस्ते विकसित करण्यात येणार आहेत, अशी माहिती आमदार सुनिल शेळके यांनी दिली आहे. आमदार सुनिल शेळके यांच्या पाठपुराव्यातून हा निधी आणि प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून ग्रामीण भागातील रस्ते विकासकामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल आमदार शेळके यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मावळच्या जनतेच्या वतीने आभार मानले आहेत.



### मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजुरी मिळालेले रस्ते व त्यासाठीचा मंजूर खर्च पुढीलप्रमाणे आहे.

'हे' रस्ते होणार विकसित

| | |
|---|---|
| कोथुर्णे ते वाघजाईवस्ती ते मळवंडी ठूले रस्ता | ८ कोटी ३८ लक्ष |
| राममा-०४ – वळक ते सांगिसे रस्ता | १० कोटी ४ लक्ष |
| इजिमा-६५ ते करंजगाव पाले ना. मा. उकसान रस्ता | १० कोटी ७१ लक्ष |
| इजिमा-६८ ते राजपुरी ते मंगरूळ रस्ता | ६ कोटी ७० लक्ष |
| चांदखेड ते कासारसाई रस्ता | ७ कोटी ६९ लक्ष |
| मळवली ते सदापुर ते राममा ०४ रस्ता | ९ कोटी २३ लक्ष |
| वाघेश्वर कादव ते ग्रामा-२८ चोरघेवस्ती ते शिंदेवस्ती रस्ता | ७ कोटी ५० लक्ष |
| प्रजिमा-१५७ ते चांदखेड रस्ता | ५ कोटी २० लक्ष |
| इजिमा-६५ ते करंजगाव ते वादरमाळ रस्ता | ३ कोटी २९ लक्ष |
| प्रजिमा-२६ काले कॉलनी ते दत्तवाडी-ढालेवाडी ते मालेवाडी रस्ता | ३ कोटी ५९ लक्ष |




अर्धवट कामाने नागरिकांच्या जीवाला धोका

## मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा: गव्हाणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूलाखालील अर्बन स्ट्रीटच्या अर्धवट स्थितीतील कामामुळे नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. यापूर्वी प्रशासनाला याबाबत वारंवार सूचित करण्यात आलेले असूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. यामुळे नुकतेच भोसरीतील एका निष्पाप नागरिकाला आपला जीव गमवावा लागला. यास जबाबदार ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे. अजित गव्हाणे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केली आहे. त्यांनी सांगितले की, अर्बन स्ट्रीट प्रकल्पावर ४२ कोटींहून अधिक खर्च करण्यात आला असूनही, कामाचा दर्जा निकृष्ट आहे आणि हे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. कठडे आणि त्यातील बाहेर आलेले लोखंडी गज नागरिकांच्या दुखापतीला कारण ठरत आहेत. शुक्रवारी, भोसरीतील गव्हाणे वस्ती परिसरात एका नागरिकाची गाडी स्लिप होऊन ते कठड्यांमधून बाहेर आलेल्या लोखंडी गजावर पडले. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अशा घटनांमुळे नागरिकांच्या जीवनावर गंभीर धोका निर्माण झाला आहे.

> ..अन्यथा आंदोलन
> **● अजित गव्हाणे यांनी संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच, भोसरी उड्डाणपूलाखाली धोकादायक ठिकाणी तातडीने सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**

## पावसामुळे धान्य वाटपात व्यत्यय

**पिंपरी :** ई पॉस मशिनला पावसाळा असल्यामुळे नेटवर्क मिळत नाही. परिणामी, स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे वाटप करताना अडचणी येत आहेत. पावसाळा संपेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने धान्यवाटप करण्याच्या परवानगीसाठी दुकानदार संघटना आग्रह धरत आहेत. मात्र, अद्याप शासनस्तरावर त्या बाबत निर्णय झाला नाही. परिणामी, शिधापत्रिकाधारक आणि दुकानदारांमध्ये वादावादीचे प्रसंग उद्‌भवत आहेत. अन्न धान्य वितरण व पुरवठा कार्यालयाच्या वतीने स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वाटपासाठी धान्याचा पुरवठा केला आहे. त्यानुसार दुकानदार धान्याचे वाटप करत आहेत. मात्र, सध्या ई-पॉस मशिनमधील तांत्रिक अडथळ्यांमुळे धान्य वाटपात अडथळे येत आहेत. शहरात विविध ठिकाणी धान्यवाटप सुरू आहे. ऑनलाइन आणि सध्या बोटांचे ठसे घेऊन धान्य देण्यात येते. परंतु, पावसामुळे धान्य वाटपात व्यत्यय येत आहे.

## शिवभोजन थाळी योजनेसाठी अद्याप प्रतिक्षाच

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** उद्योगनगरी असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात ठाकरे सरकारच्या काळात सुरु झालेली 'शिवभोजन योजना' महायुती सरकारच्या काळातही जोमात सुरू आहे. मात्र, कामगार संख्येच्या तुलनेत 'शिवभोजन थाळी केंद्रांची संख्या कमी आहे.

सध्या शहरात १८ शिवभोजन थाळी केंद्र सुरू आहेत. गेल्या पाच वर्षात केंद्राच्या संख्येत वाढ झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, विद्यार्थी-कामगारांना थाळी मिळत नसल्याचे चित्र आहे.

शहरातील १८ केंद्रांवरून १ हजार ७०० शिवभोजन थाळ्यांचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार गेल्या वर्षभरात सुमारे २० हजार ४०० जणांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. शहरात शिवभोजन केंद्रांच्या संख्येत वाढ करण्याची मागणी आहे. मात्र या केंद्रांना मंत्रालय स्तरावरूनच मान्यता दिली जाते. त्यामुळे नव्याने किती केंद्रांना मान्यता मिळालेली आहे, ही माहिती परिमंडळाकडून उपलब्ध होण्यास अडचण येत आहे. लाभार्थी संख्येच्या तुलनेत मंजूर शिवभोजन थाळींची संख्या कमी असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

केवळ ४२३ खड्डे बुजविण्याचे बाकी; पालिका प्रशासनाचा दावा

# रस्त्यावर खड्डे कि खड्डयात रस्ते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहर परिसरात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली असून, खड्डेच खड्डे पडले आहेत. शहरातील विविध रस्त्यांवर तब्बल २००३ खड्डे आढळून आले होते. त्यांपैकी १५८० बुजविले असून, केवळ ४२३ खड्डे असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

यंदा जूनअखेर पावसाला सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून शहरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत २००३ खड्डे आढळले होते. त्यांपैकी १६३९ खड्डे १३ जुलैपर्यंत आढळून आले होते. त्यानंतर २२ जुलैअखेर ३६४ खड्डे आढळून आले आहेत. यांपैकी डांबर आणि कोल्ड मिक्सने १०११, खडीने ३५६, पेव्हिंग ब्लॉकने ६६, सिमेंट कॉंक्रीटने १४७ असे १५८० खड्डे पूर्णतः बुजविले आहेत. शहरातील केवळ ४२३ खड्डे बुजविण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, सर्वत्र खड्डेच खड्डे दिसून येतात.



**नागरिकांचा संताप**
● शहरातील सर्वच भागांतील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. महापालिका प्रशासन पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजविण्यात अपयशी ठरले आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवावेत, अशी मागणी माजी नगरसेवक अमित गावडे यांनी केली.

> पावसामुळे डांबरीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे मुरूम, खडी आणि सिमेंट-कॉंक्रीटने बुजविले जातात. पावसाळा संपल्यानंतर सर्व खड्डे पुन्हा नव्याने डांबराने भरण्यात येणार आहे.
> — **मकरंद निकम**
> महापालिकेचे शहर अभियंता

#रा

## राष्ट्रीय लोक अदालतीत १ लाखाहून अधिक दावे निकाली

# पुणे जिल्हा राज्यात प्रथम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जिल्ह्यात प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ३३ हजार ६९५ प्रलंबित आणि ६६ हजार ८२२ वादपूर्व असे एकूण १ लाख ५१७ दावे निकाली काढून पुणे जिल्ह्याने राज्यात पुन्हा एकदा प्रथम स्थान पटकावले.

लोक अदालतीमध्ये बँकेचे कर्जवसूली २ हजार ७८०, तडजोड पात्र फौजदारी २५ हजार ९४७, वीज देयक १०१, कामगार विवाद खटले १००, भुसंपादन ४८, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण १३१, वैवाहिक विवाद ११३, निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट ३ हजार ४८, इतर दिवाणी ८७५, महसूल ७ हजार ५३७, पाणी कर ५४ हजार ७८ आणि इतर ५ हजार ७५९ प्रकरणे अशी एकूण १ लाख ५१७ प्रकरणे निकाली काढण्यात आले आहेत.



तडजोडीसाठी ठेवण्यात आलेल्या २ लाख ८० हजार ९६८ दाव्यापैकी १ लाख ५१७ दावे निकाली काढण्यात येऊन ४१९ कोटी २ लक्ष ४९ हजार ८३३ रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. वादपूर्व १ लक्ष ८२ हजार ११५ प्रलंबित प्रकरणांमधून ६६ हजार ८२२ प्रकरणे निकाली काढण्यात आली आणि यात ९० कोटी ६९ लक्ष ३८ हजार ८३३ तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. तर प्रलंबित ३ लाख ३० हजार ५८८ प्रकारणांपैकी ९८ हजार ८५३ सुनावणीसाठी घेण्यात आले. त्यातील ३३ हजार ६९५ प्रकरणे निकाली काढून ३२८ कोटी ३३ लक्ष ११ हजार ५० तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. अशाप्रकारे पुणे जिल्ह्याने राष्ट्रीय लोक अदालतीच्या आयोजनादरम्यान दावे निकाली काढण्यात अग्रेसर राहण्याची परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्याच्या सर्व न्यायालयातील अधिकारी-कर्मचारी, विविध विभागांचे अधिकारी आणि नागरिकांचे चांगले सहकार्य मिळाले आहे, अशी माहिती विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सोनल पाटील यांनी दिली आहे.

### लोक अदालतीला चांगला प्रतिसाद

● सोनल पाटील, विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर-लोक अदालतीच्या माध्यमातून न्याय तात्काळ मिळतो. पैसा आणि वेळेची बचत होते. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कोर्ट फी ची रक्कम परत मिळते. परस्पर संमतीने निकाल होत असल्यामुळे एकमेकातील द्वेष वाढत नाही आणि कटूताही निर्माण होत नाही. त्यामुळे लोक अदालतीला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

## वृक्ष तोड दोषींवर कायदेशीर कारवाई करावी : सौरभ पठारे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळगाव जोगा :** जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा येथील साग झाडांच्या अनधिकृत वृक्षतोडी बाबत जुन्नर वन विभागाने सखोल चौकशी करून यामधील दोषींवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे उपवनसंरक्षक जुन्नर यांच्याकडे करण्यात आलेली आहे.

सौरभ शाम पठारे (रा. खामगाव, जुन्नर) यांनी या बाबतचे निवेदन वन विभाग जुन्नर कार्यालयात सादर केले आहे. पिंपळगाव जोगा या ठिकाणी जमीन गट नं १४४ मध्ये ५०० साग झाडांची नोंद आहे. ही सर्व झाडे तोडीस लागू आहेत. यापैकी ३७८ झाडांना तोडीस परवानगी देण्यात आली असून १२२ झाडे सौरक्षित वन म्हणून राखीव ठेवण्यात आली आहेत. या झाडांच्या विक्रीबाबत प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर जागेवर तोडण्यात आलेली झाडे पाहिल्यानंतर व झाडावर असलेले नंबर आणि परवानगी दिलेली झाडे यामध्ये तफावत आढळून येत आहेत. तसेच झाडावर असलेले नंबर ४०० पेक्षा जास्त आहेत. तर काही झाडांना नंबर नाहीत.

यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या आदेशाचे पालन झालेले नाहीत. याठिकाणी फॉरेस्ट असून जास्तीची तोड यालगतच्या फॉरेस्ट मधून झाल्याची शंका आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येऊन यामधील दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे पठारे यांनी जुन्नर वनविभाग कार्यालयाकडे केलेली आहे.

## » Selected

### विल्यम्सचा परतीचा मार्ग खुला



**वॉशिंग्टन :** अंतराळात अडकलेल्या सुनीता विल्यम्सच्या परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बोईंगचे स्टारलाइन अंतराळयान लवकरच परतणार आहे. सुनीता विल्यम्स आणि बाक विल्मोर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकले आहेत. यानंतर या दोघांना परत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर उभ्या असलेल्या अंतराळयानाशी संबंधित काही महत्त्वाच्या चाचण्या करण्यात आल्या. उड्डाण संचालक कोल महरिंग यांच्या मार्गदर्शनाखाली ही चाचणी करण्यात आली. या चाचणीचे निकाल अतिशय सकारात्मक आले असून, यामुळे लवकरच अंतराळवीरांच्या पुनरागमनाची आशा निर्माण झाली आहे. याशिवाय पुढील आठवड्यात उड्डाण चाचणी तयारीचा आढावाही घेण्यात आला आहे. यामध्ये हॉट फायर टेस्टशी संबंधित डेटाची चाचणी केली जाणार आहे. मात्र, परतीची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

सुनीता विल्यम्स ऑगस्टमध्ये पृथ्वीवर परतणार असल्याचा अंदाज आहे. हे दोन्ही अंतराळवीर सात दिवसांच्या मोहिमेवर गेले होते. स्टारलाइन मानवी मोहिमेसाठी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी हे लोक स्टारलाइनरवर गेले. मात्र, अंतराळयानातील अडचणींमुळे ते नियोजितवेळी पृथ्वीवर परतू शकले नाहीत. दोघेही महिनाभराहून अधिक काळ अंतराळ स्थानकावरच अडकून पडले आहेत.

### पुजारी संघटनेची देवसंस्थानची चौकशी करून ट्रस्ट बरखास्त करण्याची मागणी

**जेजुरी :** अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत आणि जेजुरी येथील खंडोबाचे मुळस्थान म्हणून प्रचलित असलेल्या खंडोबा देवता लिंग कडेपठार ट्रस्ट विश्वस्त मंडळाच्या भ्रष्ट आणि मनमानी कारभाराची चौकशी करून सदरील ट्रस्ट बरखास्त करा अशी मागणी तक्रार याचिकेद्वारे श्रीक्षेत्र जेजुरी येथील पुजारी संघटनेच्या वतीने सहधर्मादाय आयुकत पुणे यांच्याकडे करण्यात आली आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे या देवसंस्थान मधील योगेश मथुरादास मोरे, नितीन शिवदास कदम या दोन विश्वस्तांनी स्वतंत्र्यपणे तक्रार याचिका दाखल केली आहे.

जेजुरी येथे राष्ट्रीय महामार्गापासून दक्षिण दिशेला जयाद्री डोंगर रांगेमध्ये ८००फूट उंचीवर कडेपठार खंडेरायाचे मूळस्थान असून येथिल मंदिराचे व्यवस्थापन व धार्मिक जत्रा यात्रा उत्सवांचे नियोजन करण्यासाठी पुजारी - सेवेकरी वर्गाचे (गुरव, घडशी, वीर, कोळी) यांचे वंशपरंपरेने चालत आलेले ७ जणांचे श्री . खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट हे मंडळ कार्यरत आहे .

१९५४ साली (रजि.अ.७२२) स्थापन करण्यात आलेल्या आणि वंशपरंपरेने चालत आलेल्या या ट्रस्टच्या कारभाराबाबत पुजारी मंडळातील अध्यक्ष माधव बारभाई , सदानंद बाळकृष्ण बारभाई, गणेश विठ्ठल मोरे, अनिल जनार्दन बारभाई, महेश रमाकांत आगलावे, आदींसह दोन विद्यमान विश्वस्तांनी सहधर्मादाय आयुक्त पुणे यांच्याकडे तक्रार केल्याने ग्रामस्थ व भाविकांमध्ये खळबळ माजली आहे. सदरील विश्वस्त मंडळ हे "४१ ड" नुसार मागील काळात बरखास्त केलेले असून उच्च न्यायालयात याचिका दाखल असून पूर्वपरवानगी न घेता बेकायदा धोरणात्मक निर्णय घेत न्यायालयाचा अवमान करत आहेत. सध्याच्या ट्रस्टचा कारभार बेकायदेशिरपणे मुलांच्या हातात सोपवला गेला असून त्या ट्रस्टमधील वयोवृध्द विश्र्वस्ताचा मुलगा मंगेश म्हाळसाकांत जेजुरीकर हे मनमानी करत मंदिरातील पुजारी वर्गाला नाहक त्रास देतात. पुजारी वर्गानेच केलेल्या याचिकेमुळे खंडोबा भक्तांमध्ये व स्थानिक ग्रामस्थांमध्ये खळबळ माजली आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मोहोळांच्या आदेशामुळे प्रशासन कामाला

**पुणे :** पुण्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबई सोडली. तर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिल्ली सोडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने आदेश देत नुकसान भरपाईचे पंचनामे करण्यास सांगितले. या तिन्ही नेत्यांच्या आदेशामुळे प्रशासन खळबळून जागे झाले.
आतापर्यंत ६० टक्के पंचनामे झाले आहेत. खडकवासला धरणातून ४० हजार क्यूसेक्स पाणी मुठा नदीत सोडण्यात आले. त्यामुळे सिंहगड रोड, एकतानगर, विठ्ठलवाडी, पुलाची पाटील इस्टेट, संगमवाडी परिसरातील नागरिकांच्या घरांत पाणी घुसले. त्यामुळे घरात होते नव्हते ते सगळेच वाहून गेले. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती नागरिकांना का करण्यात आली नाही, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. पुण्यातील पूर परिस्थिती ओळखून अजित पवार यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश दिले. मुरलीधर मोहोळ यांनी रात्री उशिरापर्यंत पूरग्रस्तांची पाहणी केली. जलसंपदा, पुणे महापालिका अधिकाऱ्यांनी सोबतीने काम करण्याचे आदेश दिले. खडकवासला धरणातून पाणी सोडण्यात आल्याची कल्पना जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला दिली होती. मात्र, महापालिकेने त्याकडे गांभीर्याने बघितले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. नैसर्गिक नाले, ओढे बुजविण्यात आले. नदीपात्रात राडारोडा टाकणे, अनधिकृत बांधकामे करणे यामुळे पाण्याचा निचरा झाला नाही. त्यामुळे हे पाणी सरळ नागरिकांच्या घरांत घुसले.

#### पूरग्रस्तांना तातडीने मदत : दिवसे

पूरग्रस्तांना तातडीने मदत देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी सांगितले. पूरग्रस्तांना तातडीने दाखले देण्यासाठी स्वतंत्र मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या नागरिकांना तातडीने मदत देण्यासाठी पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. रविवार पर्यंत हे पंचनामे पूर्ण होणार आहेत.

## तत्परता

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पूरग्रस्त भागातील स्वच्छताविषक कामे पूर्ण करण्यात आली असून रोगराई पसरू नये यासाठी जंतुनाशक फवारणीदेखील करण्यात आली आहे. पर्यवेक्षण करण्यासाठी महापलिका आयुक्त डॉ. राजेन्द्र भोसले, अतिरिक्त महापालिका आयुक्त, पालिकेच्या विविध विभागांचे खातेप्रमुख त्याअंतर्गत , क्षेत्रिय व परिमंडळ स्तरावील अधिकारी, कर्मचारी व सेवक कार्यरत आहेत.

## पालिकेतर्फे युद्धपातळीवर मदतकार्य

# पूराच्या पार्श्वभूमीवर शहरात स्वच्छता मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरात पूर परिस्थितीमुळे अनेक भागात झालेला कचरा आणि चिखल स्वच्छता करण्यासाठी तसेच पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे युद्धपातळीवर मोहिम हाती घेण्यात आली असून पूरबाधित परिसराची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली आहे. महानगरपालिकेतर्फे शहरात रोगराई पसरू नये यासाठी देखील उपायोजना करण्यात येत आहे.

बाधित परिसरात मदत कार्य सुरु करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधींच्या सूचना, स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांची मागणी इत्यादी बाबी विचारात घेऊन मदत कार्याचे नियोजन करण्यात आले आहे. पूर ओसरताच स्वच्छतेच्या कामास प्राधान्य देण्यात आले. राज्य शासनाच्या निर्देशानुसार पूरबाधित भागाची युद्धपातळीवर स्वच्छता करण्यात आली. परिसरात रोगराई पसरू नये याचीदेखील दक्षता घेण्यात येत आहे. ९९८ किलो जंतुनाशक पावडर, १०४ स्पेर पंप, ४२ धूर फवारणी यंत्र, ४ रिसा यक्लर, २४ डम्पर, ३ ट्रॅक्टर, ९ पाण्याचे टँकर, १० विद्युत पंप आणि ७ जनरेटरचा स्वच्छतेच्या कामात उपयोग करण्यात आला.

#### जोरदार स्वच्छता मोहीम

● रविवारी श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर जि. नाशिक (दिंडोरी प्रणीत) व पुणे महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये १६२ टन कचरा, ६४ टन गाळ स्वच्छ करण्यात आला. झाडांची कटिंग करून २६ टन कचरा उचलण्यात आला आहे. या कामाकरिता १५ जेसीबी, ११ डीपी, २ बी.आर.सी., १५ हायवा, २४ जेटींग मशीन, ११ घंटागाडी, ७५ छोटा हत्ती, ८ कॉम्पॅक्टर, ३ बिनलिफ्टर, १० टिपर वापरण्यात आले.

पान १ वरून

### पूर स्थितीची जबाबदारी...

दक्षता उपायुक्तांनी घ्यावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, खडकवासला धरणातून अचानक रात्री पाणी सोडण्यात आल्याचा ठपका पालिका प्रशासनाने जलसंपदा विभागावर ठेवला आहे. तर पाणी सोडण्याबाबतची माहिती आधीच दिल्याचा दावा या विभागाने केला आहे. त्यामुळे या दोन यंत्रणांमध्येच वाद सुरू असून त्याचा पहिला बळी खलाटे ठरले आहेत, अशी चर्चा आता पालिका वर्तुळात सुरू आहे. सिंहगड रस्ता परिसरातील स्थिती अत्यंत भयानक होती. नागरिकांचे प्रचंड झाले झाले. त्यानंतर पूर परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा पालकमंत्री अजित पवार यांनी पूरग्रस्त भागाला भेट दिली होती. जबाबदार अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश पवारांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानंतर आयुक्तांनी तातडीने ही कारवाई केली.

### पवारांच्या वक्तव्यामुळे कार्यकर्त्यांत उत्साह

निवडणुकीच्या तयारीसाठी पवार यांनी 'पायाला भिंगरी' लावली असून त्यांना प्रतिसाद मिळत रोज शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश होत आहे. दुसरीकडे भाजपने पवार यांना लक्ष्य केले आहे. पुण्यात झालेल्या भाजपच्या महाअधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पवारांवर 'भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार' अशी टीका केली होती. त्यावर सत्ताधारी पक्षांच्या आमदारांसोबतच विरोधी पक्षांच्या आमदारांनीही नाराजी व्यक्त केली होती. पवार यांच्यावर टीका केल्यावर नुकसान होत असल्याचे या आमदारांचे म्हणणे आहे. शहा यांच्या टीकेनंतर पवार यांनी तडीपार व्यक्ती देशाचा गृहमंत्री असल्याचा हल्लाबोल केला. त्यावर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमित शहा यांच्यावर टीका करणे म्हणजे सूर्याला दिवा दाखविण्यासारखे असल्याचे प्रत्युत्तर दिले. हा दिवा आम्ही महाराष्ट्रातील कारागृहात बघितल्याचे सडेतोड उत्तर पवार यांनी दिले.

### बनावट नोटीस पाठवून...

असल्याचे भासवूनही कॉल केला जातो. यानंतर ते खास नंबर दाबून फोनचा व्यवहार करून घेतात. ते दाबल्यावर एक लिंक तयार होते; जेणेकरून मोबाईल रिमोट कंट्रोल करता येईल. मोबाइलचा ताबा मिळाल्यानंतर गुन्हेगार खात्यांमधून पैसे काढून घेतात. पीडिताला याची माहिती मिळेपर्यंत त्याचे खाते रिकामे झालेले असते. व्यवहारांसाठी ओटीपी आवश्यक आहे, परंतु जेव्हा मोबाइलचे नियंत्रण गुन्हेगारांच्या हातात असते तेव्हा त्यांना ओटीपीही सहज मिळतो. लोकांनीही विचारपूर्वक आलेल्या कॉल्सना उत्तरे द्यायला हवीत. सायबर भामट्यांनी आता फसवणुकीचे नवे मार्ग शोधले असून, ही फसवणूक टाळण्याचा सावधगिरी हा एकमेव मार्ग आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### पूरग्रस्तांची बिकट...

या भागामध्ये जीवनावश्यक वस्तू, किराणा आणि काही कपडे अशा स्वरूपाची तातडीची मदत देऊ केली होती. यामध्ये कुठलाही राजकीय अभिनिवेश न आणता भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेने एकत्रितपणे ही मदत पोहोचवण्यासंबंधी सूत्रबद्ध नियोजन केले. दीपक मानकर यांच्या नेतृत्वाखाली ॲड .मंदार जोशी यांनी वाटपाच्या याद्या आणि लाभार्थ्यांचे गट तयार केले. धीरज घाटे, श्रीकांत जगताप यांनीदेखील यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

### अतिवृष्टीच्या परिस्थितीमुळे राष्ट्रपतींचा पुणे दौरा पुढे

यंत्रणेनेही सुटकेचा निश्वास सोडला आहे. राष्ट्रपती २८ ते ३० जुलैदरम्यान महाराष्ट्र दौऱ्यावर येणार होत्या. राष्ट्रपती मुर्मू पहिल्यादांच पुण्यात सिंबायोसिस विद्यापीठाला भेट देणार होत्या. त्या दृष्टीने विद्यापीठाने २१ व्या दीक्षांत समारंभासाठी जय्यत तयारी केली होती. विद्यापीठ संकुलात भव्य मांडव उभारला होता. समारंभाची तारीख नंतर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

# पूरग्रस्त निधी वाटपात केंद्र सरकारचा दूजाभाव

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पूरग्रस्त राज्यांना निधी वाटप करताना केंद्र सरकार दूजाभाव करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपला मतदान न केल्याबद्दल तेथील जनतेचा सूड घेत असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, २०२३ च्या विनाशकारी पुरानंतर हिमाचल प्रदेश सरकारने वारंवार केंद्र सरकारकडे या पुराला राष्ट्रीय आपत्ती घोषित करण्याची मागणी केली होती. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही मागणी फेटाळून लावली. अर्थसंकल्पीय भाषणात सिंचन आणि पूर निवारणासाठी निधीची तरतूद करताना, अर्थमंत्र्यांनी दूजाभाव केला आहे. अर्थमंत्र्यांनी भाजपशासित राज्यांना अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक मदत मिळेल, असे म्हटले आहे, पण काँग्रेसशासित हिमाचल प्रदेशचा विचार केला, तर ही मदत बहुपक्षीय विकास सहाय्याद्वारे म्हणजेच कर्जाची परतफेड करावी लागेल, असा आरोप त्यांनी केला.

पान १ वरून

### खडकवासला प्रकल्पात पाणीसाठा २४ टीएमसीवर

आणखी वाढण्याची शक्यता आहे. गतवर्षी याच दिवशी चारही धरणांचा पाणीसाठा २० टीएमसी होता. यावर्षी हा साठा ४ टीएमसीने वाढला आहे. खडकवासला धरण ६९ टक्के भरले असून, यातील पाणीसाठा १.२६ टीएमसी इतका आहे. त्याचप्रमाणे पानशेत धरण ९२ टक्के भरले असून, यातील पाणीसाठा ९.८७ टीएमसी आहे. तसेच, वरसगाव धरणात पाणीसाठा १० टीएमसी असून, हे धरण ७८ टक्के इतके भरले आहे. टेमघर धरण ७५ टक्के भरले असून, पाणीसाठा २.३२ टीएमसी इतका आहे.

### संरक्षक भिंत कोसळल्याने चारशे रहिवासी स्थलांतरित


परिसरात दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर रविवारी पहाटेच्या सुमारास काही भागात संततधार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाचा जोर लक्षात घेता बहुमजली इमारत कोसळण्याची भीती महापालिका प्रशासनाकडून व्यक्त केली जात आहे. काँग्रेसच्या नेत्या संगीता तिवारी यांनी प्रशासनाला वेळीच खबरदारी घेण्याची विनंती केली होती.

## सर्व राजकारणी सारखेच : जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया

# पवारांपेक्षा माझे मन म्हणते ते महत्त्वाचे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** 'शरद पवार काय म्हणतात त्यापेक्षा माझे मन, माझी नियत, माझे विचार, माझे संस्कार नेमके काय सांगतात ते जास्त महत्वाचे आहे. मला वाटते मराठ्यांचे, गोरगरिबांचे कल्याण व्हावे', असे प्रतिपादन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सरकारने लक्ष्मण हाके, छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांना एकत्रित करून निर्णय घेण्यासाठी बैठक घ्यावी, असा मार्ग राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सुचवला होता.



त्यावर जरांगेंनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

जरांगे म्हणाले की, लिंगायत, गोरगरीब धनगरांनाही आरक्षण मिळायला पाहिजे. कैकाडी आणि राजपूत समाजाचाही प्रश्न आहे, त्यांनाही आरक्षण मिळायला पाहिजे. ही माझी प्रामाणिक भावना आहे.

जरांगे यांचे म्हणणे आहे, सरकार फक्त आरक्षण देऊ देऊ असेच म्हणत आहे. आमचे म्हणणे ईडब्लूएसही सुरू ठेवा. सरकारने जे करायचे ते स्पष्टपणे करावे. कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी वेळ लागत आहे. त्यालादेखील वॅलिडिटीची वेळ वाढवून द्यावी. सरकारशी चर्चा नाही, सध्या सर्व बंद आहे. पावसामुळे नेट बंद आहे. तसेच, आजपासून बैठका घेणार आहे. समीकरण जुळवावे लागणार आहे. आमची धग मराठवाड्यापुरती नाही असे सांगत मुंबईतदेखील आमदारांना बसणे कठीण झाले आहे, असे सांगत सत्ताधारी आणि विरोधी दोघांची जबाबदारी आहे. दोघेही एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. दुसऱ्याच्या गळ्यात घोंगडे टाकण्याची सवय राजकारण्यांची आहे. एकमेकांवर ढकलणे दोघांनाही परवडणार नाही. त्यांना एक झटका लोकसभेत दिला जाणार आहे, असा इशारा जरांगे यांनी दिला.

#### काय म्हणाले होते पवार?

● पवार यांनी म्हटले होते की, सरकारने जो संवाद करायला पाहिजे होता, तो केलेला नाही. जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी मुख्यमंत्री संवाद ठेवत आहेत. ती चांगली गोष्ट आहे. दुसरे घटक आहेत जे त्यांना विरोध करत आहेत, त्यांच्याशी सरकारमधील दुसरे लोक संवाद ठेवत आहेत. दोघांनाही सर्वांनी विश्वासात घ्यायला हवे.

## मराठा समाज शिष्टमंडळाला शरद पवार यांचे संकेत

# विधानसभेआधी मराठा आरक्षण मार्गी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** विधानसभा निवडणुकीआधी मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल, असे संकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मराठा समाजाच्या शिष्टमंडळाशी बोलताना दिले आहेत. सर्व राजकीय नेते एकत्र येऊन हा विषय मार्गी लावू, असे आश्वासन पवारांनी दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील त्याला आम्ही पाठिंबा देऊ, असा शब्दही पवारांनी या शिष्टमंडळाला दिला. आरक्षणात राजकारण आणले जाणार नाही, असे स्पष्टीकरणदेखील त्यांनी यावेळी दिले.

पवार यांनी येथे शिष्टमंडळाशी केलेल्या २० मिनिटांच्या चर्चेबद्दल मराठा कार्यकर्ते गजेंद्र दांगट म्हणाले की, एकनाथ शिंदे मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यायला तयार असतील तर राष्ट्रवादी पक्ष यात कुठलेही राजकारण न करता मराठा आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांना समर्थन देईल, असे पवारांनी सांगितले. आरक्षणाची लढाई आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीआधी तुम्ही गुलाल उधळाल, असा आम्हाला शब्द देण्यात आलेला आहे. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळेल, असे संकेत पवार यांनी दिल्याची माहिती दांगट यांनी दिली.

मराठा कार्यकर्ते मदन आढाव म्हणाले की, आम्ही त्यांना सांगितले की, आम्हाला ओबीसीतून आरक्षण पाहिजे. पवारानी जो निर्णय मुख्यमंत्री घेतील मी त्याच्यासोबत राहील. इतके दिवस मराठा समाज तुमच्यासोबत राहिलेला आहे. आता तुम्हाला द्यायची वेळ आली आहे तर ते तुम्ही दिले पाहिजे. दोन-तीन दिवसात मुख्यमंत्र्यांशी बोलून म्हणणे स्पष्ट करेल, असे पवारांनी सांगितले.

### पवारांनी मराठा समाजाची माती केली : खोत

● **मुंबई :** शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री झाले, मराठ्यांचे नेते म्हणून मिरवले. पण मराठा समाजाची त्यांनी मातीच केल्याची टीका आ. सदाभाऊ खोत यांनी केली. मराठा समाजाला न्याय



देण्याचे काम उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच केले आहे. मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले; पण त्यांनी मराठा समाजाला न्याय दिला नसल्याचे रयत क्रांती संघटनेचे प्रमुख खोत म्हणाले. दोनदा मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम युतीने केले. एकदा देवेंद्र फडणवीस यांनी तर दुसऱ्यांदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ते केल्याचे खोत म्हणाले.

● मराठा समाजासाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ, सारथीसारखी संस्था, अशा अनेक योजना फडणवीस यांनी केल्या आहेत. आरक्षणाच्या मुद्यावर राजकीय दृष्टीकोणातून न पाहता, राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज गुण्यागोविंदाने राहिला पाहिजे, असे खोत म्हणाले.



### पवारांची भूमिका दुटप्पी : महाजन

● **लातूर :** शरद पवार यांची मराठा आरक्षणाच्या प्रश्नी भूमिका दुटप्पी असल्याचा आरोप राज्याचे मंत्री आणि भाजपचे नेते गिरीश महाजन यांनी केला. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तुम्ही पुढाकार घ्या, असे पवारांना आवाहन करत महाजन म्हणाले की, पवार चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले आहेत. मात्र, त्यांनी मराठा आरक्षणावर तोडगा काढला नाही. तुम्ही पुढाकार घ्या. आम्ही तुमच्या मागे येऊ. कारण, तुम्ही एवढे दिवस सत्तेत राहिले आहात. मराठा आरक्षण प्रश्न सर्व पक्षांच्या बैठकीतून सोडविता आला असता. पण सगळे विरोधी पक्ष गैरहजर राहिले. यावरून काय समजायचे, असा प्रश्न त्यांनी केला. पवार बाहेर एक बोलतात आणि आत एक बोलतात. यामुळे पवारांनी आधी भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन महाजन यांनी केले.

## शेतकरी आघाडी मैदानात : कडू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** येत्या विधानसभा निवडणुकीत तिसरी आघाडी नव्हे तर शेतकऱ्यांची आघाडी उभारणार असल्याची घोषणा प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. तसेच, ९ ऑगस्टला सभेत भूमिका स्पष्ट करणार असल्याची माहितीही कडू यांनी दिली. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनाही बच्चू कडू यांनी शेतकरी आघाडीत येण्यासाठी आमंत्रण दिले आहे.

कडू यांनी सांगितले की, येत्या विधानसभा निवडणुकीत आमची शेतकऱ्यांची आघाडी मैदानात उतरेल. ९ ऑगस्टला संभाजीनगर येथे आम्ही सभा ठेवली आहे.

## देशमुखांनी सांगितले 'त्या' व्यक्तीचे नाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अनिल परब व अजित पवार यांच्याविरोधात खोटी प्रतिज्ञापत्रे सादर करण्याचा दबाव देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यावर आणल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी केल्यानंतर फडणवीसांनीही आपल्याकडे त्यांचे रेकॉर्डिंग असल्याचे प्रत्युत्तर दिले. या विषयावरून कलगीतुरा रंगला असतानाच आता देशमुख यांनी फडणवीसांकडून निरोप घेऊन आलेल्या व्यक्तीचे नाव जाहीर केले आहे. समित कदम असे त्याचे नाव असून ते मिरज जनसुराज्य शक्ती पार्टी युवक गटाचे अध्यक्ष आहेत.



देशमुख यांनी गंभीर आरोप केले होते. "तीन वर्षांपूर्वी फडणवीस यांनी त्यांचा जवळचा माणूस माझ्याकडे पाठवला. त्याने माझे फडणवीसांशी अनेकदा बोलणे करून दिले. त्यांनी माझ्याकडे पाठवलेल्या लिफाफ्यातील चार मुद्द्यांचे प्रतिज्ञापत्र करून देण्यास मला सांगितले. उद्धव ठाकरेंवर मी खोटा आरोप लावायचा की त्यांनी महापालिकेच्या निवडणुकीसाठी मला पैसे जमवायला सांगितले. दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात आदित्य ठाकरेंवर आरोप लावायला सांगितले की, आदित्य ठाकरेंनी दिशा सालियनवर बलात्कार केला आणि तिला गॅलरीतून ढकलून दिलं", असा दावा देशमुख यांनी केला होता. त्यावेळी देशमुख यांनी फडणवीसांची ऑफर घेऊन आलेल्या व्यक्तीचे नाव उघड केले नव्हते.

ते म्हणाले की, मी गृहमंत्री असताना माझ्या शासकीय निवासस्थानी कदम आले आणि त्यांनी फडणवीसांना फोन लावून माझे त्यांच्याशी बोलणे करून दिले. कदम आपल्याला शासकीय कार्यालयात ५ ते ६ वेळा भेटले, असा दावाही देशमुख यांनी केला आहे. माझ्याकडे या चर्चेचे व भेटीचे व्हिडीओ फूटेजही आहे.

## शिक्षक सोसायटी सभेत हाणामारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** विद्यार्थ्यांना शिस्तीचे शिक्षण देणाऱ्या गुरुजनांनीच सभेमध्ये राडा करून एकमेकांना धक्काबुक्की केल्याचा संतापजनक प्रकार येथे घडला. शिक्षक सेवक सहकारी सोसायटीच्या वार्षिक सभेमध्ये शिक्षकांनी एकमेकांची कॉलर धरून हाणामारी केली आहे. मागील सभेमधील विषय मंजुरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलाच गोंधळ झाला.

सांगलीतील डेक्कन हॉलमध्ये शिक्षक सेवकांची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी झालेल्या या प्रकाराने शहरात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सोसायटीच्या



सत्ताधारी आणि विरोधकात ही धक्काबुक्की झाल्याची माहिती शिक्षण सेवक सहकारी सोसायटीच्या काही सदस्यांनी दिली. सोसायटीची ही ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा होती. सभेच्या सुरुवातीपासूनच गोंधळ निर्माण झाला होता. मागील सभेतील विषयाच्या मंजुरीचा मुद्दा उपस्थित होताच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वादावादीला सुरुवात झाली आणि सभेच्या पुढच्या बाजूस सत्ताधाऱ्यांनी विरोधी गटातील काही सदस्य आमने सामने आले.

## » Selected

### 'मनसे चालवायला राज सक्षम'

**मुंबई** : आमचा पक्ष कसा टिकवायचा, कसा चालवायचा यासाठी राज ठाकरे सक्षम आहेत, असे मनसेचे एकमेव आमदार राजू पाटील यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की, लोकसभा आणि



पदवीधर निवडणुकीत मनसेला युतीने विनंती केली होती. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी मनसेला विचारले नाही. मात्र, राज ठाकरे कोणाची जिरवायची म्हणून असे राजकारण करीत नाहीत. ते मैत्रीला जागणारे आहेत. राज्यसभेला धनंजय महाडिक यांना मनसेचे महत्त्वाचे मत पडले. शिवसेना ठाकरे गटाला गरज होती तर त्यांनी का विचारले नाही?, असा सवालही पाटील यांनी केला आहे. सत्ताकारण, अर्थकारण आणि राजकारण यात पक्ष टिकून राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी कधी कधी काही निर्णय घ्यावे लागतात. विधानसभेला ठाकरेंना मदत लागली तर त्यांनी शिवतीर्थावर राज ठाकरे यांच्याकडे जायला हवे. काय करायचे राज ठाकरे बघतील, असेही पाटील यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रद्वेष्टा अबू आझमी याचे बाळासाहेबांच्या फोटोसमोर उद्धव ठाकरे स्वागत करतात. त्याच्यावर कोणी बोलत नाही. त्यामुळे त्यांनी कसाही आपला पक्ष टिकवायचा आणि आम्ही थोडी मदत केली तर आम्हाला जाब विचारायचा, असा त्यांचा खाक्या आहे. आम्ही हिंदुत्व आणि मराठी बाणा कधी सोडला नाही. लोकसभेत यांच्या तोंडाला रक्त लागलेले आहे, त्यामुळे ते अबू आझमींसारखे अनेक लोक जवळ करीत आहेत, असे पाटील यांनी म्हटले आहे.

### वाघाची कातडी विक्रीसाठी आणणाऱ्या सहा जणांना अटक


**जळगाव** : नशिराबाद टोल नाक्याजवळ वाघाची कातडी विकण्यात येणार असल्याची माहिती पुणे व जळगाव कस्टम अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या कारवाई करत सहा संशयितांना अटक केली. त्यांच्याकडून वाघाच्या कातडीसह दोन मोटारसायकली, पाच मोबाइल जप्त करण्यात आले. अजवर सुजात भोसले, मोहमंद अतहर खान, नदीम गयासुद्दीन शेख, कंगनाबाई अजवर भोसले, तेवाबाई रहिम पवार व रहिम रफिक पवार यांना अटक झाली. वाघाची शिकार कुठे झाली, वाघाची कातडी कोणाला विकली जाणार होती, याचा तपास सुरू आहे. सत्यता तपासण्यासाठी त्वचेचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात येणार आहेत. प्राथमिक माहितीच्या आधारे वाघाची मध्यप्रदेशात शिकार केल्याचा अंदाज आहे.

## फडणवीस-जरांगे भांडण नकली : प्रकाश आंबेडकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भांडण नकली आहे. फडणवीस भूमिका घ्यायला तयार नाहीत. त्यामुळे हे ठरवून झालेले भांडण आहे. ओबीसींना फसवण्यासाठी हे चालू आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

उद्धव ठाकरे यांनी आरक्षणाबाबत राजकीय भूमिका घेतलेली नाही. ठाकरे भावी पंतप्रधान, मुख्यमंत्री व्हावेत. मात्र, त्यांनी जरांगे पाटील यांच्या ज्वलंत मागणीवर बोलले पाहिजे. महाराष्ट्र शांत करावी यासाठी जनजागृती रॅली काढत आहोत. मराठा आणि कुणबी यांचा राजकीय मतभेद मिटला असेल तर चांगला आहे. मात्र, ते सामाजिक होऊ नये याची दक्षता त्यांनी घ्यावी, असे आंबेडकर



म्हणाले.

उद्या राजकीय पक्ष म्हणून सत्तेवर आल्यानंतर तुम्हाला त्याला तोंड द्यावे लागणार आहे. जरांगे पाटलांच्या मागणीच्या बरोबर आहात की विरोधात आहात? हे स्पष्टपणे मांडता आले पाहिजे. सर्व राजकीय पक्ष ओबीसींच्या विरोधातले आहे. त्यामुळे ते पळवाटा काढत आहेत. आम्ही राजकीय भूमिका घेतली. आमच्यावर ना ओबीसी नाराज आहे, ना मराठा समाज नाराज आहे, असे आंबेडकर म्हणाले.



### ११ विधान परिषद सदस्यांना शपथ

● **मुंबई :** अलीकडेच विधानपरिषद निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित अकरा आमदारांचा शपथविधी सोहळा रविवारी संपन्न झाला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते. भाजपचे सदस्य पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, परिणय फुके व सदाभाऊ खोत; शिवसेनेच्या भावना गवळी व कृपाल तुमाने; राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजी गर्जे व राजेश विटेकर; काँग्रेसच्या प्रज्ञा सातव आणि उद्धव ठाकरे शिवसेनेचे मिलिंद नार्वेकर यांनी यावेळी शपथ घेतली. विधान परिषदेसाठी १२ जुलै रोजी मतदान झाले होते. या निवडणुकीत महायुतीने नऊ, तर महाविकास आघाडीने दोन जागा जिंकल्या होत्या. शेकापच्या जयंत पाटील यांचा पराभव झाला होता. या निवडणुकीत काँग्रेसची आठ मते फुटल्याचे स्पष्ट झाले होते. भाजपची यंग ब्रिगेड विधान परिषदेत दिसणार आहे. या पक्षाचे योगेश टिळेकर, परिणय फुके, पंकजा मुंडे आणि अमित गोरखे यांचा विजय झाला. गोरखेंच्या रूपाने मातंग समाजातील तरुण चेहरा वरिष्ठ सभागृहात दिसणार आहे. तर टिळेकर यांच्या माध्यमातून माळी समाजाला प्रतिनिधित्व मिळाले आहे. सदाभाऊ खोत यांच्या रूपात शेतकरी आणि चळवळीतील कार्यकर्ता पुन्हा आमदार झाला आहे.

## मुंडेंना राष्ट्रवादीत घेणे आत्मघातकी : जयंत पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना पंधरा वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घेणे, हा आमचा आत्मघातकी प्लॅन ठरला, असे खळबळजनक वक्तव्य राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पाटील बीड दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांसोबत बैठक घेतली. बैठकीनंतर पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार निशाणा साधला.

लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारने ३५ कोटींची तरतूद



केल्याची माहिती पवार यांनी ट्विट करत दिली. यावरून पाटील म्हणाले की, अर्थमंत्री पवार यांनी केलेले ट्विट त्यांना करायला लावले आहे. डॉन सिनेमात बच्चनच्या पिस्तूलमध्ये गोळी नव्हती, हे फक्त अभिनेत्रीलाच माहिती होते, तशी गत लाडकी बहीण योजनेची आहे, असा टोला त्यांनी लगावला आहे.

धनंजय मुंडे यांना पाठवून अजित पवारांना भाजपमध्ये आणण्याचा प्लॅन भाजप आणि रा. स्व. संघाचा होता का, असे विचारले असता पाटील म्हणाले की, गोपीनाथ मुंडे यांनी भाजप सध्या जे राजकारण करत आहे, असे राजकारण कधीच केले नाही. तो आमचाच आत्मघातकी प्लॅन होता.

## चंद्रकांत पाटील यांचा निर्वाळा; विरोधक संभ्रम निर्माण करताहेत

# अजित पवार महायुतीत एकटे नाहीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महायुतीत एकटे पाडले जात असल्याची चर्चा सध्या सर्वत्र होत आहे. यावर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याचा इन्कार करत संभ्रम निर्माण करण्याचे काम विरोधी पक्षाचे आहे, अशी टीका केली.

ते म्हणाले की, अजित पवार यांच्या पक्षासह महायुती गुण्यागोविंदाने कारभार करीत आहे. अजित पवार यांना महायुतीत एकटे पाडले जात आहे या चर्चेत काही तथ्य नाही. अजित पवार विविध कामांनिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटले असतील. अशा वारंवार भेटल्यामुळे त्यांच्या मनात जे प्रश्न असतील ते सगळे सुटले असतील, असेही चंद्रकांत पाटील यांनी बोलून दाखवले.

### तयारी २८८ ची; पण एकत्र लढणार



● आगामी विधानसभा निवडणुकीबद्दल बोलताना पाटील म्हणाले की, भाजपची सर्व २८८ जागांवर लढण्याची तयारी आहे; पण त्याचबरोबर महायुतीत लढण्याचाही आमचा ठाम निर्णय आहे. महायुतीत जेवढ्या जागा मिळतील त्या लढवू, पण तयारी मात्र २८८ जागांची आहे. उरलेल्या जागांची तयारी सहयोगी पक्षांसाठी वापरू, असे पाटील म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले करून अजित पवार वर्षभरापूर्वी महायुतीत सहभागी झाले. त्यानंतर आलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षेइतके यश मिळाले नाही. तर विरोधी महाविकास आघाडीला जास्त जागांवर विजय मिळाला. तेव्हापासूनच अजित पवार यांचे महायुतीतील महत्त्व संपले असून त्यांना महायुतीत एकटे पाडले जात आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे. याचा रोख विशेषत: महायुतीतील सर्वात मोठा घटक पक्ष भाजपकडेच आहे. त्यातच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इंग्रजी आणि मराठी मुखपत्रांमध्ये लोकसभा निवडणुकीतील पराभवाला अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचा महायुतीत समावेश करणे कारणीभूत असल्याचा आक्षेप घेण्यात आल्यानंतर अजित पवार यांचे महायुतीतील स्थान डळमळीत झाल्याची जोरदार चर्चा सुरू झाली; मात्र आता पक्षाचे ज्येष्ठ नेते असलेल्या चंद्रकांत पाटील यांनी या चर्चा निरर्थक असल्याचे स्पष्ट केले आहे.

मराठा आरक्षण विषयावर मत व्यक्त करताना ते म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांनी मुद्द्यांना धरून बोलले पाहिजे. वारंवार देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलण्यातून जरांगे यांच्याबद्दल नकारात्मक मत तयार होत आहे. रक्तसंबंधामध्ये व्हेरिफिकेशनच गरज नाही हा कायदा २०१७ साली देवेंद्र फडणवीस आणि आम्ही आणला होता. या कायद्यात आणि सगेसोयरे यामध्ये काहीही बदल नाही, असे पाटील म्हणाले. मात्र, त्याचबरोबर सरसकट आरक्षण कोर्टात टिकणार नाही. कायद्याने झालेल्या प्रत्येक आरक्षणाला सर्व्हे करावाच लागतो. ते काम मागासवर्ग आयोग करील.

#रा

## आढळराव पाटील यांना शिंदे गटातील शिवसैनिकांचा आग्रह

# 'दादा स्वगृही परत या; आम्हाला तुमची गरज...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रांजणगाव गणपती :** शिरुर लोकसभा मतदार संघात अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडुन तिकीट घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आणि तीनवेळा खासदार राहिलेल्या शिवाजीराव आढळराव पाटील यांना खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्याकडुन पराभव स्वीकारावा लागला. परंतु पराभवाने खचुन न जाता आढळराव यांनी पुन्हा कंबर कसली असुन नुकतीच म्हाडाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली असुन आढळराव पाटील यांनी परत शिवसेना (शिंदे गट) पक्षात यावे अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी आज (दि २८) रोजी लांडेवाडी येथे केली.

लोकसभा निवडणुकीत महायुतीची शिरुरची जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सुटल्याने शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहमतीने राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला होता. परंतु लोकसभा निवडणुकीत सर्वसामान्य मतदारांना त्यांची हि भुमिका रुचली नाही. त्यामुळे मतदारांनी आढळराव यांना नाकारले आणि कोल्हे यांना निवडुन दिले. परंतु आढळराव यांनी पुन्हा शिवसेना (शिंदे गट) पक्षात यावे अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी केली असुन आढळराव हे पुन्हा शिवसेनेत आल्यास पुणे जिल्ह्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकत वाढेल असे मत सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, युवासेना जिल्हाप्रमुख बापुसाहेब शिंदे, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख इरफान सय्यद, शिरुर-आंबेगाव तालुकाप्रमुख मल्हारी काळे, शिरुरचे तालुकाप्रमुख रामभाऊ सासवडे, हवेलीचे तालुकाप्रमुख विपुल शितोळे, खेडचे तालुकाप्रमुख राजेंद्र जवळकर, जिल्हा परिषदचे गटनेते देविदास दरेकर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अलंकार कांचन, शिवसेना जिल्हा उपप्रमुख अनिल काशिद, शरद नवले, शिरुर युवासेना प्रमुख विष्णु वाळके, तालुका संघटक दत्ता गिलबिले, युवा कार्यकर्ते वैभव ढोकले, आण्णा हजारे आदी कार्यकर्त्यांनी हि आग्रही मागणी केली आहे.

# ओतूरला मनसेचे खळ्ळ खट्याक आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



बस स्थानकातील खड्ड्यांमध्ये केले वृक्षारोपण

**ओतूर :** (ता.जुन्नर)येथील बसस्थानकात मोठमोठे खड्डे पडले असून या खड्ड्यात पाणी साचून येथे डबकी वजा डोह तयार झालेत.येथून ये जा करणाऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत असल्याने जुन्नर तालुका म.न.से. ने येथे रविवारी(दि.२८) वृक्षारोपण करुन खळ खट्ट्याक आंदोलन केले तर हे खड्डे तात्काळ न बुजवल्यास या ठिकाणी खड्ड्यातच उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देखील म.न.से.च्या वतीने देण्यात आला.

ओतूर बस स्थानकातून दुचाकी, चारचाकी वाहनांना खड्ड्यात आप्तुंच ये जा करावी लागते तर पादचाऱ्यांना येथून पायी चालणे कठीण होत आहे.तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी,विद्यार्थिनी यांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे.या साठलेल्या पाण्याचा आरोग्यावर देखील परिणाम होऊ शकतो हे खड्डे लवकरात लवकर बुजवण्या संदर्भात म.न.से.तालुका अध्यक्ष तान्हाजी तांबे यांनी बांधकाम विभाग आणि एस.टी. प्रशासनास वेळोवेळी पत्रव्यवहार केलेले आहेत.मात्र या खडडयांची दुरूस्ती व देखभाल करण्यात आलेले नाही.ओतुर येथिल श्री कपर्दिकेश्वरची श्रावण महिन्यात म्हणजे दि.५ ऑगस्टला यात्रा सुरू होत आहे.संपुर्ण महाराष्टातुन यात्रेस व देवदर्शनासाठी प्रचंड भावीक भक्तगण येत असतात. तसेच नित्यची वर्दळ देखील येथून होत असते बसस्थानकात पडलेल्या खड्ड्यांमुळे वरचेवर छोटे मोठे अपघात होतच असतात तर कधी मोठे अपघात देखील झालेले आहेत यापुढेही होण्याची शक्यता आहे यातून प्राणहानी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग जुन्नर व एस.टी.महामंडळ नारायणगाव विभाग यांनी हे खडडे दि.४ ऑगस्ट पर्यंत दुरूस्त न केल्यास महाराष्ट्र नवनिर्मान सेना दि.५ ऑगस्ट पासून या ठिकाणी उपोषणास बसणार असल्याचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.याबाबत एस. टी.प्रशासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले असल्याचे यावेळी बोलताना तान्हाजी तांबे यांनी सांगितले. यावेळी म.न.से.तालुका अध्यक्ष तानाजी तांबे,उपाध्यक्ष शिवाजी कुलवडे,तालुका उपाध्यक्ष किशोर अहिनवे,ओतूर शहर अध्यक्ष जयसिंग तांबे,उप अध्यक्ष अभिजीत दिवटे,विभाग अध्यक्ष संपत घरडे,सलीम मोमीन,वाहतूक तालुका अध्यक्ष प्रवीण डोके,साहिल तांबे,दिपक चव्हाण,जयेश खंडागळे,आर्यन वटे,प्रतीक माळवे,सचिन राजीव,प्रथमेश देशमुख,प्रताप बारकू तांबे,जयेश खंडागळे,ओम गरुड,जय ठोसर,प्रणव देशमुख,ग्रामस्थ शशिकांत डुंबरे,अनिल डुंबरे,झांबरशेठ जाधव उत्तमराव गाढवे,दत्तात्रय डुंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

> या भागात पावसाचे पाणी साठण्याची समस्या भेडसावत असल्याने व या पाण्याला जाण्यासाठी मार्ग नसल्याने हे पाणी खड्ड्यांमध्ये साठून राहते यावर उपाय योजना म्हणून येथून सांडपाणी गटर करण्यासाठी तीन लाखाचा निधी वापरला जाणार आहे.
> — **प्रशांत डुंबरे, उपसरपंच ओतूर**

> नगर कल्याण महामार्ग कडून गावात येणे जाणे करिता बसस्थानकातून मार्ग असल्याने या मर्गाकरिता भरीव निधी लवकरच टाकला जाणार असून ही समस्या कायम स्वरुपी मिटवण्याचा प्रयत्न केला आहे.
> — **विशाल तांबे, माजी सभापती पं.स.जुन्नर**

> जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी या ठिकाणी जनतेच्या प्रश्नावर तोडगा काढून दोन वेळा हे खड्डे बुजवण्याचे काम केले मात्र येथे कायम स्वरुपी प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न व्हायला हवा याबाबत आमदार बेनके यांनी लक्ष घालावे.]
> — **जयवंत तांबे म.न.से.शहर अध्यक्ष**

## खेडकर कुटुंबियांचा नवा कारनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** राज्यभरात चर्चेत आलेली वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबियाचे अनेक कारनामे बाहेर आले आहेत. गेल्या काही दिवसांपुर्वी पूजा खेडकरचं बारामती कनेक्शनसमोर आलं होतं. पूजा खेडकरच्या कुटुंबियांनी बारामती तालुक्यात जमीन खरेदी केली असल्याची माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती.

आता त्या सातबारावरील नावात दुरुस्ती करण्यात आल्याची माहिती समोर आल्याने खेडकर कुटुंबीय नव्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. दिलीप धोंडीबा खेडकर ऐवजी दिलीप कोंडिबा खेडकर असा नावात बदल करण्यात आलेला आहे. दिलीप खेडकर यांनी १४ वर्षांपूर्वी १४ गुंठे जमीन बारामती तालुक्यातील वाघळवाडी गावात खरेदी केलेली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती.

बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे दिलीप खेडकर यांची ही जमीन विक्री करायची असल्याने त्या ठिकाणी खेडकर कुटुंबियांनी तशी पाटी लावून जमीन विकायला काढली आहे. दीड कोटी इतकी जमीनीची किंमत असल्याचे सांगितले जात आहे.

## Selected

## गजलकारा वैशाली माळी यांना "गजल प्रतिभा "पुरस्कार



**सासवड :** पुणे येथील पत्रकार भवनात रंगत संगत प्रतिष्ठान तसेच करम प्रतिष्ठानच्या वतीने गजलकारा वैशाली माळी यांना नुकताच "गजल प्रतिभा" पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र अशा स्वरुपातील हा पुरस्कार रंगत संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड प्रमोद आडकर व करम प्रतिष्ठानचे

अध्यक्ष भुषण कटककर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. गजल या क्षेत्रांतील अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. मीच माझ्या लिखाणाची पहिली समीक्षक असते, सुचलेले, रचलेले असे लिखाण एका पातळीवर आणत असते असे मनोगत व्यक्त करत वैशाली माळी यांनी या पुरस्काराने मनस्वी आनंद झाल्याचे सांगीतले. अँड प्रमोद आडकर यांनी माळी यांच्या गजल मनाला भावतात असे सांगीतले तर भुषण कटककर यांनी सुचलेले कल्पकतेने मांडणे हे माळी यांच्या गजलचे वैशिष्ट असल्याचे सांगितले सन्मानपत्राचे वाचन निरुपमा महाजन यांनी केले तर सुत्र संचालन वैजयंती आपटे यांनी केले. पुरस्कारार्थीचा परिचय अपर्णा डोळे यांनी करून दिला. मैथिली आडकर व प्रज्ञा महाजन यांनी सर्वांचे स्वागत केले कार्यक्रमाच्या उत्तरार्धात भुषण कटककर, प्रभा सोनवणे सुजाता पवार, चंचल काळे, डॉ मृदुला खैरनार (कुलकर्णी)

शीला टाकळकर, वासंती वैद्य, सुधीर कुबेर, रेखा येळंबकर, समीर गायकवाड आदींच्या गजल रचनांचा सुरेख कार्यक्रम पार पडला.

## आरोग्य तपासणी शिबिरात २३० रुग्णांची मोफत तपासणी



धामणी (ता.आंबेगाव ) आरोग्य तपासणी करताना डॉक्टर.

**धामणी** (ता.आंबेगाव ): येथील संत सावतामाळी विकास मंडळ व ज्ञानज्योती शिक्षण व आरोग्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात २३० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली आहे. संत शिरोमणी सावता महाराज व संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन गेली.अनेक वर्षे मंडळाच्या धार्मिक कार्यक्रमाबरोबर आरोग्य शिबीर घेण्यात येतात.या वर्षी हृदयरोग,अस्थिरोग,स्त्रीरोग,नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले . सदर कार्यक्रमाचे उद्घाटन भोसरी रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष तथा सावतामाळी विकास मंडळ अध्यक्ष ज्ञानेश्वर विधाटे, ज्ञानज्योती शिक्षण व आरोग्य संस्थेचे उपाध्यक्ष प्रदिप भूमकर,संदीप भूमकर,सरपंच रेशमा बोऱ्हाडे, वसंत जाधव, आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष भगवान वाघ,पहाडदरा सरपंच मच्छिंद्र वाघ,पांडुरंग वाळुंज, केशव काळदाते, दत्ता कोल्हे,प्रा.सचिन पवार,पोपट विधाटे, रुपेश विधाटे,रोहीत भूमकर,योगेश विधाटे,बबन भूमकर व ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ.विठ्ठल विधाटे,रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक भोसरीचे डॉ.संतोष मोरे,डॉ.योगेश गाडेकर,डॉ.शशांक उगिले,डॉ. विद्या फल्ले यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिरा दरम्यान केंद्रीय अर्थ मंत्रालयचे सल्लागार समितीचे सदस्य डॉ.प्रा.अशोक कुमार पगारिया,विलास पगारिया,शांताराम जाधव,यांनी भेट दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसरपंच अक्षय विधाटे तर आभार गणपत विधाटे यांनी मानले.

# मराठी पत्रकार संघ भिगवणच्या अध्यक्षपदी आकाश पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण:** स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आज पर्यंत पत्रकारांनी समाजासाठी अविरत संघर्ष केलेला आहे आणि हा संघर्ष अजूनही चालू आहे. पत्रकारीता क्षेत्र काळानुसार बदलताना दिसत आहे.पत्रकाराच्या लेखणीने अगदी केंद्रस्तरीय अधिकाऱ्याचा काळा बाजार ही उघडीला आणून त्याला पदावरून पायउतार करायला लावू शकते याच मूर्तिमंत उदाहरण सद्या आपण रोज दैनंदिन वर्तमानपत्रात वाचत आहे.असे मत ज्येष्ठ पत्रकार तानाजीराव काळे यांनी भिगवण पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारीणीच्या पदग्रहण प्रसंगी काढले.

येथील हॉटेल ज्योती व्हेज मधील सभागृहात भिगवण मराठी पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारीणीचा पदग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी पत्रकार संघाच्या अध्यक्षदाची जबाबदारी तरुण भारतचे पत्रकार आकाश पवार यांनी स्वीकारली. तसेच सचिवपदी पत्रकार महेंद्र काळे यांची निवड करण्यात आली.

प्रमुख पाहुणे प्रा.रामदास झोळ यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की झपाट्याने भिगवण चा विस्तार वाढत चालला असून भिगवण हे शहरीकरणाच्या वाटेवर असल्यामुळे या भिगवण शहरात अनेक आद्योगिक,राजकीय,शैक्षणिक बाबतीत विविधता असून या सर्व घटकांवर परखड मत मांडण्यासाठी पत्रकार हा एक महत्वाचा घटक आहे.



आकाश पवार



महेंद्र काळे

नूतन अध्यक्ष आकाश पवार यांनी आपले अध्यक्षपद आई व वडील यांना समर्पित केले.तसेच पत्रकारांना मार्गदर्शनपर कार्यशाळा घेणे,समाजातील अन्यायग्रस्तांना पत्रकारितेच्या माध्यमातून योग्य न्याय मिळवून देणे,आणि समाज प्रबोधनासाठी प्रयत्नशील राहणार असून भिगवण हे गाव हरित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत नूतन अध्यक्ष आकाश पवार यांनी मांडले.

पत्रकार संघाच्या पदग्रहण कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक अशोक शिंदे,भिगवण गावच्या सरपंच दिपीका क्षीरसागर,सचिन बोगावत, मावळते अध्यक्ष तुषार क्षीरसागर आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विविध गावचे सरपंच,विविध संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विविध संघटनांचे पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर,विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी आदिजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.प्रशांत चवरे यांनी केले. सुत्रसंचालन सागर जगदाळे व प्रा.तुषार क्षीरसागर यांनी केले तर आभार आप्पासाहेब गायकवाड यांनी मानले.

**मराठी पत्रकार संघ नुतन कार्यकारीणी :**

- **अध्यक्ष** – आकाश पवार,
- **सचिव** –महेंद्र काळे,
- **उपाध्यक्ष**-सागर जगदाळे (इंदापूर विभाग)व आप्पासाहेब मेंगावडे (दौंड विभाग),
- **खजिनदार** –प्रा.सागर घरत,
- **कार्याध्यक्ष**- विजय गायकवाड (अकोले),
- **संघटक**-आप्पासाहेब गायकवाड,
- **समन्वयक** – संतोष सोनवणे.

## महापालिका व जिल्हा परिषदेकडून टाळाटाळ

# कर्मचाऱ्यांचेच आरोग्य धोक्यात तर सामान्य नागरिकांचे काय?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** प्राथमिक उपकेंद्र उत्तमनगर येथील आजूबाजूच्या परिसरातच एवढी घाण आहे की, तेथील कर्मचार्यांच्याच आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे.उपकेंद्राच्या माध्यमातून आजूबाजूच्या परिसरातील अहिरे, कोंढवे धावडे,कोपरे, उत्तमनगर, शिवणे परिसरातील सामान्य जनतेच्या आरोग्याचा कणाच असलेल्या उपकेंद्राच्याच आजूबाजूच्या परिसराचीच अशी अवस्था आहे की, तिथे नागरिकांनी उपचार घ्यायचे की आरोग्य धोक्यात घालायचे हा प्रश्न उपस्थित राहिला आहे. उपकेंद्राच्या बाजूचेच चेंबर भरले असल्याने ड्रेनेजचे पाणी पुढे जात नसल्याने त्या ठिकाणी मच्छरांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे.पावसाच्या पाण्याने संपूर्ण ड्रेनेजची घाण वाहून आली आहे व ती आरोग्य उपकेंद्राच्या परिसरातच साचली आहे.या ठिकाणी महापालिकेच्या वतीने देखील दुर्लक्ष केले जात आहे.महापालिकेच्या



वतीने स्वच्छतेसाठी याठिकाणी दुर्लक्ष करण्यात येत आहे.सदरील ठिकाणी विजेचा ट्रान्सफॉर्मर देखील आहे त्याच्या आजूबाजूच्या संरक्षण झाळ्या देखील तोडमोड झाली आहे. त्यांचे देखील कामकाज होणे गरजेचे आहे अन्यथा विजेचा शॉक लागून जिवितहानी होण्याची शक्यता आहे. या ठिकाणची परिस्थिती माजी जिल्हा परिषद सदस्या अनिता इंगळेकडून वारंवार मांडली जात आहे. परंतु जिल्हा परिषदेने या केंद्राचे वर्गीकरण महापालिकेला दिले नसल्याने महापालिकेकडून या ठिकाणच्या कामासाठी टाळाटाळ सुरू आहे. अधिकारी फोनवरून काम करू सांगतात परंतु नंतर त्या ठिकाणची कोणतीही काम त्यांच्याकडून होताना दिसत नाही.

या कामासाठी वारंवार पाठपुरावा अनिता इंगळे व संतोष शेलार करत आहेत. उपकेंद्रातील कर्मचारी देखील या ठिकाणची कामे कोण पूर्ण करेल या अपेक्षेने बघत आहेत.

**जाहीर समन्स**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**
**बारामती विभागीय कार्यालय मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२**

**पत्ता : नवनाथ ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या.** — अर्जदार
पत्ता मर्या. करंजे. ता. बारामती, जि. पुणे
**विरुध्द**

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. धनंजय भगवान पोमणे मु. पो. बाबुर्डी, ता. बारामती जि. पुणे | १ | २४८/२०२४ | २२८९२३४ |
| २ | श्री. गजानन बापुराव पोमणे मु. पो. बाबुर्डी, ता. बारामती जि. पुणे | २ | २४८/२०२४ | २२८९२३४ |
| ३ | श्री. धोंडीबा एकनाथ पोमणे मु. पो. बाबुर्डी, ता. बारामती जि. पुणे | ३ | २४८/२०२४ | २२८९२३४ |
| ४ | श्री. चंद्रकांत हरिभाऊ तांबे मु. तांबेवाडी, पो. मुर्टी, ता. बारामती | २ | २४६/२०२४ | ४१९२९२ |
| ५ | श्री. किरण नंदकुमार दरवेशी मु. पो. चोपडज पुल, ता. बारामती | ३ | २४०/२०२४ | २९२४६ |
| ६ | श्री. उमेश नारायण साळुंखे मु. पो. वडगाव, ता. बारामती, जि. पुणे | १ | २३९/२०२४ | ५००८८० |
| ७ | श्री. संदीप विठ्ठल कदम मु. पो. वडगाव, निंबाळकर, ता. बारामती | ३ | २३९/२०२४ | ५००८८० |
| ८ | श्री. रोहीत हनुमंत जगताप मु.पो. वाणेवाडी, ता. बारामती, पुणे | २ | २४३/२०२४ | ७६०८४ |
| ९ | श्री. प्रभाकर नरसिंग कराळे मु. जळकेवाडी, पो. मुढाळे, ता. बारामती | १ | २४४/२०२४ | ९,१३,१३५ |
| १० | श्री. संतोष भगवान राजपुरे मु.पो.मुर्टी, ता. बारामती, जि. पुणे | ३ | २४२/२०२४ | ५,०४,४३६ |

जाब देणार

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.
उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २/८/२०२४ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.
या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरी अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्या आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
म्हणून आज दिनांक १९/७/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

**श्री एस. एम. तांदळे**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन



## शिक्रापुरात पोलीस व नागरिकांनी
# बुजवला रस्त्यावरील खड्डा
### सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनाला येईना अद्याप जाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** शिक्रापूर ता. शिरूर येथील शिक्रापूर चाकण रस्त्यावर मुख्य चौकातच भला मोठा खड्डा पडल्याने अनेक लहान मोठे अपघात व खड्ड्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने शिक्रापूर पोलिसांनी काही स्थानिकांच्या मदतीने सदर रस्ता बुजवला आहे.

शिक्रापूर ता. शिरूर येथील राज्य महामार्ग क्रमांक ५५ या शिक्रापूर चाकण रस्त्यावर वाहनांची नेहमीच वर्दळ असून येथील मुख्य चौकातच रस्त्यावर भला मोठा खड्डा पडला होता, यापूर्वी अनेकदा खड्डा पडून देखील सार्वजनिक बांधकाम विभागाला याकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही, तर सध्या पाऊस सुरू झाल्याने रस्त्यावर पाणी साचून तो खड्डा दिसत नसल्याने अनेक वाहने खड्ड्यात आदळून अनेक अपघात होऊ लागल्याने शिक्रापूर पोलिसांनी उद्योजक सचिन खेडकर यांच्या माध्यमातून येथील रस्त्याच्या मध्यभागी पडलेला खड्डा बुजवला, यावेळी पोलीस हवालदार अमोल दांडगे, मिलिंद देवरे, ज्ञानेदेव सोनवणे, मोहन पाटील यांसह आदी उपस्थित होते.

» वाहतूक कोंडी

तर एकीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असताना पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेने अनेक अपघात वाचणार असल्याने नागरिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

**केल्याने होत आहे रे :** शिक्रापूर ता. शिरुर येथील रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवताना पोलीस व स्थानिक कार्यकर्ते.

#रा

## ✓ » Selected



### खेडच्या बारापाटी कमान शाळेमध्ये लाईफ इको क्लबची स्थापना

**राजगुरूनगर :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र आणि केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे खेड तालुक्यातील बारापाटी कमान येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये 'लाईफ इको क्लब'ची स्थापना करण्यात आली आहे. "मिशन लाईफ" हा केंद्र शासनाचा महत्वकांक्षी पर्यावरण विषयक उपक्रम असून सध्या राज्यभरात सुरू असलेल्या शिक्षण सप्ताहाचा आज सातवा दिवस संपन्न झाला. बारापाटी शाळेचे मुख्याध्यापक संजय नाईकरे यांनी खेड तालुक्यातील पहिला इको क्लब स्थापन करुन शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'गार्डन्स फॉर लाईफ' उपक्रमाचा शुभारंभ केला आहे. शाळेतील चौकस विद्यार्थीनी आराध्या नाईकरे हिची या क्लबच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

बारापाटी शाळा ही पुणे जिल्ह्यातील निवडक इकोफ्रेंडली शाळांपैकी एक शाळा असून या शाळेतील पाणी बचतीचा संदेश देणारी जादूची बाहुली थेट इंग्लंड देशापर्यंत पोहोचली आहे.

"पाटी पुसा थेंबाने, पाणी वाचवा प्रेमाने" असा मौलिक मांडणाऱ्या बाहुलीची दखल व्हाईस ऑफ अमेरिका या अमेरिकन रेडिओ ने सुद्धा घेतलेली आहे.

२०१२ मध्ये याच बाहुलीने महाराष्ट्र राज्य विज्ञान प्रदर्शनात नागपूर येथे दुसऱ्या क्रमांकाच्या पुरस्कारावर आपले नाव कोरले आहे. भारत सरकार च्या आवाहनानुसार राज्यांमधील किमान ८२३२ शासकीय शाळांमधून इको क्लब स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तर सीबीएसई बोर्डाच्या व खाजगी आस्थापनांच्या मिळून एकूण ५३८६ शाळांमध्ये इको क्लब स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सर्व शाळांचे मुख्याध्यापक मार्गदर्शक म्हणून काम पाहतील. तसेच पाठ्यपुस्तकांमध्ये आढळून येणाऱ्या पर्यावरण विषयक संकल्पना कृती व उपक्रम विचारात घेऊन शालेय विद्यार्थ्यांनी भावी जीवनात संयमशील वर्तन व पर्यावरण पूरक जीवन पद्धतीचा अवलंब करावा असा यामागील मुख्य हेतू आहे.

शाळेतील सहशिक्षिका वैशाली मुके यांनी निवड झालेल्या सर्व सदस्य विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याविषयी खेड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले आणि विस्तार अधिकारी जीवन कोकणे व केंद्रप्रमुख संजीवनी घाटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिंदेवाडी शाळेत वृक्षारोपणाने शिक्षण सप्ताहाला सुरुवात



**झाडे लावा झाडे जगवा !** शिंदेवाडी येथे वृक्षारोपण करताना विजय चव्हाण आणि शिक्षक आणि विद्यार्थी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** पारगाव सा.मा. (ता. दौंड) येथील शिंदेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यासाठी शाळेत प्रत्येक दिवशी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहात पायाभूत साक्षरता वाचन, लेखन, परिसर भेट, उद्योगांची माहिती, गणित पेटी, भाषा पेटीची माहिती, सांस्कृतिक कार्यक्रम, वेशभूषा आदी उपक्रम घेण्यात आले. शनिवारी (दि. २७) सप्ताहाच्या सहाव्या दिवशी पर्यावरण संवर्धनासह प्रदूषण कमी व्हावे यासाठी इको क्लबच्या माध्यमातून शालेय परिसरात तसेच प्रत्येक मुलांच्या घरी एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.यासाठी ग्रामस्थ विजय चव्हाण यांच्या हस्ते त्यांच्या घरासमोर वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी शिक्षक संदीप थोरात, आक्का मोरे, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष, नागरिक तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते

## दानशूर व्यक्तींकडून पडवळ कुटुंबियांना मदत.

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**मदतीचा हात...** » **खडकवाडी:** वडधरा येथे पडवळ कुटूंबाना मदत करताना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवाडी :** (ता.आंबेगाव ) येथील वडधरा या ठिकाणी चार दिवसापूर्वी संतोष पडवळ व बबूशा पडवळ यांच्या झोपड्या दिवसा ढवळ्या अज्ञान व्यक्तिने पेटवून दिल्या होत्या. या घटनेत दोघाही पडवळ कुटूंबाचा सर्व संसार जळून खाक झाला. फक्त अंगावरचे कपडे शिल्लक राहिले होते. या घटनेचे वृत कळताच अनेकांनी पडवळ कुटुंबाला मदतीचा हात पुढे केला. घोडेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते उयसिंह चौधरी व सरोजा चौधरी तसेच उद्योजिका ज्योती गोरडे, ॲड.अकबर मूजावर, ॲड.सिध्देश पंडीत यांनी आवशक असणारी भांडी, कपडे व धान्य देऊन पडवळ कुटूंबाला मोठा आधार दिला. तसेच त्यांना किरकोळ खर्च करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त उदयसिंह चौधरी, उद्योजिका ज्योती गोरडे, कोळवाडी-कोटमदर्यांचे पोलीस पाटील सुनिल डामसे, गोरक्ष डामसे यांनी आर्थिक मदत करून संकटकाळी पडवळ कुटूंबाला आधार देण्याचे काम केले.

# पारगांवच्या सरपंच जयश्री ताकवणे नालंदा ग्रामसमृद्धी पुरस्काराने सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** येथील सरपंच जयश्री शरद ताकवणे यांना नालंदा ग्रामसमृद्धी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा सोहळा शनिवारी पत्रकार भवन नवी पेठ या ठिकाणी आयोजित करण्यात आला. या सोहळ्यासाठी पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांमधून आदर्श काम करणाऱ्या ३५ ग्रामपंचायतींना निमंत्रण देण्यात आले होते. गाव पातळीवर उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तसेच ग्रामपंचायतींना सहाय्य करणारे मुख्याध्यापक यांना प्रतिनिधी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.



नालंदा संस्थेने २०२१ - २२ सालापासून गाव पातळीवर सर्वेक्षण करून त्यांची निवड केली आहे. सर्वेक्षणा दरम्यान प्रत्येकाचे गावासाठी असलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची निवड करण्यात आलेली आहे. कोविड काळामध्ये किंवा covid-काळ संपल्यानंतर ज्या सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील आणि शाळा मुख्याध्यापकांनी गावांच्या उभारणी करिता त्याचबरोबर ग्रामसमृद्धीकरिता शाश्वत उपाय योजना राबवण्यासाठी मदत केली आहे, अशा सन्माननीय व्यक्तींची या सोहळ्यासाठी निवड करण्यात आली.यात पारगाव (सालु मालू) येथील माजी सरपंच सौ जयश्री शरद ताकवणे यांची निवड करण्यात आली या आधीही ताकवणे यांना प्रभात ने उत्कृष्ट सरपंच पुरस्काराने सन्मानित केले आहे.

कार्यक्रमाला उपस्थित सन्मानार्थींना भारतीय परंपरेप्रमाणे फेटा बांधून तसेच औक्षण करून स्वागत करण्यात आले.. सोहळ्याच्या माध्यमातून ग्रामसमृद्धीसाठी एकमत असलेल्या अनेकांना एकत्र करून विचारांची देवाण-घेवाण व्हावी, त्याचबरोबर त्यांच्या कामाला प्रोत्साहन मिळावे म्हणून छोटासा सन्मान करण्याची संधी या माध्यमातून संस्थेला संस्थेला मिळाली अशी माहिती संस्थेचे कार्यक्रम अधिकारी श्रीकांत जायभाय यांनी दिली.

हा पुरस्कार माझ्या संपूर्ण पारगाव ग्रामस्थांचा पुरस्कार आहे. पारगाव ग्रामस्थांनी जी मला भरभरून साथ दिली, उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रेरणा दिली, त्या पारगाव ग्रामस्थांना हा पुरस्कार समर्पित करते, असे जयश्री ताकवणे यांनी सांगितले.

POSITIVE NEWS!

धामारी ता. शिरुर येथील दत्तनगर

प्राणिमित्रांना यश

# विहिरीत पडलेल्या मोराला जीवदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** धामारी ता. शिरुर येथील दत्तनगर येथे एका चाळीस फुट खोल विहिरीमध्ये पडलेल्या राष्ट्रीय पक्षी मोराला शिताफीने जीवदान देत निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात प्राणिमित्रांना यश आले आहे.

धामारी ता. शिरुर येथील विठ्ठल डफळ हे शेतात गेलेले असताना शेतातील विहिरीमध्ये एक मोठा मोर पडला असल्याचे असल्याचे त्यांना दिसले दरम्यान माजी सरपंच संपत कापरे यांच्या माध्यमातून निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व शिरुर रेस्क्यू टीमचे शेरखान शेख यांना याबाबत माहिती दिली असता शेरखान शेख, आपदा मित्र वैभव निकाळजे, सर्पमित्र शुभम वाघ, राजेश मुंडकर, आयान शेख यांनी सदर ठिकाणी धाव घेत विठ्ठल डफळ, वैभव गायकवाड, सचिन गायकवाड यांच्या मदतीने विहिरीमध्ये पडलेल्या राष्ट्रीय पक्षी मोराला मोठ्या शिताफीने विहिरीतून बाहेर काढत याबाबतची माहिती शिरुर वनविभागाने वनरक्षक नारायण राठोड यांना देत सदर मोराला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केले दरम्यान भारताच्या राष्ट्रीय पक्षी मोराला जीवदान मिळाल्याने शेतकऱ्यांनी देखील समाधान व्यक्त केले.



धामारी ता. शिरूर येथे विहिरीत पडलेल्या मोराला जीवदान देताना प्राणीमित्र.

## ३१ जुलैपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

# किल्ले शिवनेरीचे दरवाजे पर्यटकांसाठी बंद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर : छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी किल्ले शिवनेरी येथे पर्यटकांना ३१ जुलैपर्यंत प्रवेशबंदी करण्यात आली असल्याची माहिती जुन्नरचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली आहे. पावसाळी पर्यटनाच्या दृष्टिकोनातून नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.**

### सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना

किल्ले शिवनेरीच्या गणेश दरवाजाच्या वरील बाजूस असलेला साधारण ७ ते ८ फूट लांब व ५ ते ६ फूट रुंदीचा खडक ढासळून किल्ल्याच्या भातखळा बाजूस खाली घसरून आला आहे. तसेच गणेश दरवाजाच्या लगत असलेली ८ ते ९ फूट लांबीची किल्ल्याची तटबंदी तुटली असल्याचे निदर्शनास आले आहे. काही दिवसांपासून जुन्नर परिसरात जोरदार पाऊस पडत आहे. त्या अनुषंगाने पावसाळ्यातील पर्यटनासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दि. ३१ जुलैपर्यंत किल्ले शिवनेरी पर्यटनासाठी बंद करून पर्यटकांना किल्ल्यावर प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**उपाययोजनांचे पालन न करणाऱ्यांना दंड**

- प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन न करणाऱ्या पर्यटकांवर भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ व तत्सम कायदे व नियमांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी वनविभागाला दिले आहेत.

#रा

## जम्मू काश्मिरमध्ये सुरक्षेत वाढ

# खोऱ्यात अतिरिक्त जवान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये वारंवार दहशतवादी हल्ले होत आहेत. त्याचबरोबर सीमेपलीकडून दहशतवाद्यांची घुसखोरीही सुरूच आहे. एकूणच खोऱ्यातील उष्ण परिस्थितीमुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. सीमेवरील सुरक्षेसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने यापूर्वीच अनेक पावले उचलली आहेत. आता मीडिया रिपोर्ट्सनुसार जम्मू-काश्मीरमध्ये सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) दोन हजारांहून अधिक जवान तैनात करण्यात येणार आहेत.



गेल्या काही दिवसांपासून, जम्मू-काश्मीरमध्ये एकापाठोपाठ एक दहशतवादी हल्ले होत आहेत. दहशतवादी कधी लष्करी छावण्यांवर तर कधी लष्कराच्या ताफ्यावर हल्ले करत आहेत. या चकमकीत अनेक जवानांना आपले प्राण गमवावे लागले. अतिरेक्यांना कसे रोखायचे यावर चर्चा सुरू आहे. माध्यमातील वृत्तानुसार, खोऱ्यातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ओडिशातील बीएसएफ जवानांची जम्मू-काश्मीरमध्ये बदली करण्यात येणार आहे. सुरुवातीला बीएसएफच्या दोन बटालियन रियासी, किश्तवाड आणि कठुआ जिल्ह्यात पाठवण्यात येणार आहेत. त्यानंतर काही दिवसांनी दोन हजार सैनिकांची आणखी एक बटालियन जम्मूला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

काही दिवसांपूर्वी जम्मूच्या डोंगराळ भागात ४० ते ५० दहशतवादी लपून बसल्याची बातमी आली होती. जम्मू भागात घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रेही आहेत. लपून बसलेल्या अतिरेक्यांना बाहेर काढण्यासाठी जम्मूमध्ये पॅरा स्पेशल फोर्सचे ५०० कमांडो तैनात करण्यात आले आहेत. दहशतवादी लाँच पॅड रोखण्यासाठी च नव्हे तर काश्मीर खोऱ्यातील दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या संशयित ठिकाणांवरही लष्कर पाळत ठेवत आहे. यामुळेच केंद्र यावेळी बीएसएफचे अधिक जवान तैनात करणार आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

# सावधान! चक्रीवादळ येणार आहे

### हवामान तज्ज्ञांचा इशारा

**देशभरात मान्सूनचा** हंगाम सर्वत्र पोहोचला आहे. क्वचितच असे राज्य असेल जिथे पाऊस पडत नाही. दरम्यान, येत्या काही दिवसांत केरळच्या किनारी भागात अनेक चक्रीवादळे दिसू शकतात, असे एका अहवालात म्हटले आहे. अशा



परिस्थितीत लोकांनी सावध राहण्याची गरज आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफीने (एनआयओ) आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, हे वादळ ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान केरळमध्ये धडकू शकते. याशिवाय पश्चिम किनारपट्टीवर ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफीचे माजी संचालक आणि मानद शास्त्रज्ञ एस. प्रसन्न कुमार यांनी स्पष्ट केले की, प्रशांत महासागरातील अल निनोचा टप्पा संपुष्टात आल्याने आणि ला निना परिस्थिती सुरू झाल्यामुळे पश्चिम पॅसिफिक महासागर आणि पूर्व हिंदी महासागर तापत आहेत. त्यामुळे वातावरणातील आर्द्रता वाढली आहे. अशा परिस्थितीत ऑगस्टमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे किंवा मान्सूनचा हंगामही लांबण्याची शक्यता आहे. मान्सून माघारी गेल्यानंतर अरबी समुद्रात तीव्र चक्रीवादळे येण्याची शक्यता आहे.

## » Selected

### दिल्ली प्रकरणी विद्यार्थी संतप्त

**नवी दिल्ली** : मुसळधार पावसामुळे दिल्लीतील जुना राजिंदर नगर भागातील कोचिंग सेंटरच्या इमारतीच्या बेसमेंटमध्ये पाणी शिरल्याने यूपीएससीच्या तीन उमेदवारांचा मृत्यू झाला. या घटनेवरून राजकारण तापले आहे. संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत एमसीडी आणि दिल्ली सरकारचा निषेध केला. आम आदमी पक्षाच्या खासदार स्वाती मालीवाल जुन्या राजेंद्र नगर येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोहोचल्या, तेव्हा त्यांना तीव्र विरोधाला सामोरे जावे लागले. स्वाती मालीवाल यांनी राजिंदर नगर घटनेवरून दिल्ली सरकारवर टीका केली. राजधानीतील तीन विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी कोण घेणार? दहा दिवसांपासून नालेसफाईची मागणी विद्यार्थी करत होते, मात्र कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे आरोप आहे. दिल्ली सरकारच्या कारभारावर स्वाती मालीवाल यांनी प्रश्न उपस्थित केले.

### भारतीयांचा विदेशात मृत्यू

**नवी दिल्ली** : गेल्या ५ वर्षांत ६३३ भारतीय विद्यार्थ्यांचा विदेशात शिक्षण घेत असताना मृत्यू झाला आहे. या विद्यार्थ्यांच्या मृत्यूमागे वेगवेगळी कारणे आहेत. केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी शुक्रवारी लोकसभेत ही आकडेवारी मांडली. आकडेवारीनुसार यातील अनेक विद्यार्थ्यांना जातीभेदामुळे आपला जीवही गमवावा लागला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत माहिती दिलेली आहे. कॅनडाच्या परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार कॅनडामध्ये, सर्वाधिक १७२ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर अमेरिकेत १०८, तर ब्रिटनमध्ये ५८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. ऑस्ट्रेलियात ५७ तर रशियात ३७ विद्यार्थ्यांना आपला जीव गमवावा लागला. त्याचबरोबर युक्रेन १८, जर्मनीत २४ आणि जॉर्जिया, किर्गिझस्तान आणि सायप्रसमध्ये १२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

## योगी आदित्यनाथ यांच्याकडून सादरीकरण

# मिशन मोडमध्ये काम करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भाजपच्या मुख्यमंत्री परिषदेच्या बैठकीत राज्यांना सुशासनासाठी मिशन मोडमध्ये काम करण्यास सांगण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या बैठकीच्या पहिल्याच दिवशी काही मुख्यमंत्र्यांनी आपले सादरीकरणही केले. यात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांचा समावेश होता.

लोकसभा निवडणुकीनंतर भाजपच्या मुख्यमंत्री परिषदेची ही पहिलीच बैठक होती. या बैठकीत सलग तिसऱ्यांदा निवडणूक जिंकून पंतप्रधान होण्याचा विक्रम



प्रस्थापित केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधानांनी भाजपच्या सर्व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सुशासनाच्या दिशेने मिशन मोडमध्ये काम करण्यास सांगितले आहे.

सरकारकडून धोरणात सातत्य राखले जाते आणि निवडणुकीच्या निकालाने आश्चर्य चकित होता कामा नये, असे राज्यांना सांगण्यात आले. एकंदरीत आकडेवारी भाजपच्या दृष्टीने अनुकूल असून, काही जागा कमी होऊनही आम्ही देशभरात पुढे आहोत. त्यामुळे निराश होण्याची गरज नाही, तर अधिक उत्साहाने कामे करून जनतेचा विश्वास जिंकण्याची गरज आहे, असे यात सांगण्यात आले. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ग्राम सचिवालयांचे डिजिटायझेशन आणि राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर बनविण्याबाबत आपले सादरीकरण केले. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी रोजगारावर सादरीकरण केले. बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी बेकायदा खाणकाम रोखण्याबाबत सादरीकरण केले, तर त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा यांनी 'सरकार घरपोच' या विषयावर सादरीकरण केले.

## चांदीपुरा व्हायरसच्या रुग्णांमध्ये वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गांधीनगर :** गुजरातमध्ये चांदीपुरा व्हायरसच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. या व्हायरसमुळे ४८ मुलांचा मृत्यु झाला आहे, तर १२७ नवीन प्रकरणे दाखल झाली आहेत. अनेकांवर विविध रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा व्हायरस गुजरात आणि राजस्थानमध्ये खुप मोठ्या प्रमाणात पसरत आहे.

चांदीपुरा व्हायरस हा विशेषत: १२ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांमध्ये आढळतो. हा व्हायरस अतिशय धोकादायक असून, याची सुरुवात नागपुरातील चांदीपूर येथून झाली. आता तो गुजरातमध्ये झपाट्याने वाढत आहे. चांदीपुरा व्हायरस विशेषतः लहान मुलांमध्ये पसरत आहे. यामुळे गंभीर एन्सेफलायटीस देखील होतो. हा अतिशय धोकादायक व्हायरस असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी म्हटले आहे.

# झारखंड घुसखोरांचा प्रश्न कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांची :** झारखंडमध्ये काँग्रेस आमदार शिल्पी नेहा तिर्की यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर तेथील राजकारण तापले आहे. अलीकडेच त्यांना बांगलादेशी मुस्लीम घुसखोरांमुळे राज्यात झालेल्या लोकसंख्येच्या बदलाबाबत विचारले असता, त्यांनी बांगलादेशी घुसखोरांची तुलना बिहारमधून राज्यात स्थायिक झालेल्या लोकांशी केली.

भाजपवर टीका करताना शिल्पी तिर्की म्हणाले की, जर आपण लोकसंख्या बदलाबद्दल बोलत असू तर त्यांनी रांचीपासून सुरुवात केली पाहिजे. इथे लोकसंख्या बदलाबद्दल का बोलू नये. आज रामगडचा प्रमुख कोण होतो, बिहारी बिहारमधून येतात. त्यांना या सर्व गोष्टी दिसत नाहीत. त्यांनी त्याबद्दल बोलले पाहिजे. त्यानंतर आपण संथालांबद्दलही बोलू. संपूर्ण झारखंडमध्ये लोकसंख्येत बदल झाला आहे. हे लोक सर्वाधिक काळ सत्तेत होते. १९८५ मध्ये त्यांनी इथल्या आजूबाजूला बांधलेल्या अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या लोकांना रहिवासी प्रमाणपत्रही दिले. झारखंडसाठी भाजपापेक्षा वाईट विचार करणारा दुसरा कोणीही नसेल, असे व्यक्तव्य त्यांनी केले.

भाजप नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. बांगलादेशातून आलेले मुस्लिम घुसखोर दुसऱ्या देशातून बेकायदेशीरपणे स्थलांतरित होऊन संथाल आणि झारखंडच्या इतर भागात स्थायिक झाले आहेत, हे काँग्रेसच्या आमदारांनी समजून घ्यावे. तर बिहारमधील लोक आपल्या देशाच्या कायद्यानुसार येथे स्थायिक झाले आहेत. या दोघांची तुलना करून त्यांनी क्षुद्र राजकारणाची ओळख करून दिली आहे, असा घणाघात भाजपने केला आहे. मुस्लिम मतांचे तुष्टीकरण करण्याचा आणि व्होट बँकेचे राजकारण करण्याचा काँग्रेसचा मोठा इतिहास आहे.

## मोदी यांच्या दौऱ्यावरून टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावित युक्रेन दौऱ्यावरून विरोधकांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. युरोपीय देश युक्रेनच्या दौऱ्यापूर्वी किंवा त्यानंतर पंतप्रधान मणिपूरला भेट देतील का, असा प्रश्न काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी केला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी मणिपूरचा दौरा केला नाही, अशी टीका काँग्रेसने वारंवार केली आहे. मैतेई आणि कुकी समाजातील संघर्षामुळे मणिपूर पेटले आहे. युक्रेनचा दौरा झाल्यास, फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने हल्ला केलेल्या युक्रेनचा पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा असेल.

जूनमध्ये सलग तिसऱ्यांदा विजय मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करणाऱ्या जागतिक नेत्यांमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांचाही समावेश होता. पंतप्रधानांच्या रशिया दौऱ्यावेळी झेलेन्स्की यांनी त्यांच्यावर टीका केली होती.

## मुसळधार

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**मनिला :** फिलीपिन्समधील मनिला येथे मुसळधार पावसामुळे पाणी भरलेल्या रस्त्यांवरून बस मार्ग काढत पुढे जाताना दिसून येते.

## पश्चिम बंगालमधून होणारा पुरवठाही थांबला

# बटाट्याचे राजकारण तापले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भूवनेश्वर :** ओडिशात सध्या 'बटाट्याचे राजकारण' गाजत आहे. येथे बटाट्याचा पुरवठा होत नसल्याने भाव गगनाला भिडले आहेत. परिस्थिती अशी झाली आहे की, शेजारील पश्चिम बंगाल राज्यात बटाट्याचा पुरवठा करण्यासाठी पत्र कोणी लिहायचे, हाही चर्चेचा विषय झाला आहे.

ओडिशात बटाटा महागला असून, दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आवक होणे गरजेचे आहे. त्यासाठी भाजप आणि बिजू जनता दलात स्पर्धा सुरू आहे. विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी ममता बॅनर्जी यांना याबाबत पत्र लिहिले. यामध्ये त्यांनी बटाट्याचा पुरेसा पुरवठा करण्याची मागणी केली आहे. पटनायक यांनी लिहिले आहे की, पावसामुळे ओडिशातील बटाट्याच्या पुरवठ्यावर विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे दरात



मोठी वाढ करण्यात आली असून, त्यामुळे सर्वसामान्यांना त्रास सहन करावा लागत आहे. दुसऱ्याच दिवशी ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांनी स्वत: ममता बॅनर्जी यांची भेट घेतली. नवी दिल्लीत नीती आयोगाच्या बैठकीदरम्यान त्यांनी ममता यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी या प्रकरणाकडे लक्ष देण्यास सांगितले.

पश्चिम बंगालमधील बटाटा व्यापारी सध्या संपावर आहेत. राज्य पोलीस आणि स्थानिक प्रशासनावर त्यांनी छळ केल्याचा आरोप केला आहे. यामुळे पश्चिम बंगालमध्येही बटाट्याच्या दरात वाढ झाली आहे. बटाट्याचे दर आटोक्यात आणण्यासाठी पश्चिम बंगालने इतर राज्यांना करण्यात येणारा पुरवठा बंद केला आहे. पश्चिम बंगाल हे देशातील सर्वात मोठे बटाटा उत्पादक राज्य आहे.

केंद्र सरकारच्या ॲग्री एक्स्चेंज ट्रेडिंग प्लॅटफॉर्मनुसार, २०२१-२२ मध्ये बटाटा उत्पादनात पश्चिम बंगालचा वाटा २३.५१ टक्के होता. या बाबतीत उत्तर प्रदेश २९.६५ टक्क्यांसह आघाडीवर आहे. ओडिशात बटाटा मोठ्या प्रमाणात खाल्ला जातो आणि तो पश्चिम बंगालवर अवलंबून आहे. पुरवठा होत नसल्याने त्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. बटाटे ३२ रुपयांपेक्षा अधिक दराने विकू नयेत, असे आदेश सरकारने दिले आहेत. मात्र किरकोळ बाजारात ५० ते ५५ रुपये किलो दराने त्याची विक्री होत आहे. पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी दोन्ही राज्यांचे सरकार प्रयत्न करत आहे. संपामुळे बटाट्याचा पुरवठा विस्कळीत झाल्याची माहिती पश्चिम बंगालमधील अधिकाऱ्यांनी दिली.

## काँग्रेसच्या अधीररंजन चौधरींचा आरोप

# ममता खोटे बोलत आहेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नीती आयोगाच्या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी माईक बंद केल्याचा आरोप केला असता, त्या खोटे बोलत आहेत, असे काँग्रेसचे पश्चिम बंगाल अध्यक्ष अधीररंजन चौधरी यांनी म्हटले आहे. नीती आयोगाच्या बैठकीबाबत ममता बॅनर्जी जे काही बोलत आहेत, त्या खोटं बोलत आहेत, असे मला वाटते. एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना बोलू दिले जाणार नाही, हे अत्यंत आश्चर्यकारक आहे, असेही अधीररंजन यांनी म्हटले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या युसूफ पठाण यांच्याकडून पराभूत झालेले अधीररंजन चौधरी हे ममता बॅनर्जी यांच्या प्रमुख विरोधकांपैकी एक आहेत. निवडणुकीपूर्वी त्यांनी



ममता बॅनर्जी यांच्यावर अनेक वेळा टीका केली होती.

शनिवारी अधीररंजन चौधरी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून पश्चिम बंगालमध्ये अराजकता असल्याचा आरोप केला होता. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी हस्तक्षेप करण्याची मागणी त्यांनी केली होती. पश्चिम बंगालमधील सार्वजनिक जीवनात शिष्टाचार आणि कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी, मी तुमच्या तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करतो, असे चौधरी यांनी दोन पानांच्या पत्रात म्हटले आहे. बंगालमध्ये सत्ताधारी पक्षाच्या दादागिरीमुळे तेथील नागरिकांना नोकऱ्या किंवा रोजगाराची साधने गमवावी लागत आहेत, असा घणाघातही त्यांनी केला.

## निती आयोगाच्या बैठकीत व्हिजन डॉक्युमेंट सादर

# विकसित भारतासाठी ठोस योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नीती आयोगाच्या बैठकीत भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी व्हिजन डॉक्युमेंट सादर करण्यात आले. त्यानुसार, २०४७ पर्यंत दरडोई उत्पन्न वार्षिक १५ लाखांपर्यंत पोहोचावे लागेल, जे आता सुमारे २ लाख रुपये आहे. त्यात सध्याच्या पातळीपेक्षा आठपटीने वाढ करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे जीडीपीत ९ पटीने वाढ करावी लागणार आहे.

व्हिजन डॉक्युमेंटमध्ये विकसित भारताच्या सामाजिक निर्देशांकांचेही मूल्यमापन केले जाते. उदाहरणार्थ, २०४७ मध्ये भारतीयांचे सरासरी वय ८४ वर्षे असेल, जे आता ७१ वर्षे आहे. त्यानंतर एकूण प्रजनन दर २.०३ वरून १.८ वर येईल. पण याचा अर्थ




लोकसंख्या कमी होईल असे नाही. आज देशाची लोकसंख्या १४० कोटी आहे, ती १६५ कोटींपर्यंत पोहोचेल. ही लोकसंख्या देशाची ताकद बनेल. १६५ कोटींपैकी ११२ कोटी कामगार युवा असतील.

व्हिजन डॉक्युमेंटनुसार विकसित भारतात साक्षरतेचा दर १०० टक्के असेल, जो आतापर्यंत जेमतेम ७७ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्याचप्रमाणे लोकांचे राहणीमान इतके चांगले होईल की बालमृत्यूदर केवळ दोनवर येईल. सध्या हे प्रमाण २८ प्रति हजार आहे. कामगारांमध्ये महिलांचा सहभाग ७० टक्क्यांपर्यंत पोहोचेल, जो सध्या ३७ टक्के आहे. स्त्री-पुरुष समानता सुधारेल आणि भारत पहिल्या १० देशांमध्ये असेल. तो सध्या १२२ व्या क्रमांकावर आहे.

भारताला दारिद्र्यमुक्त गावांचा विकास करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यांना केवळ लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी रणनीती आखावी लागणार नाही. त्याचबरोबर राज्यांना गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सविस्तर कृती आराखडाही तयार करावा लागणार आहे. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यांना गरीबमुक्त गावे बनविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

### १० राज्यांची दांडी

● बिहार, केरळसह १० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीला उपस्थित नव्हते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी होते. या बैठकीला २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल आणि इतर प्रतिनिधी उपस्थित होते. बिहार आणि केरळव्यतिरिक्त तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा, दिल्ली, पंजाब, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि पुद्दुचेरी या राज्यांनी या बैठकीला हजेरी लावली नाही.

#रा



## मनू भाकरने ब्रॉंझ मेडल जिंकत रचला इतिहास

# भारतीय नारी सब पर भारी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस :** पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत रविवारी भारताचं पदकांचं खातं उघडलं. भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकरने कांस्यपदकावर नाव कोरले. तिने महिला १० मीटर एअर पिस्तुल क्रीडा प्रकारात कांस्य पदकाची कमाई केली. मनू ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी भारताची पहिलीच महिला नेमबाज ठरली आहे. भारतासाठी यापूर्वी राज्यवर्धन सिंग राठोड (२००४), अभिनव बिंद्रा (२००८), विजय कुमार (२०१२) आणि गगन नारंग (२०१२) या चार पुरुष नेमबाजांनी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकले आहे. हे पदक जिंकल्यानंतर मनू म्हणाली, 'मला खूप छान वाटत आहे. मी खूप मेहनत घेतली होती. मी माझ्या पूर्ण उर्जेने खेळत होते. कांस्य पदक जिंकले असले, तरी मला आनंद आहे मी देशासाठी जिंकू शकले.'

याशिवाय ती म्हणाली, 'मी भगवद गीता खूप वाचते, काल अंतिम फेरीपूर्वी अर्जूनाला श्रीकृष्ण त्याचा धर्म काय आहे हे सांगतात, हा अध्याय वाचत होते. त्यात सांगितलंय की तुमचं कर्म करत राहा, बाकीचा विचार करू नका. मी तेच केलं. मी फक्त त्याक्षणी जे करू शकत होते, त्यावरच लक्ष केंद्रित केले होते. माझ्याकडे निकालाबद्दल विचार करायला नंतर पूर्ण वेळ होता. ' तिनं असंही सांगितलं की ती शांत राहुन तिचे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करत होती. मनू भाकर तीन वर्षांपूर्वी टोकियो ऑलिम्पिकमध्येही पदक जिंकू शकली असती. मात्र मोक्याच्या क्षणी तिच्या पिस्तुलममध्ये बिघाड झाला, त्याचा फटका तिला बसला होता. पण तिने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मात्र बाजी मारली.

ती याबाबत म्हणाली, 'टोकियोनंतर मी खूप निराश झाले होते. मला त्यातून बाहेर येण्यासाठी खूप वेळ लागला. त्याचा परिणाम माझ्या काही स्पर्धांमधील कामगिरीवरही झाला. पण मला आनंद आहे की मी पुन्हा मजबुतीने उभी राहिली.




## 'गोल्ड मेडल'पासुन रमिता एक पाऊल दूर!

**पॅरीस :** पीव्ही सिंधूने पॅरिस ऑलिम्पिकची विजयी सुरुवात केली आहे. तिने ग्रुप स्टेजच्या पहिल्या सामन्यात मालदीवच्या फतिमा नबाहा अब्दुल रज्जाकचा अवघ्या २९ मिनिटांत पराभव केला. सिंधूने पहिला गेम १३ मिनिटांत २१-९ असा जिंकला. सिंधूने दुसरा गेम १४ मिनिटांत २१-६ असा जिंकला. दहावी मानांकित सिंधू या ऑलिम्पिकमध्ये सलग तिसरे पदक जिंकणार आहे. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये त्याने रौप्य पदक आणि २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकले. भारतीय बॅडमिंटन स्टार पीव्ही सिंधू आणि मालदीवचा फातिमथ नब्बा अब्दुल रज्जाक यांच्यातील सामना एकतर्फी झाला. पीव्ही सिंधूने पहिला सेट सहज जिंकला. तिने पहिला गेममध्ये अब्दुल रझाकचा २१-९ असा पराभव केला. दुसऱ्या गेममध्ये रझाक पुनरागमन करेल असे वाटले होते. पण पीव्ही सिंधूने तो गेम पण सहज जिंकला. आणि दुसरा गेम २१-६ अशा फरकाने जिंकून मोहिमेला सुरुवात केली. पीव्ही सिंधूने आता पुढील फेरीत प्रवेश केला.





## १० मीटर एअर रायफलमध्ये भारताला मिळणार आणखी एक मेडल!

**पॅरीस :** महाराष्ट्र भारताच्या मनू भाकरने १० मीटर एअर पिस्तूल महिलांच्या अंतिम फेरीत चमकदार कामगिरी करत भारतासाठी कांस्यपदक जिंकून इतिहास रचला आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनूने भारताला पहिले पदक मिळवून दिले आहे. ऑलिम्पिक इतिहासात भारतासाठी नेमबाजीत पदक जिंकणारी मनू ही पहिली महिला आहे. याशिवाय मनूने १२ वर्षांनंतर नेमबाजीत भारतासाठी पदक जिंकले आहे. मनूच्या विजयानंतर लगेचच भारतासाठी आणखी एक आनंदाची बातमी आली आहे. भारताचा अर्जुन बबुता १० मीटर एअर रायफल पुरुषांच्या पात्रता स्पर्धेत सातव्या स्थानावर राहून अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. अर्जुन बबुताने एकूण ६३०.१ गुण मिळवले. तर, दुसरा भारतीय संदीप सिंग ६२९.३ गुणांसह १२ व्या स्थानावर राहिला आणि त्यामुळे तो अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही. भारताची स्टार नेमबाज रमिता जिंदल हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात अंतिम फेरी गाठली आहे. त्यांनी इतिहास रचला आहे. या स्पर्धेत अंतिम फेरी गाठणारी ती तिसरी भारतीय महिला खेळाडू आहे. २० वर्षांनंतर कोणत्याही खेळाडूने हे केले आहे. रविवारी खेळल्या गेलेल्या पात्रता फेरीत २० वर्षीय रमिता ६३१.५ गुणांसह पात्र ठरली. रमिता उद्या दुपारी एक वाजल्यापासून तिचा अंतिम सामना खेळणार असून सुवर्णपदक जिंकण्याचा प्रयत्न करेल.

## श्रीलंकेने भारताला फायनलमध्ये हरविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महिला आशिया कप २०२४ स्पर्धेचे विजेतेपद श्रीलंका महिला संघाने जिंकले आहे. रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात श्रीलंकेने भारतीय महिला संघाचा ८ विकेट्सने पराभव केला आणि विजेतेपदाला गवसणी घातली.

श्रीलंका महिला संघाने पहिल्यांदाच आशिया कप विजेतेपदावर नाव कोरले आहे. तसेच महिला आशिया कप स्पर्धा जिंकणारा श्रीलंका भारत आणि बांगलादेशनंतरचा तिसराच संघ ठरला आहे.

यापूर्वी भारतीय महिला संघाने ७ वेळा आशिया कप जिंकला आहे, तर बांगलादेशने एकदा आशिया कप उंतावरण्याचा कारनामा केला आहे.

दरम्यान डंबुला येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेला १६६ धावांचे लक्ष्य दिले होते. या लक्ष्याचा पाठलाग श्रीलंकेने १८.४ षटकात २ विकेट्स गमावत १६७ धावा करत सहज पूर्ण केला. श्रीलंकेकडून कर्णधार चमारी अट्टापट्टू आणि हर्षिता समरविक्रमा यांनी अर्धशतके केली.

## रियान परागने घेतले ३ बळी; सुर्यकुमार यादव, जैस्वाल, गिलची जबरदस्त बॅटिंग

# भारताचा श्रीलंकेविरुद्ध रोमांचक विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पल्लेकेले :** भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिली टी-२० मॅच पल्लेकेले येथे पार पडली. भारतानं सूर्यकुमार यादव , रिषभ पंत, यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल यांच्या दमदार खेळीच्या जोरावर २० ओव्हरमध्ये ७ विकेटवर २१३ धावा केल्या होत्या. भारतानं श्रीलंकेपुढं विजयासाठी २१४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. श्रीलंकेच्या पथुम निसांका यानं ७९ धावा आणि कुसल मेंडिसनं ४५ धावा करत सूर्यकुमार यादवचं टेन्शन वाढवलं होतं. मात्र, अक्षर पटेलनं निसांकाला बाद केलं आणि त्याच परेराला बाद करुन मॅच भारताच्या बाजूनं फिरवली. श्रीलंकेचा संघ १ बाद १४० वर असताना पुढील 30 धावात सर्वबाद झाला. श्रीलंकेचा डाव १७० धावांवर आटोपला. अखेर भारतानं श्रीलंकेवर ४३ धावांनी विजय मिळवला. या विजयासह गौतम गंभीरच्या मार्गदर्शनातील हा भारताचा पहिला विजय ठरला.




भारतानं विजयासाठी श्रीलंकेपुढं विजयासाठी २१४ ठेवलं होतं. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेनं आक्रमक सुरुवात केली होती. पथुम निसांका आणि कुसल मेंडिसनं आक्रमक फलंदाजी केली होती. निसांका आणि मेंडिसनं ८४ धावांची भागिदारी करत सूर्यकुमार यादवचं टेन्शन वाढवलं होतं. अर्शदीप सिंगनं कुसल मेंडिसला ४५ धावांवर बाद केलं. यशस्वी जयस्वालनं कॅच घेत मेंडिसला माघारी पाठवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यानंतर श्रीलंकेला निसांकाच्या रुपात १४० धावांवर असताना दुसरा धक्का बसला. निसांकानं ७९ धावा केल्या. निसांकाला अक्षर पटेलनं बाद केलं आणि इथंच मॅच भारताच्या बाजूनं फिरली. इथून पुढच्या ३० धावांमध्ये श्रीलंकेनं नऊ विकेट गमावल्या. भारताकडून अर्शदीप सिंग, अक्षर पटेलनं प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. तर,रियान परागनं तीन, रवि बिश्नोई आणि मोहम्मद सिराजनं एक विकेट घेतली.

भारतानं पहिल्यांदा फलंदाजी करताना ७ विकेटवर २१३ केल्या. भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल या दोघांनी केली. यशस्वी जयस्वालनं ४० आणि शुभमन गिलनं ३४ धावा केल्या. यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिलनं भारतासाठी ७४ धावांची सलामीची भागिदारी केली. यानंतर फलंदाजीला आलेल्या सूर्यकुमार यादवनं २६ बॉलमध्ये ५८ धावांची वादळी खेळी केली. तर, रिषभ पंतनं देखील ४९ धावा केल्या. यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव आणि रिषभ पंतशिवाय इतर फलंदाज मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरले. भारतानं अखेर २० ओव्हरमध्ये ७ बाद २१३ धावा केल्या.



## जगात भारी आपली पीव्ही सिंधू! मेडलच्या दिशेने पहिले पाऊल

**पॅरीस :** पीव्ही सिंधूने पॅरिस ऑलिम्पिकची विजयी सुरुवात केली आहे. तिने ग्रुप स्टेजच्या पहिल्या सामन्यात मालदीवच्या फतिमा नबाहा अब्दुल रज्जाकचा अवघ्या २९ मिनिटांत पराभव केला. सिंधूने पहिला गेम १३ मिनिटांत २१-९ असा जिंकला. सिंधूने दुसरा गेम १४ मिनिटांत २१-६ असा जिंकला. दहावी मानांकित सिंधू या ऑलिम्पिकमध्ये सलग तिसरे पदक जिंकणार आहे. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये त्याने रौप्य पदक आणि २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकले. भारतीय बॅडमिंटन स्टार पीव्ही सिंधू आणि मालदीवचा फातिमथ नब्बा अब्दुल रज्जाक यांच्यातील सामना एकतर्फी झाला. पीव्ही सिंधूने पहिला सेट सहज जिंकला. तिने पहिला गेममध्ये अब्दुल रझाकचा २१-९ असा पराभव केला. दुसऱ्या गेममध्ये रझाक पुनरागमन करेल असे वाटले होते. पण पीव्ही सिंधूने तो गेम पण सहज जिंकला. आणि दुसरा गेम २१-६ अशा फरकाने जिंकून मोहिमेला सुरुवात केली. पीव्ही सिंधूने आता पुढील फेरीत प्रवेश केला.

**यवेस डू मनोयर स्टेडियमवर झालेल्या 'ब' गटातील साखळी लढतीत भारतीय हॉकी संघाने बाजी मारली. थरारक सामन्याचे एकच मिनिट बाकी असताना विजयी गोल झाला.**

# चक दे इंडिया...



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरीस :** सामन्यातील आठव्या मिनिटाला न्यूझीलंडला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. सॅम लेनने ती संधी साधली आणि प्रारंभीच भारत पिछाडीवर पडला. भरीत भर म्हणून दहाव्या मिनिटाला गुरजितसिंगला हिरवे कार्ड दाखवण्यात आले. प्रतिस्पर्धी संघाकडे एक खेळाडू कमी असल्याचा फायदा उठविण्याचा प्रयत्न न्यूझीलंडने केला. सामन्याच्या दुसऱ्या पाव भागाच्या पहिल्या मिनिटाला न्यूझीलंडचा कर्णधार निस वूडस ह्याला पंचांनी पिवळे कार्ड दाखवून पाच मिनिटांसाठी मैदानाबाहेर काढले. त्याचा काही लाभ भारताला घेता आला नाही. चोविसाव्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर भारताला यश आले नाही. त्याच्या पाठोपाठ लगेच मिळालेल्या दुसऱ्या पेनल्टी कॉर्नरवर मनदीपसिंग ह्याने बरोबरी साधली. पूर्वार्धाचा खेळ संपता संपता ह्यूगो इंग्लिस ह्याला हिरवे कार्ड दाखविण्यात आले. उत्तरार्धात खेळ चालू झाला आणि चौतिसाव्या मिनिटालाच आपण आघाडी घेतली. विवेकप्रसाद सागर ह्याने मैदानी गोल केला. त्यानंतर न्यूझीलंडने पेनल्टी कॉर्नर मिळविण्याचा धडाकाच लावला. सामन्याची शेवटची पंधरा मिनिटे बाकी असताना भारतीय संघाकडे आघाडी होती. न्यूझीलंडचा गोलरक्षक डॉमिनिक डिक्सन ह्याने सेहेचाळिसाव्या आणि सत्तेचाळिसाव्या मिनिटाला उत्तम बचाव करीत भारताची आघाडी वाढू दिली नाही. त्रेपनाव्या मिनिटाला सायमन चाइल्ड ह्याने पेनल्टी कॉर्नरवर गोल करीत बरोबरी साधली. अठ्ठावनाव्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर गोल करण्यात भारतीय संघ पुन्हा अपयशी ठरला. सामना संपण्याची शिटी वाजण्यास एकच मिनिट राहिले असताना न्यूझीलंडकडून गफलत झाली. त्यांच्या फाऊलमुळे भारताला पेनल्टी स्ट्रोक मिळाला आणि कर्णधार हरमनप्रीत सिंग ह्याने ती सोनेरी संधी साधली! ह्या सामन्यात भारताने ११ वेळा गोलवर धडक मारली आणि त्यातील तीन संधी साधल्या. न्यूझीलंडची पुढची फळी तब्बल १४ वेळा गोलपोस्टपर्यंत पोहोचली होती. विजेत्यांकडून प्रत्येकी एक मैदानी, पेनल्टी कॉर्नर व पेनल्टी स्ट्रोकचे गोल झाले. न्यूझीलंडचे दोन्ही गोल पेनल्टी कॉर्नरवर झाले. त्यांना नऊ, तर भारताला पाच पेनल्टी कॉर्नर मिळाले. चेंडू ताब्यात ठेवण्याचा विचार केला तर भारताकडे तो ५४ टक्के वेळ आणि राहिलेला ४६ टक्के वेळ न्यूझीलंडकडे होता. त्याचेच चित्र गोलफळ्यावर उमटलेले दिसले.




### ऑलिम्पिक गेम्स पॅरिस २०२४

**पदक तक्ता**

| संघ | | सुवर्ण | रौप्य | कांस्य | टोटल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑस्ट्रेलिया | 3 | 2 | 0 | 5 |
| 2 | चीन | 3 | 0 | 1 | 4 |
| 3 | कोरिया | 2 | 2 | 1 | 5 |
| 4 | अमेरिका | 1 | 2 | 2 | 5 |
| 5 | फ्रान्स | 1 | 2 | 1 | 4 |
| 17 | भारत | 0 | 0 | 1 | 1 |